




# जनमाध्यम


e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २९ जून २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०


## राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज

**मुंबई/प्रतिनिधी** : मागील आठवड्यात मोसमी पावसाने संपूर्ण राज्य व्यापले असून त्यानंतरच्या दोन दिवसात राज्यातील काही भागात मुसळधार पावसाची नोंद झाली. मात्र, मागील काही दिवसांपासून राज्यात मोसमी पावसाने काहीशी विश्रांती घेतल्याचे चित्र आहे. त्यामुळे कमाल तापमानात चढ-उतार



होत असून रविवारी काही भागात वादळी पावसाची नोंद झाली तर सोमवारपासून पुढील तीन दिवस राज्याच्या कोकण किनारपट्टीसह घाट विभागात पावसाचा जोर काहीसा वाढेल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे पुढील काही दिवसात मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय होण्याचा अंदाज आहे.यंदा मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाल्यापासून त्याचा वेग काहीसा संथ असल्याचे दिसून येत आहे. राज्यात मोसमी पाऊस पुढे सरकण्यासाठी दोन आठवड्यांची प्रतीक्षा करावी लागली होती. मात्र, सध्या राज्यभर मोसमी पाऊस दाखल झाला असला तरीही सर्वदूर चांगला पाऊस होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतकरी चिंता व्यक्त करत आहेत. दरम्यान, काही दिवसांच्या विश्रांतीनंतर सोमवारपासून पुढील तीन दिवस पाऊस पुन्हा सक्रिय होण्याचा अंदाज असून या दरम्यान कोकण प्रदेशासह घाट विभागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तसेच बंगालच्या उपसागरातील हवामान प्रणालीमुळे १ ते २ जुलै दरम्यान तळकोकण, मराठवाडा आणि विदर्भातील काही ठिकाणी पावसाचा जोर अधिक असेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. तसेच ३ ते ६ जुलै दरम्यान मुंबईसह उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि राज्यातील अंतर्गत भागातही पावसाचा जोर अधिक असेल, असे हवामान अभ्यासकांनी सांगितले. जून महिना संपत आला तरीही राज्यात समाधानकारक पावसाची नोंद झालेली नाही. आतापर्यंत राज्यात सरासरी पावसाहून ५८ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, जुलै महिन्यात चांगला पाऊस होण्याची शक्यता हवामान अभ्यासकांकडून व्यक्त केली ☞(पान २ वर)

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, उभ्या कंटेनरला कारची धडक

# चंद्रपूरातील एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू





**धामणाव रेल्वे/प्रतिनिधीः-** समृद्धी महामार्गावर रविवारी (दि.२८) सकाळी झालेल्या भीषण अपघातात चंद्रपूर शहरातील एकाच कुटुंबातील पाच जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. धामणगाव रेल्वे तालुक्यातील समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक १०६ जवळ भरधाव कार रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरवर आदळल्याने हा अपघात घडला. या दुर्घटनेमुळे चंद्रपूर शहरासह संपूर्ण जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रपूर शहरातील बाबुपेठ परिसरातील डी.एड. कॉलेजजवळ राहणारे जीवने कुटुंबीय रविवारी अकोला येथे एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी वॅगनार कारने निघाले होते. धामणगाव रेल्वेजवळ समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक १०६ परिसरात त्यांच्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला भरधाव वेगात जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. या भीषण अपघातात कारमधील सर्व प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला.

मृतांमध्ये आरती जीवने (वय ४०), भास्कर जीवने (वय ५७), महादेव जीवने (वय ४२), लता जीवने (वय ४३) आणि त्रिशा जीवने (वय १२) (सर्व रा. डी.एड. कॉलेजजवळ, बाबुपेठ, चंद्रपूर) यांचा समावेश आहे.

### तीन पिढ्यांचा एकाच वेळी अंत

या अपघातात कुटुंबातील ज्येष्ठ दाम्पत्य, त्यांचा मुलगा-सून आणि नात अशा तीन पिढ्यांचा एकाच वेळी मृत्यू झाला. एका क्षणात संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने चंद्रपूर शहरावर शोककळा पसरली असून, परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, स्थानिक पोलीस, रुग्णवाहिका आणि आपत्कालीन बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. कारमध्ये अडकलेल्या मृतदेहांना मोठ्या प्रयत्नांनी बाहेर काढण्यात आले. त्यानंतर सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले.

प्राथमिक तपासात भरधाव वेगामुळे वाहनावरील नियंत्रण सुटून कार उभ्या कंटेनरवर आदळल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त☞(पान २ वर)

## तर ओमराजेंना उमेदवारी दिलीच नसती

### उद्धव ठाकरेंचं धाराशिवच्या सभेत मोठं वक्तव्य



**धाराशिव/प्रतिनिधी** : शिवसेना (ठाकरे) पक्षातून फुटून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेल्या ६ खासदारांच्या लोकसभा मतदारसंघाचा दौरा उद्धव ठाकरे यांनी सुरू केलेला आहे. या दौऱ्यांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या यवतमाळ, वाशिम, हिंगोली जिल्ह्यात जाहीर सभा पाडल्या. त्यानंतर आज (२८ जून) उद्धव ठाकरे यांची धाराशिवमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे यांनी ओमराजे निंबाळकर यांच्याबाबत अनेक गौप्यस्फोट केले आहेत. तसेच सहा खासदार फुटण्याच्या आदल्या रात्री ओमराजे निंबाळकर यांची मनधरणी केली होती, एवढंच नाही तर ओमराजे निंबाळकर यांच्याशी फोनवर बोलणं देखील झालं होतं, असाही खुलासा उद्धव ठाकरे यांनी केला. दरम्यान, ओमराजे निंबाळकर यांच्याबाबत मला आता जी माहिती कळते, ती माहिती आधीच कळाली असती तर ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी दिलीच नसती, असं मोठं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी धाराशिवच्या सभेत बोलताना केलं आहे.

'आता जी काही प्रकरणं मला कळत आहेत, एक-एक प्रकरण समोर येत आहे. हे जर मला आधीच समजलं असतं तर ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी दिलीच नसती. पण माझं दुर्देवं आहे की आता सर्व गोष्टी माझ्या कानावर येत आहेत. खूप भयानक आहे की असा माणूस आपण पोसलाच कसा? त्यामुळे मी आता तुमची माफी मागतो. कारण मी ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी दिली नसती, तर तुम्ही त्यांना मतदान दिलं नसतं आणि तुम्ही मतदान दिलं नसतं तर ही कीड वाढलीच नसती', अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी टीका केली आहे.

**'तुमचा खासदार भाव वाढवून गेला'**

'स्वत:चं पाप झाकण्यासाठी हे खासदार तिकडे गेले आहेत. आता दोन दिवसांपूर्वी आमचे दोन खासदार लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना भेटून आले आहेत. आम्ही त्यांना घटनेचं एक पुस्तक दाखवलं, तर ओम बिर्ला म्हणाले माझ्याकडे आहे.☞(पान २ वर)

## उद्धव ठाकरेंनी गांभीर्याने आत्मपरीक्षण करण्याची अत्यंत आवश्यकता, संजय राऊतांच्या भाषेवर बोट

### रामदास आठवले स्पष्टच बोलले



**मुंबई/प्रतिनिधी** : 'वैयक्तिक द्वेषातून कोणाच्याही आई-वडिलांवर चिखलफेक करणे आणि शिवराळ भाषा वापरणे, हे संजय राऊत यांच्यासारख्या प्रगल्भ आणि अभ्यासू व्यक्तीकडून अजिबात अपेक्षित नाही', असे म्हणत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आपली नाराजी व्यक्त केली. उद्धव ठाकरे आणि ठाकरे कुटुंबीयांनी याबद्दल आत्मपरिक्षण करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

उद्धवसेनेचे सहा खासदार फुटले. शिंदेसेनेत सहा खासदार विलीन झाल्यापासून खासदार संजय राऊत हे त्यांच्यावर टीका करत आहेत. अनेकवेळा खासदार संजय राऊत यांच्याकडून खासदारांनी शिवीगाळ केली गेली आहे. त्याचबरोबर सभांमध्येही अश्लाघ्य भाषेचा वापर केला गेला. संजय राऊतांच्या भाषेवर बोट ठेवत रामदास आठवलेंनी स्पष्ट शब्दात भूमिका मांडली आहे.

**प्रचंड राग आणि नैराश्य असणे साहजिक, पण...**

रामदास आठवलेंनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'संजय राऊत हे माझे जुने मित्र आहेत आणि एक प्रगल्भ, अभ्यासू नेते म्हणून त्यांची ओळख आहे. पक्षामध्ये पडलेली मोठी फूट, सोडून गेलेले खासदार आणि सध्या पक्षाची होत असलेली दयनीय अवस्था पाहता संजय राऊत यांच्या मनात प्रचंड राग आणि नैराश्य असणे हे अगदी साहजिक आहे.'

**राऊतांकडून असे बोलणे अपेक्षित नाही-** 'महाराष्ट्राच्या राजकारणाला एक अतिशय सुसंस्कृत आणि वैचारिक परंपरा आहे. पण सध्या संजय राऊत ज्या प्रकारची शिवराळ भाषा वापरत आहेत, परिस्थिती कितीही कठीण असली किंवा मनात कितीही राग ☞(पान २ वर)

## आयर्लंडचा भारतावर ऐतिहासिक मालिका विजय, अवघ्या एका धावेने जिंकला सामना




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** आयर्लंड संघाने इतिहास घडवत भारताला टी-२० मालिका पराभवाचा धक्का दिला आहे. दुसऱ्या टी-२० सामन्यात आयर्लंड संघासमोर भारताचा संघ १५५ धावाही करण्यात अपयशी ठरला आणि आयर्लंडने अवघ्या १ धावेने सामना जिंकला. संपूर्ण ताकदीनिशी उतरलेला टी-२० वर्ल्ड चॅम्पियन संघ जागतिक क्रमवारीत १२व्या स्थानी असलेल्या आयर्लंड संघाविरूद्ध पराभूत झाली आहे. टीम इंडियाचे फलंदाज दोन्ही सामन्यांमध्ये चांगलेच अपयशी ठरले आहेत. यासह भारताने नव्या कर्णधाराच्या नेतृत्त्वात आयर्लंडसारख्या संघाविरूद्ध टी-२० मालिका गमावली आहे.

भारताने दुसऱ्या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्या सामन्यातही प्रथम गोलंदाजी करत सामना गमावल्यानंतरही भारताने दुसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकल्यानंतर गोलंदाजीचा निर्णय घेतला. यानंतर प्रथम फलंदाजी करत आयर्लंडने १५४ धावा केल्या. तर संपूर्ण ताकदीनिशी उतरलेला भारतीय संघ प्रत्युत्तरात १५५ धावा करू शकला नाही. यासह २०२३ नंतर भारताने पहिल्यांदा टी-२० मालिका गमावली आहे.

अखेरच्या षटकात भारताला विजयासाठी २० धावांची गरज होती. पहिल्या☞(पान २ वर)

## सहल जीवावर बेतली; वेल्ह्यातील पाबे घाटात बस दरीत कोसळून मुंबईतील दोघांचा मृत्यू




**पुणे/प्रतिनिधी** :: राजगड किल्ला पाहण्यासाठी निघालेल्या मुंबईतील पर्यटकांची बस पाबे घाटातील दरीत कोसळल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. या अपघातात पर्यटक तरुणीसह दोघांचा मृत्यू झाला. काही पर्यटक जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विश्वास बाबुराव सातिम (वय २५), ध्वनी चंद्रेश ठक्कर (वय २३) अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. विश्वास आणि ध्वनी हे मुंबईतील एका खासगी कंपनीत कामाला आहेत. दोघे मूळचे मुंबईचे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील एका खासगी कंपनीतील २२ जण खासगी बसमधून राजगड किल्ला पाहण्यासाठी निघाले होते. रविवारी मध्यरात्री एकच्या सुमारास वेल्हे तालुक्यातील पाबे घाटातील तीव्र वळणावर बसचालकाचे ☞(पान २ वर)






## माहीम रेल्वे स्थानकाबाहेर थरार, आणखी एका प्रवाशावर चाकू हल्ला

**मुंबई/प्रतिनिधी** : अंधेरी-बोरिवली दरम्यान एका तरुणाची मुंबई लोकल रेल्वेत चाकूने हत्या केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. असाच एक प्रकार माहीम रेल्वे स्थानकाबाहेर घडला आहे. एकाने प्रवाशावर चाकूने हल्ला केला. चालत असताना धक्का लागल्याच्या रागातून आरोपीने हा हल्ला केला.

माहीम पश्चिममध्ये सेनापती बापट मार्गावर असलेल्या न्यू इंडिया बारजवळ गुरूवारी रात्री १०.१५ वाजता ही घटना घडली. पोलिसांनी तक्रारीवरून आरोपीविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी सांगितले की, नवीन प्रसन्ना (वय ३५) हे माहीम पश्चिम येथे मागील २५ वर्षांपासून कुटुंबासोबत राहतात. तो लोअर परळ येथील लोढा बिल्डिंगमध्ये ऑफिस बॉय म्हणून कामाला आहे. तो दररोज लोकल रेल्वेने कामावर जातो



आणि परत येतो. गुरुवारी रात्री परत येत असताना माहीम रेल्वे स्टेशनवर तो आला. सेनापती बापट मार्गावरून घरी जात असताना एका दुकानासमोर त्याचा एका व्यक्तीला धक्का लागला. धक्क्यामुळे त्या व्यक्तीचा मोबाईल खाली पडला.

अनावधानाने धक्का लागल्याने नवीनने त्या व्यक्तीची माफी मागितली. पण, त्या व्यक्तीने मी आताच मोबाईल दुरुस्त ☞(पान २ वर)

## गडचिरोलीत नक्षलवाद्यांचा भूमिगत शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

### लेथ मशीन, १५० क्लेमोर पाईप्स जप्त

**गडचिरोली /प्रतिनिधी** :: जिल्ह्यातील नक्षलविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना आणखी एक मोठे यश मिळाले आहे. महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील बालबेडा जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी जमिनीखाली लपवून ठेवलेला शस्त्रनिर्मिती कारखाना गडचिरोली पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) यांच्या संयुक्त कारवाईत उद्ध्वस्त करण्यात आला. या कारवाईत ५ ते ६ टन वजनाची लेथ मशीन, १५० क्लेमोर व



बीजीएल पाईप्स, २२० बारा बोअर पाईप्स तसेच शस्त्रनिर्मितीसाठी वापरले जाणारे मोठ्या प्रमाणातील साहित्य जप्त करण्यात आले. दुर्गम भागातून हे साहित्य ☞(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला अमरावतीत उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारताचा पोलिओमुक्त दर्जा कायम राखण्यासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय लसीकरण दिन अंतर्गत रविवारी (दि. २८ जून) अमरावती महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम मोठ्या उत्साहात आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आली. शहरातील सर्व शहरी आरोग्य केंद्रे, पोलिओ लसीकरण बूथ, बसस्थानके, रेल्वे स्थानक, सार्वजनिक ठिकाणे तसेच विशेष भ्रमणशील पथकांच्या माध्यमातून ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवून ही मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेत महापौर श्रीचंद तेजवानी, आमदार सुलभा खोडके, माजी पालकमंत्री अ‍ॅड. यशोमती ठाकुर, महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, गटनेता नाना आमले, सन्मा. नगरसेवक व नगरसेविका, उपायुक्त योगेश पीठे यांनी विविध पोलिओ लसीकरण केंद्रांना भेटी देऊन मोहिमेची पाहणी केली. त्यांच्या हस्ते बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेला शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पालकांशी संवाद साधत प्रत्येक बालकाला पोलिओची लस देण्याचे महत्त्वही अधोरेखित केले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत शहरातील सर्व शहरी आरोग्य केंद्रांमध्ये सकाळपासूनच लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय ज्या बालकांपर्यंत बूथवर येणे शक्य झाले नाही, अशा बालकांसाठी विशेष पथकांमार्फत घरोघरी भेटी देऊन लसीकरण करण्यात आले. स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम मजूर, वीटभट्ट्या, झोपडपट्ट्या, भटक्या-विमुक्त समाजाची वस्ती तसेच बसस्थानक आणि रेल्वे स्थानक परिसरातील बालकांना लसीकरणाचा लाभ मिळावा यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते.

महानगरपालिका प्रशासनाने या मोहिमेसाठी आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, स्वयंसेवी संस्था आणि विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेतले. शहरातील सर्व लसीकरण केंद्रांवर आवश्यक औषधसाठा, मनुष्यबळ आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मोहिमेचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सातत्याने देखरेख करण्यात आली.

या मोहिमेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर स्वाती कोवे, डॉक्टर संदीप पाटबागे, डॉक्टर फिरोज खान, १३ शहरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरोग्य सेवक, स्टाफ नर्स उपस्थित होते.

# जिल्हा बँकेच्या कर्मचारी वर्गाकडून अध्यक्ष आ.बच्चू कडू व संचालक मंडळाचा सत्कार

## शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून दिल्याबद्दल रक्तदान करून कृतज्ञता

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्मचारी पतसंस्था (रजि. क्र. १३०६) यांच्या वतीने आज जाधव पॅलेस, अमरावती येथे बँकेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू, उपाध्यक्ष अभिजीतजी ढेपे तसेच संपूर्ण संचालक मंडळाचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल तसेच बँकेतील कर्मचारी वर्गाचे विविध प्रलंबित प्रश्न सोडविल्याबद्दल कर्मचारी वर्गाने रक्तदान शिबिर आयोजित करून आपल्या कृतज्ञतेची अनोखी भावना व्यक्त केली.



या कार्यक्रमास बँकेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू, उपाध्यक्ष अभिजीतजी ढेपे, संचालक सुधाकरराव भारसाकळे, बाबूजी गायगोले, आनंदराव काळे, दयाराम काळे, सुनील वऱ्हाडे, नरेशचंद्र ठाकरे, अजय मेहकरे, हरिभाऊ मोहोड, सुरेखा ठाकरे, चित्रा डहाणे, प्रशांत डहाणे तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र बकाल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी, कर्मचारी व विविध शाखांतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात कर्मचारी प्रतिनिधींनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, विद्यमान अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळाने कर्मचारी वर्गाचे प्रश्न वेळोवेळी समजून घेत सकारात्मक भूमिका घेतली. कोणत्याही कर्मचाऱ्यावर हेतुपुरस्सर किंवा अन्यायकारक कारवाई न करता संवाद, विश्वास आणि समन्वयाच्या माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लावण्यात आले. त्यामुळे कर्मचारी वर्गामध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून जिल्हा बँकेबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे, अशी भावना यावेळी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

यासोबतच बँकेच्या माध्यमातून सुशासनाची संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात आली. बँकेचे खरे मालक असलेल्या शेतकऱ्यांशी सन्मानाने व सेवाभावी वृत्तीने वागण्याबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले. विविध कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि संवाद बैठकींच्या माध्यमातून सेवा अधिक परिणामकारक करण्यावर भर देण्यात आला. त्याचा सकारात्मक परिणाम आज जिल्ह्यातील विविध शाखांमध्ये दिसून येत असून बँकेचे कर्मचारी अधिक तत्परतेने शेतकऱ्यांना सेवा देत आहेत.

# शाळा सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला मनपा शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी एकदिवसीय कार्यप्रेरणा शिबिर

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षण सभापती महानगरपालिका अ‍ॅड प्रीती हर्षल रेवणे अमरावती यांच्या कल्पनेतून शिक्षणतज्ञ, लेखक, कवी, विचारवंत हेरंब कुलकर्णी यांच्या प्रमुख मार्गदर्शनामध्ये प्रथमतः अमरावती महानगरपालिका संचालित ६३ शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षकांकरिता दिनांक २९ जून २०२६ रोजी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृह मुख्य इमारत राजकमल चौक अमरावती येथे एक दिवशीय कार्यप्रेरणा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्य प्रेरणा शिबिराचे



उद्घाटन महापौर , उपमहापौर, आयुक्त , अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त महानगरपालिका अमरावती यांच्या हस्ते होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने माझी शाळा बदलताना, स्वतःला समृद्ध कसे कराल? अध्ययन अध्यापनातील शिक्षकांची भूमिका, विद्यार्थी व सध्याची शिक्षण पद्धती, AI चे शिक्षण पद्धतीतील स्थान व दिशा, सध्याच्या काळात इंग्रजी भाषेचे महत्व व त्यासाठी शिक्षकांची तयारी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार बदलती शिक्षण प्रक्रिया, शिक्षण संक्रमण यासारख्या विविध विषयांवर कार्यप्रेरणा शिबिरांमध्ये मार्गदर्शन होणार आहे. सदर कार्य प्रेरणा शिबिराकरिता १००% शिक्षकांनी उपस्थित राहण्यासंदर्भात आवाहन शिक्षणाधिकारी महानगरपालिका अमरावती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वीज कोसळून दोघे जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** वीज कोसळल्याच्या घटनांमध्ये दोन जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये बीबीचंद वासुदेव राठोड (वय ४२), किशन धुमा राठोड (वय ५५, दोघेही भिवापूर, तिवसा) यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुऱ्हा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भिवापूर येथे सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. बीबीचंद राठोड आणि किशन राठोड हे दोघे शेतात काम करीत असताना अचानक आकाशीय वीज कोसळली.

या घटनेत दोघेही जखमी झाले. त्यांना तातडीने कुऱ्हा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्रकृती लक्षात घेता पुढील उपचारासाठी त्यांना अमरावती येथे रेफर करण्यात आले. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना पावसाळ्यात उघड्या मैदानात, झाडाखाली तसेच उंच ठिकाणी थांबणे टाळण्याचे आवाहन केले आहे. तसेच हवामान विभागाच्या इशाऱ्यांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घेण्याचेही सांगितले आहे.

# माहिती अधिकार कायद्यावर नवे निर्बंध; पारदर्शकतेला सरकारचा लगाम?

**अचलपूर/प्रतिनिधीः-** माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत राज्य शासनाने लागू केलेल्या नव्या नियमांमुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अर्ज शुल्कात वाढ, शब्दमर्यादा निश्चिती आणि विविध अटी लागू केल्याने सामान्य नागरिकांना माहिती मिळवणे अधिक कठीण होणार असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

नवीन नियमांनुसार आरटीआय अर्जासाठी शब्दमर्यादा घालण्यात आली असून 'एक अर्ज – एक विषय' ही अट बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच अर्जासोबत ओळखपत्र जोडणे आवश्यक करण्यात आले आहे. माहितीच्या प्रतींसाठीही वाढीव शुल्क आकारले जाणार आहे. दरम्यान, आरटीआय कार्यकर्त्यांनी या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. धामणगाव गढी येथील आरटीआय कार्यकर्ते सागर डांगे यांनी सांगितले की, शब्दमर्यादा आणि शुल्कवाढ ही थेट माहिती मिळवण्याच्या हक्कावर गदा आणणारी आहे. शासन पारदर्शकतेऐवजी माहिती लपविण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि पोहरा पूर्णा गावाचे सरपंच गजानन लांजेवार यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, माहिती अधिकार हा सामान्य माणसाचा हक्क आहे. अशा प्रकारच्या नियमांमुळे गरीब व ग्रामीण नागरिक माहितीपासून वंचित राहतील.' काही कार्यकर्त्यांनी तर या नियमांविरोधात आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. 'हे नियम त्वरित मागे घ्यावेत, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.दरम्यान, सरकारकडून या नियमांचे समर्थन करताना अर्जांचा गैरवापर रोखणे आणि प्रक्रिया सुलभ करणे हा उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, या निर्णयाविरोधात राज्यभरातून नाराजी व्यक्त होत असून नियम मागे घेण्याची मागणी जोर धरत आहे.एकूणच, माहितीचा अधिकार कायद्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या पारदर्शकतेवर या नव्या नियमांचा परिणाम होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# १ व १० वरील उर्वरित

### राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा

जात आहे. पुढील तीन दिवसांनी कमाल तापमानात ३ ते ५ अंश सेल्सिअसने घट होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला असून सोमवारी राज्यातील बहुतांश जिल्ह्यांना हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. तसेच २९ ते २ जुलै दरम्यान राज्याच्या उत्तर किनारपट्टिवर आणि समुद्रात वादळी हवामान राहण्याची शक्यता आहे. या दरम्यान ताशी ४० ते ५० किमी वारे वाहण्याचा अंदाज असून वाऱ्यांचा वेग वाढून तो ६० किमीपर्यंतही पोहोचण्याची शक्यता आहे. या दरम्यान मच्छिमारांनी या भागात जाऊ नये, अशी सूचना हवामान विभागाकडून देण्यात आली आहे.

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

केला आहे. मात्र, अपघाताचे नेमके कारण, कंटेनरची उभी करण्याची परिस्थिती, रस्त्यावरील सुरक्षिततेचे नियम पाळण्यात आले होते का, तसेच इतर तांत्रिक बाबींचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या दुर्घटनेची माहिती चंद्रपूरमध्ये पोहोचताच बाबुपेठ परिसरात शोककळा पसरली. एकाच कुटुंबातील पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

### 'तर ओमराजेंना उमेदवारी दिलीच

मग आम्ही ओम बिर्ला यांना घटनेतील एक नियम दाखवला. आता ते म्हणत आहेत की ९ पैकी ६ म्हणजे दोन तृतियांश झाले. मात्र, माझ्या आता कानावर असं आलं की या सहा खासदारांचं तिकडे जायचं कधीच ठरलं होतं. फक्त ओमराजे निंबाळकर हे जरा अडून बसले होते. कारण त्यांना माहिती होतं की पाच झालेत, पण सहा होईपर्यंत दोन तृतियांश होत नाहीत, म्हणून थोडं ताणून धरलं. मग भाव वाढवला आणि मग तिकडे गेले', असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला.

'तेव्हाच शंकेची पाल चुकचुकली होती', उद्धव ठाकरेंचा गौप्यस्फोट

'जेव्हा आम्ही खासदारांची बैठक बोलावली होती. तेव्हा त्या सहापैकी सहाही खासदारांनी बैठकीला उपस्थित न राहण्यासाठी कारणं सांगितली होती. यवतमाळच्या खासदाराने सांगितलं होतं की माझ्या मुलीच्या सोयरीकीचं काम आहे. मग मी म्हटलं की नका येऊ. हिंगोलीचा गद्दार म्हणाला होता की माझा मुलगा निवडणूक लढवत आहे. मग मी म्हटलं की बरं नका येऊ. धाराशिवचा गद्दार म्हणाला होता की माझा मुलगा हॉस्पिटलमध्ये आहे आणि शिर्डीच्या खासदारांची पत्नी आजारी होती, मग मी म्हटलं की नका येऊ. मात्र, तेव्हा व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये मला जेव्हा सगळ्यांचे चेहरे दिसायला लागले तेव्हा मी ओमराजे निंबाळकर यांना विचारलं होतं की, तुमचा चेहरा बरोबर दिसत नाहीये. काही तणाव आहे का? की रात्री झोप झालेली नाही? तेव्हा मला ओमराजे निंबाळकर यांनी सांगितलं होतं की, नाही-नाही, माझं सर्व बरोबर आहे. मात्र, तेव्हाच माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती की ओमराजे निंबाळकर यांचा चेहरा साफ नाहीये, यांच्या मनात पाप आहे', असा गौप्यस्फोट मोठा उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

### उद्धव ठाकरेंनी गांभीर्याने आत्मपरीक्षण

असला, तरी वैयक्तिक द्वेषातून कोणाच्याही आई-वडिलांवर चिखलफेक करणे आणि शिवराळ भाषा वापरणे, हे राऊत यांच्यासारख्या प्रगल्भ आणि अभ्यासू व्यक्तीकडून अजिबात अपेक्षित नाही. त्यांनी आणि त्यांच्या पक्षाने आता आत्मपरीक्षण करून संयम आणि राजकीय भान राखण्याची नितांत गरज आहे', असे रामदास आठवले उद्धव ठाकरेंना उद्देशून म्हणाले आहेत.

'या संपूर्ण प्रकारावर उद्धव ठाकरे आणि ठाकरे कुटुंबाने गांभीर्याने आत्मपरीक्षण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आपल्या सहकाऱ्यांकडून वापरली जाणारी ही भाषा आणि वैयक्तिक पातळीवरची चिखलफेक महाराष्ट्रासमोर कोणता आदर्श ठेवत आहे, याचा विचार नेतृत्वाने करायला हवा', असा सल्ला रामदास आठवले यांनी उद्धव ठाकरेंना दिला आहे.

'राजकारणात आपण एकमेकांचे विरोधक असू शकतो, पण एकमेकांचा आदर राखण्याचे भान आणि महाराष्ट्राची राजकीय संस्कृती आपण सर्वांनीच जपली पाहिजे', अशी अपेक्षा रामदास आठवलेंनी संजय राऊतांकडून व्यक्त केली आहे.

### आयर्लंडचा भारतावर ऐतिहासिक

चेंडू वाईड त्यानंतर पहिल्या दोन लीगल चेंडूंवर ३ धावा केल्यानंतर हर्षित राणाने चौकार लगावला. यानंतर तिसऱ्या चेंडूवर एक धाव घेतली आणि चौथा चेंडू पुन्हा वाईड टाकला, चौथ्या लीगल चेंडूवर अर्शदीपने एक धाव घेत हर्षित राणाला स्ट्राईक दिली. हर्षित राणा मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात हॅरी टेक्टरच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. अखेरच्या चेंडूवर प्रिन्स यादवने येऊन षटकार लगावला, पण आयर्लंडने एका धावेने सामना जिंकला.

आयर्लंडने दिलेल्या १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरूवात खूपच खराब झाली. जय मुंद्राने पहिल्याच षटकात संजू सॅमसन व अभिषेक शर्मा यांना गोल्डन डकवर बाद केलं. यानंतर श्रेयस अय्यरला जय मुंद्राने १० धावांवर क्लीन बोल्ड केलं. तर इशान किशन धाव घेण्याच्या प्रयत्नात १२ धावांवर धावबाद झाला. तिलक वर्माने भारताचा डाव सावरत ५५ धावा करत अर्धशतक झळकावलं. पण भारताने ठराविक अंतराने गमावलेल्या विकेट्समुळे आयर्लंड सामन्यात कायम राहिला. अक्षर पटेल १४ धावा, तर शिवम दुबे २० धावा आणि हर्षित पटेलने अखेरच्या षटकात २१ धावा करत संघाच्या विजयाची शक्यता कायम ठेवली होती, पण तोही मोठा फटका खेळताना झेलबाद झाला.

### सहल जीवावर बेतली; वेल्ह्यातील

नियंत्रण सुटले. बस घाटातील संरक्षक कठड्यावर आदळली. संरक्षक कठडा तोडून बस उलटून दरीत कोसळली. बस दरीतील झाडावर अडकली. या अपघाताची माहिती मिळताच वेल्हे पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी, तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागातील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

ग्रामस्थांच्या मदतीने पथकाने त्वरित मदतकार्य सुरू केले. वेल्हे पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेवते, पोलीस कर्मचारी नीलेश राणे, आकाश पाटील, पंकज मोघे, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे तानाजी भोसले, गणेश सपकाळ, संदीप सोळसकर, कृष्णा मरगळे यांनी मदतकार्य करुन बसमध्ये अडकलेल्या जखमींना दरीतून बाहेर काढले.

### माहीम रेल्वे स्थानकाबाहेर थरार,

करून आणल्याचे सांगत पैसे मागितले. मात्र, खाली पडल्यामुळे मोबाईलचे कोणतंही नुकसान झाले नाही, असे नवीन म्हणाला. मात्र, आरोपी वाद घालतच राहीला. त्यानंतर नवीन तिथून निघाला, पण आरोपीने त्याचा पाठलाग केला. बारच्या बाहेर आल्यानंतर त्याने पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. नवीनने त्याला परत समजावण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपीने थेट चाकू काढला आणि त्याच्या पोटाच्या डाव्या बाजूला वार केला. त्यात तो जखमी झाला. चाकू हल्ल्यात नवीन जखमी झाला. तो रक्तबंबाळ अवस्थेतच घरी पोहोचला. त्याचा भाऊ सचिन आणि चुलत भावाने त्याला सायन रुग्णालयात नेले. तिथे त्याच्यावर उपचार करण्यात आले. शुक्रवारी पहाटे नवीनने माहीम पोलीस ठाण्यात जाऊन या प्रकरणी तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेत आरोपीचा शोध सुरू केला आहे.

### गडचिरोलीत नक्षलवाद्यांचा भूमिगत

बाहेर काढणे अशक्य असल्याने ते घटनास्थळीच सुरक्षितपणे नष्ट करण्यात आले.

सुरक्षा दलांवर मोठे हल्ले घडवून आणणे, निवडणुका किंवा नक्षल सप्ताहाच्या काळात घातपात करणे आणि शस्त्रसाठा वाढविणे या उद्देशाने नक्षलवाद्यांनी हा गुप्त कारखाना उभारल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यापूर्वी २३ आणि २७ मे रोजी अशाच कारवायांमध्ये मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला होता. त्यानंतर आता या कारवाईमुळे नक्षलवाद्यांच्या रसद व्यवस्थेला आणखी मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

गुप्त माहितीच्या आधारे संयुक्त मोहीम

बालबेडा जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी शस्त्रनिर्मितीचे साहित्य दडवून ठेवल्याची गोपनीय माहिती गडचिरोली पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जून रोजी विशेष अभियान पथक (सी-६०), प्राणहिता पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक (बीडीडीएस) तसेच सीआरपीएफच्या जवानांच्या एकूण सहा तुकड्या शोध मोहिमेसाठी रवाना करण्यात आल्या.

### आदर्श शाळांच्या निधीचा पूर्ण

अभ्यासिका, संगणक सुविधा यासारख्या विद्यार्थ्यांसाठी उपयोगात येतील अशा सुविधा उभारण्यात याव्यात.

शासकीय शाळांचा स्वच्छतेचा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे आदर्श शाळेचे बांधकाम करताना या शाळेचा स्वच्छतेचीही काळजी राखली जाईल, यासाठी प्रयत्न करण्यात यावे. आदर्श शाळा या खऱ्या अर्थाने आदर्श व्हाव्यात यासाठी आवश्यकता भासल्यास जिल्हा नियोजनच्या निधीतून मागणी करण्यात यावी. तसेच जिल्ह्यातील शाळांमधील स्वच्छतागृहांचा आढावा घेऊन या ठिकाणच्या सुविधा निर्माण करण्यात याव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीनंतर डॉ. भोयर यांनी मालटेकडी रोडवरील नियोजित डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुलाच्या जागेची पाहणी केली. यावेळी आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, महापौर श्रीचंद तेजवानी आदी उपस्थित होते. संकुलाची इमारत भव्यदिव्य असावी, तसेच या ठिकाणी कॉन्फरन्स रूम करण्यात यावी. यासोबतच विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकाही निर्माण करण्यात यावी. सध्यास्थितीत शासकीय कर्मचाऱ्यांचे निवासस्थान बांधकामाबाबत पुनर्विचार करण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. या संकुलाची घोषणा अर्थसंकल्पात झाल्यामुळे आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात याव्यात. ज्यामुळे डिसेंबर महिन्यात होणाऱ्या अधिवेशनात निधीची तरतूद करण्याविषयी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

### अंजनगावातील सोमवार बाजारात

सोमवार बाजारात फिरून या बाजारात भेसळयुक्त जीवनावश्यक वस्तूंची कशी विक्रीं होते याची माहिती घेऊन कार्यवाही करण्याची मागणी नागरिक करीत आहे.

**प्रशासनाचे दुर्लक्ष का?**

सोमवार बाजारात जवळपास ७ हजारांहून अधिक ग्राहक येतात, पण एकही अन्न निरीक्षक फिरकत नाही, असा आरोप जनतेत केल्या जात आहे.सोमवारचा बाजार म्हणजे ग्रामीण जनतेची 'लाइफलाइन'. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तोच बाजार आता 'आरोग्याला धोक्याचा' बनला आहे. 'घटना घडल्यावर जागे होण्या'ऐवजी अन्न भेसळ औषधी प्रशासनाने तातडीने धडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अंजनगाव सुर्जीकडे लक्ष न देणाऱ्या अन्न औषधी प्रशासनाच्या अमरावतीच्या अधिकाऱ्यांविषयी लवकरच संबंधित विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्याकडे जनतेचे निवेदन दिल्या जाणार असल्याचे समजते.

### तिवसा तालुक्यात ५७५८

पोलिओ डोज देण्यात आल्याने १०५ टक्के पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वीरित्या पार पडली. या मोहीमेसाठी तिवसा तालुका आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी व तालुक्यातील आशावर्कर, अंगणवाडी सेविका,मदतनीस यांनी मोलाची कामगिरी बजावली.

जी. प.शाळा तिवसा येथील अंगणवाडी केंद्र क्रमांक ४ व बूथ क्रमांक ५ येथे बालकांना आशावर्कर, अंगणवाडी सेविका व मदतनिस यांनी डोज दिला.

### शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले

आल्यास थेट माझ्याशी संपर्क साधावा,' असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, शेतात उपस्थित असतानाच पावसाला सुरुवात झाल्याने शेतकरी व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी नरेश बर्वे, रावसाहेब लव्हाळे, माधव अवघड, आशिष मेहत्रे, प्रशांत धवे, शाम गावंडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

### बसस्थानकातील अट्टल दुचाकी

एएच ६६७५) मोटारसायकल अमरावती बसस्थानकाच्या पार्किंगजवळ हँडल लॉक करून उभी केली होती. रात्री परत आल्यानंतर त्यांची दुचाकी जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. परिसरात शोधाशोध करूनही वाहन न मिळाल्याने त्यांनी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुप्त माहितीदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली. तपासादरम्यान आकाश संदीपराव सुकळकर (वय ३३, रा. लाखरायाजी, ता. दिग्रस, जि. यवतमाळ, सध्या रा. चांदणी चौक, शेगाव) याने ही चोरी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडून चोरीस गेलेली स्प्लेंडर प्लस तसेच आणखी एक हिरो एचएफ डिलक्स मोटारसायकल असा एकूण सुमारे ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये स्प्लेंडर प्लस (एमएच २७ एएच ६६७५) किंमत अंदाजे १५ हजार रुपये आणि हिरो एचएफ डिलक्स (एमएच ३० बीयू २८४२) किंमत अंदाजे २५ हजार रुपये यांचा समावेश आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन सिरसाट व पोलीस निरीक्षक (गुन्हे) मंगला वाकोडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक तुषार गावंडे, रंगराव जाधव व त्यांच्या पथकाने केली.

### मेहेरबाबा कॅन्टीन परिसरात जुगार

प्रमोदराव राऊत (वय ३०, रा. सरोज कॉलनी) यांना ताब्यात घेतले. आरोपींकडून ५,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणातील अन्य तीन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि नितीन शिंदे व त्यांच्या पथकाने केली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २९ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## कारंजा नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचा गलथान कारभार

### गुरुदेव नगर व वनदेवी नगरातील नाली कामे रखडली ; नागरिक त्रस्त



■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा नगर परिषदेच्या बांधकाम विभागाच्या नियोजनशून्य, दुर्लक्षपूर्ण आणि विस्कळीत कारभारामुळे शहरातील गुरुदेव नगर व वनदेवी नगर परिसरातील नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. वर्षभरापूर्वी या भागात सिमेंट काँक्रीट रस्ता व सांडपाण्याच्या नालीचे बांधकाम करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात केवळ रस्त्याच्या कामावर भर देण्यात आला असून, सांडपाण्याच्या योग्य विल्हेवाटीसाठी अत्यावश्यक असलेल्या नाली बांधकामाकडे दुर्लक्ष झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गुरुदेव नगर परिसरात काही ठिकाणी नागरिकांनी केलेली अतिक्रमणे तसेच कंपाउंड वॉल रस्त्याच्या व नालीच्या हद्दीत येत असल्याचे सांगितले जात आहे. अशा परिस्थितीत नगरपरिषद प्रशासनाने नियमानुसार अतिक्रमण हटवून नियोजनबद्ध पद्धतीने नालीचे बांधकाम करणे अपेक्षित होते. मात्र प्रशासनाने अतिक्रमण कायम ठेवत उपलब्ध जागेतच नालीचे अपूर्ण व विस्कळीत बांधकाम सुरू केले. त्यामुळे काही ठिकाणी नालीची रुंदी कमी झाली, तर काही ठिकाणी उतार व सलगता नसल्याने संपूर्ण नालीचे काम आजही अर्धवट अवस्थेत पडून आहे.

विशेष म्हणजे, काही ठिकाणी कंपाउंड वॉल अतिक्रमणामध्ये असूनही त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. याच अतिक्रमणांमुळे काही ठिकाणी नालीचे बांधकाम पूर्णपणे रखडले असून, प्रशासनाने अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याऐवजी अपूर्ण काम करून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.नालीचे काम अपूर्ण राहिल्यामुळे सांडपाणी थेट रस्त्यावर साचत आहे. परिणामी परिसरात दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि अस्वच्छता वाढली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचल्यामुळे पादचारी, ज्येष्ठ नागरिक, महिला व शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात स्थानिक नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाकडे अनेक वेळा तोंडी तसेच लेखी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप केला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित अधिकारी केवळ आश्वासने देत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याच धर्तीवर वनदेवी नगर परिसरातील नाली बांधकामातही अनेक त्रुटी असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. अपूर्ण नियोजन, निकृष्ट दर्जाची अंमलबजावणी, तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष आणि वेळेत कामे पूर्ण न झाल्याने विकासकामांच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका उपस्थित होत आहेत. शासनाकडून विकासकामांसाठी लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जात असताना प्रत्यक्षात त्याचा अपेक्षित लाभ नागरिकांना मिळत नसल्याची भावना व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी गुरुदेव नगर व वनदेवी नगर येथील प्रलंबित नाली बांधकाम तातडीने पूर्ण करावे, आवश्यक त्या ठिकाणी नियमांनुसार अतिक्रमण हटवून दर्जेदार व तांत्रिक निकषांनुसार काम करावे, तसेच संबंधित कामातील हलगर्जीपणाची चौकशी करून जबाबदार अधिकारी, अभियंते आणि कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष न दिल्यास नागरिकांना संघटित करून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही स्थानिक रहिवाशांनी दिला आहे. त्यामुळे कारंजा नगर परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शेगांवच्या गजानन महाराजांच्या पालखीचे मालेगांव नगरात आगमन

### गण गण गणात बोतेच्या गजरात दुमदुमली मालेगांव नगरी





■ प्रतिनिधी | मालेगाव ■

श्री संत गजानन महाराज पालखीचे मालेगांव तालुक्यात भव्य स्वागत करण्यात आले. शेगांव येथून दरवर्षी श्री संत गजानन महाराज यांची पालखी आषाढी एकादशी करिता श्री संत गजानन महाराज यांची पालखी पंढरपूर कडे जात असते या वर्षी पालखीचे ५७ वे वर्ष असून शेगांव वरून या वर्षी पालखीचे प्रस्थान झाल्यानंतर अकोला, वाडेगांव , पातुर, मार्गे मेडशी , श्री नाथ नंगे महाराज संस्थान क्षेत्र डव्हा ला २७ जुन रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास आगमन झाले तिथुनच २८ जुन २०२६ रोजी सकाळी श्री नाथ नंगे महाराज संस्थान क्षेत्र डव्हा येथून मालेगांव कडे प्रस्थान झाले.

मालेगांव मध्ये सकाळी ८ वाजता प्रवेश झाला व गावोगावी पालखीचे मोठ्या दिमाखात आणि जल्लोषात स्वागत केले जाते गावातील महिला , लहान मुले व मोठे पुरुष यांनी श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेण्याकरिता व आगमनाने उत्सावून जातात सकाळी ८ वाजता मालेगांव मध्ये प्रवेश होताच जुनी पंचायत समिती ग्राउंड वर येवून तेथे पंचायत समिती अधिकारी व कर्मचारी यांच्यातर्फे हजारो वारकऱ्यांनी व भाविकांना नास्ता व चहा पाणी चे आयोजन करण्यात आले होते ९.३० वाजता मालेगांव शहरात

**पंचायत समिती तर्फे ५० वर्षा पासून नास्ता :** पालखी ला पन्नास वर्षांपासून मालेगाव पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी या पालखीला पुरी व आलुची भाजी चा पोटभर नाश्ता देत असतात अतिशय नियोजनबद्ध अशी रचना त्यांची केलेली असते

**'श्रीं'ची वाट यंदाही बिकटच ! :** शेगाव-पंढरपूर पालखी मार्गावरील मेडशी-डव्हा फाटा हा सुमारे ११ किलोमीटरचा रस्ता गेल्या चार वर्षांपूर्वीपासून अपूर्ण अवस्थेत आहे. विशेषतः मेडशी गावाजवळील पूल तसेच कुरळा ते डव्हा फाटा दरम्यानचे काम रखडले आहे. त्यामुळे यंदाही श्रींची वाट बिकटच राहिली असून भाविकांकडून व नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

**पालखी आणि पाऊस समिकरण :** संत गजानन महाराजांचे पालखी जोपर्यंत मालेगाव शहरात येत नाही तोपर्यंत पाऊस येत नाही असे जुने लोक सांगत आहेत तोच अनुभव यावर्षी सुद्धा आला जशी पालखी डव्हाला आली तसा मालेगाव तालुक्यात खूप मोठा पाऊस पडला आजही दिवसभर पावसाचे वातावरण होते

**मुंदडा परिवार तर्फे दुपारचे भोजन :** गेल्या दोन पिढ्यापासूनमाहेश्वरी भवन येथे पळशी वाले मुंदडा या परिवारातर्फे गोपाल मुंदडा व सतु मुंदडा हे दोन भाऊ पालखीला दुपारचे भोजन देत असतात त्यासोबत गावातील मंडळी सुद्धा या भोजनाचा लाभ घेत असते.

पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली मालेगांव शहरात जागोजागी रस्त्यावर महिलांनी रांगोळी काढून मालेगांवात पालखीचे स्वागत करण्यात आले टाळ मृदंगाच्या गजरात भाविक तल्लीन होवून जातात व भजन आणि किर्तनाच्या आवाजाने श्री संत गजानन महाराज यांच्या भक्तिमय वातावरणात भाविक तल्लीन होवून गेले मालेगांव मध्ये काही भाविकांनी वारकऱ्यासाठी जागो जागी थंड पेय जल सरबत आरोग्यासाठी वस्तु वाटप करण्यात आले मालेगांव मधून या पालखीची सुरुवात जुनी पंचायत समिती येथुन सुरू झाली नगरपंचायत कार्यालया समोरून, शिव चौक ,गांधी चौक, चव्हाण हॉस्पिटल समोरून जोगदंड हॉस्पिटल समोरून, जुने बस स्थानक नंतर माहेश्वरी भवन मध्ये आल्यावर वारकरी व भक्तांना सत्तू भाऊ मुंदडा यांच्या कुटूंबाकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला आहे आणि दुपारी २ वाजता श्री संत गजानन महाराज यांची पालखीचे शिरपुर जैन कडे प्रस्थान झाले मालेगांव पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजेश खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली जागो जागी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता .

## १८९ पुरस्कारार्थ्यांचा होणार गौरव : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

### राज्यपाल व मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कृषी दिनानिमित्त राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळा- २०२६

■ प्रतिनिधी | वाशिम ■

हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिनांक १ जुलै २०२६ रोजी डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई-१८ येथे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात सन २०२३ व २०२४ या वर्षातील राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण करण्यात येणार असून कृषी, कृषि संलग्न क्षेत्र, फलोत्पादन, सेंद्रिय शेती, कृषी विस्तार व कृषी विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण १८९ शेतकरी, संस्था व कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.



या पुरस्कार सोहळ्यास महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले, राज्यमंत्री(कृषी) ॲड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री(मृद व जलसंधारण ) इंद्रनील नाईक व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि कृषी विस्तार क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. कृषी क्षेत्रातील उत्कृष्टतेचा सन्मान करून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देणे हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार(सर्वसाधारण गट/आदिवासी गट ) तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार(आयुक्तालय/मंत्रालय स्तर) या विविध पुरस्कारांचा समावेश आहे. राज्यभरातील पुरस्कारार्थी, त्यांचे कुटुंबीय, कृषी अधिकारी, कृषी तज्ज्ञ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार असून महाराष्ट्राच्या कृषी विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या कृषी क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा हा सन्मान सोहळा ठरणार आहे.

## वाशिम-शिरपूर जैन रस्त्यासाठी केंद्रीय मंत्री गडकरींना साकडे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील विश्व प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आणि जैनांची काशी म्हणून ओळख असलेल्या शिरपूर जैन येथील विविध धार्मिकस्थळावर येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी वाशिम ते शिरपूर जैन हा मार्ग तीर्थक्षेत्र मार्ग म्हणून विकसित करावा या मागणीसाठी भारतीय जैन संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष निलेश सोमाणी यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना रविवार दि.२८ जून रोजी साकडे घातले.

शिरपूर गावात जैन धर्मातील २३ वे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ भगवंताचे जग प्रसिद्ध मंदिर असून हे मंदिर श्वेतांबर व दिगंबर जैन समुदायाचे श्रद्धास्थान आहे.या मंदिरात शेकडो वर्षांपासून पार्श्वनाथ भगवंताची मूर्ती हवेत तरंगत्या स्थितीत आहे. त्याशिवाय जानगीरबाबा संस्थान, ओंकारगीर बाबांची समाधी व मंदिर तसेच मिर्झा मिया बाबांचा दर्गाही येथे आहे. त्यामुळे राज्यभरातील लाखो भाविकांसह राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तसेच देशातील इतर विविध राज्यातून हजारोंच्या संख्येत सकल जैन समाजातील श्रद्धाळू दर्शन-पूजनासाठी येथे कायम येत असतात. या सर्व यात्रेकरूंना वाशिम रेल्वेस्थानक जवळचे असून वाशिम ते शिरपूर जैन हे सोनखास-तामसी करंजी मार्गे फक्त २० किलोमीटर अंतरावर आहे. यामुळे हा मार्ग चौपदरी

किंवा दोन पदरी तीर्थभूमी महामार्ग म्हणून विकसित करावा अशी मागणी नामदार गडकरी यांना नागपूर येथे त्यांच्या निवासस्थानी दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. वाशिम-शिरपूर जैन या तीर्थभूमी महामार्गास केंद्र शासनाने त्वरित मान्यता प्रदान करून हा महामार्ग झाल्यास संपूर्ण राज्यासह परप्रांतीय भाविकांसाठी, तसेच या महामार्गावरून दरवर्षी कायम पायी जाणाऱ्या श्वेतांबर व दिगंबर जैन धर्माच्या धर्मगुरू व साधू भगवंत यांच्या पायदळ प्रवासासाठी (विहार) वरदान ठरणार आहे.या निवेदनावर सोमाणी यांच्यासह भारतीय जैन संघटनेचे (बीजेएस) चे प्रदेश प्रतिनिधी शिखरचंद बागरेचा यांनी स्वाक्षरी केली आहे.

यावेळी महाकाली संस्थानचे प्रमुख महंत गजानंद माऊली, डॉ.अविश दरेकर,संजीव भांदुर्गे उपस्थित होते.

## दोन थेंब जीवनाचे' : पोलिओमुक्त वाशिमसाठी जिल्हा प्रशासनाचे पाऊल; मोहिमेचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पाच वर्षांखालील प्रत्येक बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कोणतेही बालक या सुरक्षेपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व पालकांनी आपल्या पाल्याला जवळच्या लसीकरण केंद्रावर नेऊन या राष्ट्रीय मोहिमेला सक्रिय सहकार्य करावे,' असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हा रुग्णालय, वाशिम येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांनी एका लाभार्थी बालकाला पोलिओ



प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून वाशिम जिल्ह्यातील मोहिमेची अधिकृत सुरुवात केली. या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. महेशचंद्र चापे यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत पहिल्या दिवशी लसीकरणापासून वंचित राहिलेल्या उर्वरित ७ टक्के लाभार्थी बालकांचा आरोग्य विभागामार्फत घरोघरी जाऊन शोध घेतला जाणार आहे. यावेळी संबंधित बालकांनी बाहेरगावी, इतर जिल्ह्यात अथवा प्रवासादरम्यान पोलिओ प्रतिबंधक लसीची मात्रा घेतली आहे का, याची खातरजमा केली जाईल. तसेच, काही कारणास्तव पोलिओ लसीकरण बूथवर येऊ न शकलेल्या बालकांना त्यांच्या घरीच पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून लसीकरण पूर्ण करण्यात येणार आहे.

## पोलिओ प्रतिबंधक लसीचे बालकांना देण्यात आले डोज

■ प्रतिनिधी | मानोरा ■

शहर आणि तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये जिल्हा आरोग्य प्रशासनाच्या सूचनेनुसार पोलिओ निर्मूलन लसीचे डोज शून्य ते पाच वर्षे वयोगटाच्या बालकांना तालुका आरोग्य प्रशासनाच्या वतीने देण्यात आले. जागतिक आरोग्य संघटनेने जग पोलिओमुक्त करण्याचा संकल्प केलेला आहे त्या अनुषंगाने संपूर्ण राज्यामध्ये पोलिओ निर्मूलन करण्याच्या अनुषंगाने या लसीकरण मोहिमेचे आयोजन आज करण्यात आले होते यामध्ये शून्य ते पाच वर्षे वय असणाऱ्या बालकांना त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत शहर व तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय, आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये या लसीची डोज पाजण्यात आले.

सन २०११ नंतर भारतामध्ये पोलिओ झालेला रुग्ण आढळलेला नाही ही स्थिती कायम ठेवण्यासाठी ही लसीकरण मोहीम भविष्यात



कायम ठेवली जाणार असल्याचे आरोग्य प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले. मानोरा शहर व तालुक्यातील शून्य ते पाच वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओ निर्मूलन लस डोज पाजण्यापासून वंचित राहू नये यासाठी आरोग्य प्रशासनाने चोख व्यवस्था केलेली आढळून आली. शहर आणि तालुक्यामध्ये सकाळी आठ वाजेपासून तर सायंकाळी पाच वाजेपर्यंत शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पल्स पोलिओ लसीची डोस देण्यात आले. यासाठी १४० च्या वर पोलिओ लसीकरण बूथची व्यवस्था करण्यात आली होती. पल्स पोलिओ लस डोज पासून बालकांना ही लस देण्याची व्यवस्था पुढील तीन दिवसात करण्यात येणार असल्याची माहिती सुद्धा आरोग्य प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

## कांचन नदीच्या पुरामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

### नेतंसा–कोयाळी परिसरातील शेतांमध्ये माती वाहून गेली ; पेरण्या लांबण्याची शक्यता, शेतकरी चिंतेत

■ प्रतिनिधी | रिसोड ■

वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील नेतंसा–कोयाळी परिसरातील कांचन नदीला आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. या भागात मोठा पाऊस झाला नसतानाही बुलढाणा जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे कांचन नदीला पूर आला आणि नदीकाठच्या अनेक शेतांमध्ये पाणी शिरले.

या पुरामुळे अनेक शेतांतील सुपीक माती वाहून गेली असून नुकतीच केलेली पेरणीही बाधित झाली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना पुन्हा पेरणी करावी लागण्याची वेळ आली असून अतिरिक्त बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च वाढणार आहे. परिणामी शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पुरामुळे नेतंसा–कोयाळी मार्गही काही काळ



वाहतुकीसाठी बंद होता. दरम्यान, मागील दोन वर्षांपासून कांचन नदीला वारंवार पूर येत असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. नदीचे खोलीकरण करून कायमस्वरूपी पूरनियंत्रणाची उपाययोजना करावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी सातत्याने करत आहेत.

> 'रात्रभर झालेल्या पावसामुळे आमची संपूर्ण पेरणी वाहून गेली. बियाणे, खते आणि मशागतीवर मोठा खर्च केला होता, पण आता पुन्हा दुबार पेरणी करावी लागणार आहे. आमची आर्थिक परिस्थिती खूप बिकट झाली आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई द्यावी आणि कांचन नदीच्या पुराच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय करावा.'
>
> **नंदकिशोर बाजड**
> नुकसान ग्रस्त शेतकरी

मात्र, प्रशासनाकडून याकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून, भविष्यात अशा संकटाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

# ‘टीईटी’ पेपरफुटीवरून तीव्र संताप!



**पुणे -** राज्यात रविवारी ( २८ जून ) प्रस्तावित शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीमुळे पुढे ढकलावी लागली आहे. या पेपरफुटीमुळे शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातून राज्य सरकारवर टीका करण्यात येत असून, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनेही घरचा आहेर दिला.

‘राज्यभरातील १०२८ केंद्रांवर शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ (टीईटी) घेण्याचे प्रस्तावित होते. ‘नीट २०२६’च्या परीक्षेमधील गैरप्रकार लक्षात घेऊन परीक्षा परिषदेने सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजना केल्या होत्या. मात्र, शनिवारी (२७ जून) पहाटेच्या सुमारास गोपनीय माहितीच्या आधारे भिवंडी येथे काही व्यक्तींकडे प्रश्नपत्रिकेबद्दल माहिती असल्याचे समजल्याने भिवंडी पोलिसांनी धाड घातली. त्यानंतर तपासणीसाठी परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना बोलावून तातडीने पडताळणी केली असता, संबंधित व्यक्तींकडे ‘टीईटी’च्या २८ जून रोजीच्या प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न समान असल्याचे आढळून आले. याबाबत भिवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा पारदर्शकपणेच व्हावी, हा परीक्षा परिषदेचा आग्रह असल्याने याबाबत सखोल चौकशी होणे गरजेचे वाटल्याने ही परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. ‘टीईटी’ परीक्षेबाबतची ताजी माहिती परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल,’ असेही परीक्षा परिषदेने स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर, टीईटी पेपरफुटीचा महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या प्रसारमाध्यम विभागाचे अध्यक्ष अक्षय जैन यांनी निषेध केला. महाराष्ट्राची ओळख ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची, पारदर्शक परीक्षा व्यवस्थेची आणि गुणवत्तेच्या आधारे संधी देणाऱ्या राज्याची होती. मात्र, या सरकारच्या काळात विद्यार्थ्यांच्या भविष्याचा अक्षरशः बाजार मांडला गेला आहे. हा केवळ निष्काळजीपणा नसून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा, विश्वासाचा आणि भविष्याचा विश्वासघात आहे. देशभरात ५० हून अधिक पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. महाराष्ट्र आता त्या यादीत अव्वल आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. या संपूर्ण प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. तसेच जबाबदार अधिकाऱ्यांचीही चौकशी करून त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) परीक्षा परिषदेच्या कार्यालयासमोर शनिवारी आंदोलन करून पेपरफुटीचा निषेध केला. ‘पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर परीक्षा पुढे ढकलावी लागणे ही अत्यंत दुर्दैवी, संतापजनक आणि राज्याच्या परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे. राज्य शासन आणि शिक्षण विभागाला परीक्षा प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सुरक्षितता, गोपनीयता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यात गंभीर अपयश आले आहे. राज्य ते राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमधील गैरप्रकारांनी विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत केला आहे. प्रत्येक घटनेनंतर चौकशी, कठोर कारवाईची घोषणा करूनही अशा घटना पुन्हा-पुन्हा घडत आहेत. त्यामुळे शासनाची प्रतिबंधात्मक यंत्रणा आणि परीक्षा सुरक्षेची संपूर्ण व्यवस्था प्रभावीपणे कार्यरत नसल्याचे स्पष्ट होते. या प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि कालबद्ध चौकशी करून प्रत्येक दोषीवर कठोर फौजदारी कारवाई करावी. तसेच परिणामकारक आणि दीर्घकालीन उपाययोजना तातडीने अमलात आणाव्यात, अन्यथा विद्यार्थ्यांचा असंतोष अधिक तीव्र होईल,’ अशी भूमिका अभाविपचे प्रदेशमंत्री अथर्व कुलकर्णी यांनी मांडली.

# विश्वास नांगरे पाटील आज स्वीकारणार ‘चार्ज’

**नागपूर** - नागपूरच्यापोलिस आयुक्तपदी विश्वास नांगरे पाटील यांची नियुक्तीचा आदेश जारी होऊन पाच दिवस उलटून गेले आहेत. मात्र, तरीदेखील त्यांनी अद्यापही आयुक्तपदाचा पदभार स्वीकारलेला नसल्याने विविध चर्चांना उधाण आले होते. मात्र, ते सोमवारी नागपूरची सूत्रे हाती घेणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. नवी मुंबईतील हिंदू संमेलनात त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघासंदर्भात केलेल्या स्तुतीपर भाषणाच्या व्हिडीओमुळे राजकीय वातावरण तापले असताना त्यांना राजकीय विरोधाला सामोरे जावे लागण्याची चिन्हे आहेत.

गृह विभागाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अपर पोलिस महासंचालकपदी बदली करण्यात आली आहे. तर अपर पोलिस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांच्याकडे नागपूरची जबाबदारी देण्यात आली आहे. डॉ. सिंगल यांची निरोपाची पत्रपरिषददेखील आटोपली. नियुक्तीची घोषणा झाल्यानंतर सामान्यतः काही दिवसांतच वरिष्ठ अधिकारी पदभार स्वीकारतात.



मात्र, विश्वास नांगरे पाटील यांनी अद्याप नागपूर पोलिस आयुक्तपदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारलेला नसल्याने विविध तर्क-वितर्कांना उधाण आले होते. पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारीदेखील यावर बोलण्याचे टाळत होते. अखेर नांगरे पाटील यांच्याशी ‘लोकमत’चा संपर्क झाला. मी नागपुरात येण्यास सज्ज असून सोमवारी पदभार स्वीकारणार आहे. रविवारी रात्रीच नागपुरात पोहोचणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## राजकीय विरोधाचे आव्हान

### राजकीय वाद, नांगरेसमोर आव्हान

हिंदू संमेलनात उपस्थित राहून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या कार्याचा गौरव केला होता. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. नागपुरातच संघाचे मुख्यालय असल्याने या वक्तव्याला विशेष राजकीय संदर्भ प्राप्त झाला आणि त्यानंतर विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीका सुरू केली. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारी अधिकारी म्हणून नांगरे पाटील यांनी सार्वजनिक व्यासपीठावर विशिष्ट विचारसरणीचा गौरव करणे योग्य नसल्याचा आक्षेप घेतला. सरकारी अधिकाऱ्यांनी संविधानानुसार तटस्थ राहणे अपेक्षित असताना, अशा प्रकारची भूमिका भविष्यात प्रशासनाच्या निष्पक्षतेवर प्रश्न निर्माण करू शकते, असे त्यांनी म्हटले. तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही या विषयावर प्रतिक्रिया देताना विश्वास नांगरे पाटील यांना तुम्ही एक अत्यंत कार्यक्षम आणि चांगले अधिकारी आहात. तुमची सद्सदविवेकबुद्धी कोणत्याही राजकीय पक्ष किंवा संघटनेसाठी गहाण ठेवू नका, असा सल्ला दिला.

दरम्यान, नागपूर काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी तर खळबळजनक प्रतिक्रिया दिली आहे. भाजपने मला अर्बन नक्षल म्हटले आहे व नवीन पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील मला ’अर्बन नक्षल’ ठरवून एन्काउंटर करतील, अशी भीती वाटते. ते नागपुरात येत असल्याने आम्हाला असुरक्षित वाटत आहे, असे वक्तव्य त्यांनी केले.

# संजय जाधवांच्या बंडखोरीनंतर उद्धव ठाकरे परभणीत

**परभणी** -परभणीच्या मतदारांनी महाविकास आघाडीला व उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवाराला खासदार म्हणून निवडून दिले होते. मात्र, आज त्यांनी गद्दारी केली. यामुळे मी मतदारांची क्षमा मागण्यासाठी आलो. तसेच परभणीकरांनी महापालिकेवर आमची सत्ता आणली, त्या मतदारांना धन्यवाद ही द्यायला आलो. मागील अनेक वर्षांपासून परभणीला फुटीची आणि गद्दारीची पार्श्वभूमी असल्याचे पहावयास मिळाले. मात्र, येथील मतदार कायम शिवसेने सोबत असल्याचा अभिमान देखील वाटतो असे मत उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे



## महायुतीवर हल्लाबोल

मराठवाडा दौऱ्यावर आले असून शनिवारी रात्री त्यांचे परभणी जिल्ह्यात आगमन झाले. रविवारी सकाळी त्यांनी पत्र परिषदेतून भूमिका मांडली. याप्रसंगी खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत, माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार अंबादास दानवे, महापौर सय्यद इकबाल यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित होते. उद्धव ठाकरे म्हणाले, मुळात गद्दारीच्या मुळावर घाव घातला पाहिजे. याशिवाय महाराष्ट्र व देश वाचणार नाही. हे ऑपरेशन टायगर नाही तर ऑपरेशन देवेंद्र असल्याचेही दिसून येते.

खाजगी निधीसाठी तिकडे गेले उद्धव ठाकरे खासदारांच्या गद्दारीवर म्हणाले, या सर्व मतदारसंघात लक्ष दिले असते तर गद्दारांच्या भानगडी कळाल्या असत्या. आमच्या सोबत राहण्याची शपथ घेऊन सुद्धा ती शपथ मोडल्याचे दुष्परिणाम त्यांना दिसून येतील. खाजगी निधीसाठी खासदार तिकडे गेले. मिळालेला खासदार निधी कुठे खर्च केला, किती वेळेला लोकसभेत हजेरी लावली, मंत्र्यांना विकास कामासाठी भेटले, याचा अहवाल आमच्याकडे आहे.

# ‘....तोपर्यंत मी कोणताही सत्कार स्वीकारणार नाही’- चंद्रकांत पाटील

**पुणे :** राज्यातील सीसीएमपी पात्र आणि होमिओपॅथिक डॉक्टरांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अनपेक्षित आणि ठाम भूमिका घेतली. डॉक्टरांच्या शिष्टमंडळाशी चर्चा झाल्यानंतर, ‘या न्याय्य मागण्यांवर निर्णय होईपर्यंत मी कोणताही सत्कार स्वीकारणार नाही,’ अशी घोषणा त्यांनी केली. त्यांच्या या भूमिकेमुळे नेमके काय घडले आणि कोणत्या मागण्यांसाठी त्यांनी हा निर्धार व्यक्त केला, याची राज्यभर चर्चा सुरू झाली आहे.

सीसीएमपी होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनच्या शिष्टमंडळाने शनिवारी चंद्रकांत पाटील यांची भेट घेऊन विविध प्रलंबित मागण्यांचे सविस्तर



निवेदन सादर केले. अनेक वर्षांपासून रखडलेल्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी सीसीएमपी पात्र डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी, शासकीय आरोग्य सेवेत समावेश, डॉ. सावरीकर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीची प्रलंबित निवडणूक तसेच विविध शासकीय योजनांमध्ये होमिओपॅथिक डॉक्टरांना समान संधी देण्याचे मुद्दे उपस्थित करण्यात आले.

‘सत्कार नको, आधी प्रश्न सोडवा’-डॉक्टरांच्या व्यथा ऐकल्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी भावनिक आणि ठाम भूमिका घेत, ‘जोपर्यंत या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय होत नाही, तोपर्यंत मी कोणताही सत्कार स्वीकारणार नाही,’ असे जाहीर केले.

त्यांच्या या भूमिकेची डॉक्टर संघटनांकडून जोरदार दखल घेण्यात आली आहे.

अधिवेशनात करणार पाठपुरावा या सर्व मागण्यांबाबत येत्या विधिमंडळ अधिवेशनात पाठपुरावा करण्यात येईल.

# संक्षिप्त

## नवी मुंबईकरांचा प्रवास होणार सुखद

**नवी मुंबई -** ताफ्यात एनएमएमटीच्या सीएनजीवर धावणाऱ्या १५० नव्या बसगाड्या वर्षभरात दाखल होणार आहेत. त्यातील ३० बस पहिल्या टप्प्यात दाखल झाल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना अधिक चांगली प्रवासी वाहतूक सेवा मिळू शकेल. विद्युत बसमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या लक्षात घेता यापुढे सीएनजी बस खरेदी करण्याकडे परिवहनचा कल राहणार असल्याचे सांगण्यात आले.नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात अर्थात एनएमएमटीच्या ताफ्यात सध्या ३५० बस आहेत. नवी मुंबईबरोबर पनवेल, उरण, खोपोली, कल्याण डोंबिवली, बोरिवली मंत्रालयापर्यंत या बस धावत आहेत. एनएमएमटीच्या बसमध्ये महिलांना तिकीटासाठी निम्मे दर आकारले जात आहेत. तर ज्येष्ठ नागरिकांनी सवलत दिली जाते. त्यामुळे एनएमएमटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्याही जास्त आहे. त्यामुळे अनेक मार्गांवर बस वाढवण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे. मात्र बसगाड्यांच्या कमतरतेमुळे विविध मार्गांवर बस फेऱ्या वाढवता येत नाहीत. त्यामुळे प्रवाशांना बससाठी प्रतीक्षा करत राहावे लागत आहे. बसफेऱ्या वाढवण्यासाठी बस संख्या वाढवणे अपेक्षित आहे. त्यासाठी १५० नवीन बसेस खरेदी करण्याचा निर्णय परिवहन उपक्रमाने गेल्या वर्षी घेतला होता.

## आमणे ते दक्षिण मुंबई एका तासात

**मुंबई –** नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरून अतिजलद येणाऱ्या वाहनांना आमणे येथे वाहतूक कोंडीत अडकावे लागते. दक्षिण मुंबईत पोहोचण्यासाठी किमान दोन तास खर्ची करावे लागतात. पण भविष्यात समृद्धीवरून येणाऱ्या वाहनांचा प्रवास आमणे ते दक्षिण मुंबई असा थेट, वाहतूक कोंडीमुक्त आणि केवळ एका तासात होणार आहे. समृद्धीवरून येणाऱ्या वाहनांना आमणेवरून थेट दक्षिण मुंबईत अतिजलद जाता यावे यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) आमणे आणि दक्षिण मुंबईला जोडणारा नवीन जोडरस्ता बांधण्याचा निर्णय घेतला आहे.एमएसआरडीसीच्या ७०१ किमीच्या समृद्धी महामार्गामुळे नागपूर-मुंबई प्रवास आठ तासांत करता येत आहे. आजच्या घडीला या महामार्गावरून मोठ्या संख्येने वाहने धावतात.

## मुंबई लोकल ट्रेन मयंक मृत्यू प्रकरणातील आरोपीचे अनेक कारनामे

**मुंबई -** चर्चगेट-नालासोपारा लोकलमध्ये आरोपी रोशन सुवर्णाने प्रवासी मयंक लोहार याच्यावर हल्ला करताना, डब्यातील अन्य प्रवाशांना चाकू दाखवून धमकावले होते. यामुळे मयंकच्या मदतीसाठी कोणी पुढे आले नाही. लोकलमध्ये चढण्यापूर्वी रोशन याचा अंधेरी रेल्वे स्थानकाबाहेर रिक्षाचालकाशीही सुट्ट्या पैशांवरून किरकोळ वाद झाला होता, अशी माहिती रेल्वे पोलिसांच्या हाती लागली आहे.पावसाचे पाणी डब्यात येत असल्याने दरवाजा बंद करावा, यावरून सुरू झालेल्या वादानंतर आरोपी रोशन याने प्रवासी मयंकवर चाकूने हल्ला करत त्याची हत्या केली. आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपी रोशन हा घटनेदिवशी, मंगळवारी रात्री अंधेरीतील एका हॉटेलमधून मद्यपान करून बाहेर पडला होता. त्यानंतर रेल्वे स्थानकाबाहेर त्याचा एका रिक्षाचालकाशी सुट्ट्या पैशांवरून वाद झाला. रिक्षाचालकाने मीटरप्रमाणे झालेले भाडे नेमके द्यावे, अशी मागणी केली. रोशन याने शंभर रुपये दिल्यावर, सुट्ट्या पैशांवरून वाद सुरू झाला. हा संपूर्ण प्रकार स्थानकाबाहेरील एका सीसीटीव्हीत कैद झाला आहे. त्यानंतर आरोपीने अंधेरी रेल्वे स्थानकात प्रवेश केला, असे रेल्वे पोलिसांनी सांगितले.

## सियाच्या वाढदिवसानिमित्त भेट देण्यासाठी घेतला होता हिऱ्यांचा हार

**पुणे :** आजवरच्या माझ्या आयुष्यातील हे सगळ्यात मोठे दुःख आहे. सियासोबत केतनचे लग्न ठरवताना आम्ही खूप चौकशी केली नाही. कारण, गेल्या ४५ वर्षांपासून मी तिचे आई-वडील, आजी-आजोबा यांना ओळखत होतो.सियाचे स्थळ माझा मेव्हणा आणि त्याची बायको घेऊन आले होते. ते नात्याने सियाचे आत्या-काका देखील होते. त्यांनीच आम्हाला सिया शांत मुलगी असल्याचे सांगितले होते. १९ जून रोजी सियाचा वाढदिवस असल्याने मी तिला भेट देण्यासाठी हिऱ्यांचा हार आणला होता. मात्र, त्यापूर्वीच तिने व तिच्या प्रियकराने माझे सगळे काही हिरावून घेतले, अशी भावना केतनचे आजोबा देवी अगरवाल यांनी व्यक्त केली.

# राजस्थानमधून अफिमची तस्करी करून पुण्यात विक्री करणाऱ्याला पकडले

**पुणे :** अंमली पदार्थ विरोधी पथकाने अफिमची विक्री करणाऱ्या तस्कराला पकडून त्याच्याकडून एकूण ४० लाख ३४ हजार रुपयांचे १ किलो ७९० ग्रॅम अफिम व कार जप्त केली आहे. देवेंद्रसिंह प्रेमसिंग शक्तावत (रा. सच्चाईमाता रोड, आंबेगाव, कात्रज, मूळ रा. भातसोडा गाव, जि. चित्तोडगड, राजस्थान) असे अटक केलेल्या तस्कराचे नाव आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक नितीनकुमार नाईक व अंमलदार हे अंमली पदार्थ विरोधी दिनाचे अनुषंगाने २६ जून रोजी पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी सच्चाई माता



मंदिर येथे एक जण ह्युंदाई कंपनीची कार घेऊन उभा होता. पोलिसांना पाहताच तो घाईघाईने जाऊ लागला.

तेव्हा पोलिसांनी त्याला संशयावरून हटकले. तेव्हा तो गडबडला. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ३५ लाख ८० हजार रुपयांचे १ किलो ७९० ग्रॅम अफिम आढळून आला.

पोलिसांनी अफिम बरोबरच त्याची कार, मोबाईल, ४ हजार २०० रुपये रोख, असा ४० लाख ३४ हजार २०० रुपयांचा माल जप्त केला आहे. आंबेगाव पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक नितीनकुमार नाईक, अफरोज पठाण, पोलिस अंमलदार योगेश कुंभार, विनोद निंभोरे, पृथ्वीराज पांडुळे, सतीश चव्हाण, संदीप देवकाते, सुनील महाडिक, गणेश गोसावी, प्रशांत कळसकर, अमोल सोनवणे, शरद धांडे, देविदास वांढरे, सुरेखा साबळे, सुकेशिनी आंबले, शुभांगी म्हाळसेकर आणि दिनेश बास्टेवाड यांनी केली.

# नाशिक जिल्ह्यातील ‘या’ बैलजोडीवर ४५ दिवस मोठी जबाबदारी

**नाशिक:** महाराष्ट्रातील सर्वांनाच आता पंढरपूरच्या आषाढी वारीचे वेध लागले आहेत. वारीतून कधी एकदा पंढरपूरला जातो, आणि सावळ्या विठूरायाचे दर्शन घेतो, असे वारकऱ्यांना झाले आहे. त्र्यंबकेश्वरहून संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी पालखी सोहळा २९ जून रोजी पंढरपूरसाठी प्रस्थान करणार आहे. यावेळी सर्वच वारकऱ्यांचे लक्ष एका बैलजोडीवर राहणार आहे. वारकऱ्यांच्यादृष्टीने या बैलजोडीचेही विशेष महत्व आहे. या बैलजोडीवर मोठी जबाबदारी असते. आणि विशेष म्हणजे, ही बैलजोडी ज्यांच्या मालकीची आहे, त्यांनाही आपल्या




बैलजोडीवर विशेष जबाबदारी टाकल्याचा अभिमान आहे.

त्र्यंबकेश्वर येथून श्री संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी पायी पालखी सोहळा सोमवारी निघाल्यानंतर आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला पंढरपूर येथे पोहचणार आहे. वारी काळात वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, त्यांना सर्व सुविधा मिळाव्यात, यासाठी प्रशासनाकडून सर्व तयारी करण्यात आली आहे.

# सह्याद्रीतील पावसाळी भटकंतीत सुरक्षिततेला प्राधान्य द्या

**मुंबई** - महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन उशिराने झाले असले तरी पावसाच्या सुरुवातीसह सह्याद्री च्या पर्वतरांगा हिरव्या शालूने नटू लागल्या आहेत. लवकरच गड-किल्ले, ओढे, नाले आणि धबधबे दुथडी भरून वाहू लागतील. हे निसर्गसौंदर्य डोळ्यांत साठवण्यासाठी लाखो ट्रेकर्स आणि पर्यटक सह्याद्रीकडे धाव घेतात. मात्र, या निसर्गसौंदर्यासोबतच पावसाळ्यात नैसर्गिक धोकेही निर्माण होतात. हे लक्षात घेऊन अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाने सर्व पर्यटकांना आणि दुर्गप्रेमींना सुरक्षित भटकंतीचे व योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. डोंगराळ आणि दुर्गम भागांत होणाऱ्या दुर्घटनांवेळी मदत मिळावी, यासाठी अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाच्या मार्गदर्शनाखाली शेकडो प्रशिक्षित गिर्यारोहक सामाजिक जाणिवेतून बचावकार्य करत असतात.

पर्यटक धबधब्यांच्या पाण्याखाली जाणे, धोकादायक



कड्यांवर उभे राहून सेल्फी काढणे, पाण्याचा अंदाज न घेता प्रवाहात उतरणे किंवा अपरिचित दुर्गम भागात रस्ता चुकणे यामुळे दुर्घटनांचे बळी ठरतात. म्हणूनच काळजी घ्यावी.

गड-किल्ले हा ऐतिहासिक वारसा आणि अभिमान आहे. त्याचे संवर्धन करणे ही जबाबदारी आहे. सह्याद्रीचा आणि पावसाचा आनंद नक्की घ्या, पण सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड करू नका. सूचनांचे पालन केल्यास मानवी चुकांमुळे घडणाऱ्या दुर्दैवी घटनांना नक्कीच पायबंद बसेल.

अनुभवी आणि ओळखीच्या ट्रेकिंग ग्रुपसोबतच भटकंतीला जावे.माहिती द्या : तुम्ही कुठल्या ट्रेकला जात आहात, याची संपूर्ण माहिती आपल्या कुटुंबाला किंवा मित्रांना नक्की द्या.

प्रथमोपचार पेटी, टॉर्च, पॉवर बँक, अतिरिक्त कोरडे कपडे, आपत्कालीन खाद्यपदार्थ आणि आवश्यक सुरक्षा साहित्य सोबत ठेवा.जलरोधक सुरक्षा : मोबाइल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे वॉटरप्रूफ पिशवीत सुरक्षित ठेवा.स्थानिक वाटाड्या : अनोळखी, दुर्गम भागात जाताना स्थानिकांची मदत घ्या.

दुर्गम भागात किंवा धुक्यात एकट्याने ट्रेक किंवा भटकंती करणे पूर्णपणे टाळा.सेल्फीचे वेड : धोकादायक कडे, तटबंदी, बुरुज किंवा दरडीच्या भागात सेल्फी काढण्याचा मोह आवरून धरा.पाण्याचे प्रवाह : धबधब्यांच्या थेट खाली किंवा वेगवान पाण्याच्या प्रवाहात उतरण्याचे धाडस करू नका.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१२ ■ सोमवार, २९ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आजनसऱ्यातून थेट पंढरीची वाट खुली वारकऱ्यांसाठी एसटीची 'माऊली' सेवा सुरू

**आजनसरा जनमाध्यम :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या हिंगणघाट आगारातर्फे आजनसरा येथील संत भोजाजी महाराज देवस्थानातून पंढरपूरसाठी थेट बससेवा बुधवार, १ जुलैपासून सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पंढरीचा प्रवास अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि सुलभ होणार आहे.

हिंगणघाट आगाराचे व्यवस्थापक गौतम शेंडे आणि बसस्थानक प्रमुख जयंत शेडमाके यांच्या पुढाकारातून ही विशेष बससेवा सुरू करण्यात आली आहे. दरवर्षी 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'चा गजर करत पायी वारी करणाऱ्या तसेच बसने पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी ही सेवा मोठा दिलासा ठरणार आहे.

या विशेष बससेवेचे आरक्षण संत भोजाजी महाराज देवस्थान,



आजनसरा येथे सुरू करण्यात आले असून वारकऱ्यांनी वेळेत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या भाविकांना या बससेवेचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी संजयकुमार कोसुरकर आणि प्रशांत अरतपायरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन हिंगणघाट आगाराच्या वतीने करण्यात आले आहे.

विठ्ठल भक्तांची गैरसोय टाळण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे वारकरी आणि ग्रामस्थांकडून स्वागत होत असून, यंदाची आषाढी वारी अधिक सुखकर होणार असल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली आहे.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; चंद्रपूरच्या एकाच कुटुंबातील ५ जणांचा जागीच अंत

**धामणगाव (रेल्वे) जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावरील धामणगाव रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी झालेल्या भीषण अपघातात चंद्रपूर जिल्ह्यातील एकाच कुटुंबातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. चॅनेल क्रमांक १०५ जवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला भरधाव कारने मागून जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला. धडक इतकी जबरदस्त होती की कारचा पुढील भाग पूर्णपणे चिरडला गेला.




प्राथमिक माहितीनुसार, मारुती सुझुकी इग्निस (एमएच ३४ बीएफ १३४६) या कारमधून जीवणे कुटुंबीय चंद्रपूरहून मुंबईकडे निघाले होते. प्रवासादरम्यान समृद्धी महामार्गावरील चॅनेल क्रमांक १०५ जवळ उभ्या असलेल्या कंटेनरवर कार भरधाव वेगाने जाऊन आदळली. अपघात एवढा भीषण होता की वाहनातील सर्व प्रवाशांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातात आरती जीवणे, भास्कर जीवणे, महादेव जीवणे, कृष्णा जीवणे आणि लता जीवणे यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाल्याने चंद्रपूर जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, बचाव पथक आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी धामणगाव येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. अपघातग्रस्त वाहने हटवून वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

धामणगाव रेल्वे पोलीस या भीषण अपघाताचा अधिक तपास करीत असून, अपघाताचे नेमके कारण आणि अन्य बाबींचा सखोल तपास सुरू आहे.

## बसस्थानकावर राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### चिमुकल्यांना पोलिओचे जीवनरक्षक डोस

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील बसस्थानक परिसरात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात आला. उपजिल्हा रुग्णालयाचे सुपरवायझर डॉ. मनोज वरभे यांच्या हस्ते बालकांना पोलिओचे डोस देण्यात



आले. या मोहिमेत टाऊन प्लॅनर सेंटरच्या पल्लवी वानखेडे, वनिता येरमे, अंगणवाडी सेविका, सुरक्षा रक्षक संजय कडू तसेच पत्रकार केशव तितरे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

बसस्थानकातील कर्मचारी, प्रवासी आणि पालक यांच्या उपस्थितीत अनेक बालकांनी आनंदाने पोलिओचे डोस घेतले. 'पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचा डोस देणे हीच सुरक्षित भविष्यासाठीची हमी आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला. नागरिकांनीही या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या पाल्यांना पोलिओचे डोस पाजून राष्ट्रीय आरोग्य अभियानाला सहकार्य केले.

## भरधाव अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; तरुणाचा मृत्यू

**समुद्रपूर जनमाध्यम :** चंद्रपूरहून जामकडे दुचाकीने जात असताना भरधाव अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना २६ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास गोविंदपूर फाट्याजवळ घडली. या अपघातात प्रवीण पवार (वय ३३) हे गंभीर जखमी झाले. ते एमएच ३४ डी ८६१६ क्रमांकाच्या दुचाकीने प्रवास करत होते. अपघातानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून अपघातानंतर वाहनासह पसार झालेल्या अज्ञात चालकाचा शोध सुरू आहे. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## पावसाची प्रतीक्षा कायम जिल्ह्यात

### ४१ हजार हेक्टरवर खरीप लागवड

**वर्धा जनमाध्यम :** जून महिना संपत आला तरी आभाळाने अद्यापही शेतकऱ्यांवर मनापासून कृपा केलेली नाही तीन आठवडे कोरडे गेले आणि पावसाने शेतकऱ्यांच्या आशांवर अक्षरशः पाणी फेरले पेरणीसाठी सज्ज असलेली शेते पावसाच्या प्रतीक्षेत ताटकळत राहिली मात्र २१ जूननंतर पावसाने अधूनमधून हजेरी लावल्याने शेतकऱ्यांनीही वेळ न दवडता शेतात धाव घेतली पाऊस विश्रांती घेत कोसळत असला तरी जिल्ह्यात आतापर्यंत तब्बल ४१ हजार ८०० हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड पूर्ण झाली आहे मात्र अद्याप दमदार आणि सलग पावसाची प्रतीक्षा कायम असल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडेच खिळल्या आहेत



यंदा जिल्ह्यात सुमारे ४ लाख १८ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे कापूस सोयाबीन आणि तूर ही प्रमुख पिके असून पावसाच्या लहरीपणामुळे सुरुवातीच्या पेरण्या रखडल्या होत्या अनेक शेतकऱ्यांनी बियाणे घरातच ठेवून पावसाची वाट पाहिली अखेर पावसाने काही प्रमाणात साथ दिल्यानंतर पेरणीला वेग आला आता मात्र पिकांच्या उगवणीसाठी दमदार पाऊस अत्यावश्यक असल्याने शेतकरी पुन्हा चिंतेत आहेत

दरम्यान खरीप हंगामात बोगस बियाणे आणि खतांची विक्री रोखण्यासाठी कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत जिल्ह्यातील आठही तालुक्यांत भरारी पथके तैनात करण्यात आली असून जिल्हास्तरावर स्वतंत्र पथकही कार्यरत आहे खत आणि बियाण्यांचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आल्याचा दावा कृषी विभागाने केला आहे

**कपाशीची आघाडी कायम**

आतापर्यंत जिल्ह्यात ३१ हजार ३५७ ८७ हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड झाली असून खरीप पिकांमध्ये कपाशीने आघाडी घेतली आहे समुद्रपूर तालुक्यात सर्वाधिक १० हजार ८५८ ८ हेक्टर क्षेत्रावर कपाशीचा पेरा झाला आहे हिंगणघाटमध्ये ६ हजार ३६४ १ हेक्टर तर आर्वीत ४ हजार ४०५ ७१ हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड झाली आहे याशिवाय सेलू देवळी कारंजा वर्धा आणि आष्टी तालुक्यातही लागवड सुरू आहे

**सोयाबीन आणि तुरीचीही लगबग**

जिल्ह्यात आतापर्यंत ४ हजार ९०७ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनचा पेरा झाला आहे समुद्रपूर आर्वी आणि कारंजा तालुक्यांत सोयाबीन लागवडीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे तर ५ हजार ३८१ ५१ हेक्टर क्षेत्रावर तुरीची लागवड पूर्ण झाली असून आर्वी तालुका तुरीच्या लागवडीत आघाडीवर आहे

**समुद्रपूर तालुका अव्वल**

तालुकानिहाय खरीप लागवडीत समुद्रपूर १३ हजार ७७५ ६ हेक्टर क्षेत्रासह पहिल्या क्रमांकावर आहे त्यापाठोपाठ हिंगणघाट ७ हजार ५२८ ९ हेक्टर आणि आर्वी ७ हजार २५२ ९२ हेक्टर क्षेत्रासह पुढे आहेत एकूणच पेरणीला वेग आला असला तरी दमदार पावसाशिवाय खरीप हंगामाला बळ मिळणार नाही हे वास्तव आहे

शेतकऱ्यांनी मातीच्या कुशीत बियाणे सोपवले आहे आता त्यांच्या नजरा केवळ आभाळाकडे लागल्या आहेत पावसाने वेळेत साथ दिली तरच हिरव्या आशांचे स्वप्न बहरणार आहे अन्यथा पुन्हा एकदा संकटाचे ढग शेतकऱ्यांच्या आयुष्यावर दाटून येण्याची भीती व्यक्त होत आहे

## विजेच्या तडाख्यात शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

**विरूळ आकाजी जनमाध्यम :** कवठा झोपडी परिसरातील शेतकरी सुदाम घरडे वय ६३ यांचा शेतात काम करत असताना विजेचा तडाखा बसून दुर्दैवी मृत्यू झाला. रविवारी दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास ही हृदयद्रावक घटना घडली. अचानक आलेल्या विजेच्या कडकडाटात सुदाम घरडे शेतात काम करत असतानाच त्यांच्या अंगावर वीज कोसळली. या भीषण घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.



या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. या दुर्घटनेमुळे विरूळ आकाजी गावासह परिसरात शोककळा पसरली असून घरडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सुदाम घरडे यांच्या पश्चात एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. कुटुंबाचा आधारवड हरपल्याने त्यांच्या कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने आर्थिक मदत जाहीर करून कुटुंबाला दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## उभ्या ट्रकवर भरधाव ट्रक आदळला

### चालक ठार, दोघे जखमी



**समुद्रपूर जनमाध्यम :** नागपूर चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गावर जाम शिवारात मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात भरधाव ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला तर उभ्या ट्रकमधील चालक आणि क्लिनर जखमी झाले. मध्यरात्री एक वाजून वीस मिनिटांच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली.

मिळालेल्या माहितीनुसार राजस्थान येथील मुकेश रामेश्वर बघेल वय ४१ हे त्यांच्या ताब्यातील ट्रक घेऊन प्रवास करत होते. ट्रकचा टायर फुटल्याने त्यांनी वाहन रस्त्याच्या कडेला उभे केले होते. त्यांच्यासोबत क्लिनर सोनू महेश शर्मा वय २८ हा देखील कॅबीनमध्ये बसला होता. त्याचवेळी मध्यप्रदेश येथील राजू जयरामप्रसाद पटेल वय ४४ हा भरधाव वेगाने ट्रक चालवत येत असताना त्याचे वाहन थेट उभ्या ट्रकवर आदळले. धडक इतकी भीषण होती की राजू पटेल यांचा जागीच मृत्यू झाला. तर मुकेश बघेल आणि सोनू शर्मा हे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच जाम महामार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या भीषण अपघाताची नोंद समुद्रपूर पोलिसांनी घेतली असून अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे. मध्यरात्रीच्या या अपघाताने नागपूर चंद्रपूर महामार्गावरील भरधाव वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## विद्यार्थ्यांचा एल्गार आझादीच्या घोषणांनी वर्धा दणाणला

**वर्धा जनमाध्यम :** विविध प्रलंबित मागण्यांसाठी कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली रविवारी वर्ध्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात विद्यार्थ्यांचा प्रचंड जनआक्रोश उसळला आझादी आझादीच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला मोठ्या संख्येने विद्यार्थी रस्त्यावर उतरल्याने आंदोलनाने शहराचे लक्ष वेधून घेतले असून प्रशासनालाही या संतप्त लाटेची गंभीर दखल घ्यावी लागली



हातात फलक बॅनर आणि विविध मागण्यांचे फलक घेऊन विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली शिक्षण रोजगार विद्यार्थी कल्याण आणि इतर प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला विद्यार्थी न्यायासाठी लढत आहेत असा सूर आंदोलनादरम्यान उमटला

आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी कडक बंदोबस्त तैनात केला होता संपूर्ण परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध पण आक्रमक आंदोलनामुळे शहरभर या आंदोलनाची जोरदार चर्चा रंगली

विद्यार्थ्यांच्या घोषणांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असून त्यांच्या मागण्यांवर काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि मोठ्या संख्येने झालेली उपस्थिती ही युवकांमधील वाढत्या असंतोषाची स्पष्ट झलक मानली जात असून आंदोलनाची तीव्रता आगामी काळात आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## पिंपळखुट्यात बिबट्याची दहशत वाढली

### कालवडीचा फडशा पाडत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी तालुक्यातील पिंपळखुटा परिसरात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रविवारी पहाटे चारच्या सुमारास बिबट्याने गोठ्यात शिरून कालवडीचा फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली. या हल्ल्यात शेतकरी भास्कर खेरडे यांचे आर्थिक नुकसान झाले असून परिसरातील नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार भास्कर खेरडे यांनी कालवड गोठ्यात बांधून ठेवली होती. पहाटेच्या सुमारास बिबट्याने गोठ्यात प्रवेश करून कालवडीवर हल्ला चढवला आणि तिला ठार केले. बिबट्याने थेट शेतशिवार आणि वस्तीच्या जवळ येत हल्ला केल्याने शेतकरी शेतात जाण्यास तसेच पशुपालकांना जनावरे चारण्यासाठी नेण्यास भीती वाटू लागली आहे. त्यामुळे दैनंदिन कामकाजावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी जामकर कदम आणि घसाड यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेण्यास सुरुवात करण्यात आली असून नागरिकांनी रात्रीच्या वेळी एकटे बाहेर पडू नये तसेच जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत अशा सूचना वन विभागाने दिल्या आहेत. परिसरात बिबट्याचा बंदोबस्त करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम उत्साहात

### राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून लसीकरणची पाहणी व बालकांना डोस

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम जिल्ह्यात मोठ्या उत्साहात आणि व्यापक प्रमाणात राबविण्यात आली. जिल्ह्यातील ५ वर्षाखालील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य प्रशासनातर्फे चोख नियोजन करण्यात आले होते.

या मोहिमेच्या अंमलबजावणीची आणि प्रत्यक्ष कामाची पाहणी करण्यासाठी राज्यस्तरीय अधिकारी तथा जिल्हा नोडल अधिकारी डॉ.सचिन तडस यांनी आज जिल्ह्याला भेट दिली. डॉ.तडस यांनी पिंपरी (मेघे) व त्यासमोरील परिसरातील मोबाईल टीमच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.



या दौऱ्यादरम्यान त्यांनी विशेषत्वाने वीटभट्टी भागाला प्रत्यक्ष भेट दिली. स्थलांतरित व दुर्गम भागातील बालकांपर्यंत आरोग्य सेवा पोहचावी या उद्देशाने डॉ.तडस यांनी वीटभट्टीवरील कामगारांच्या बालकांना स्वतः पोलिओचे डोस पाजले आणि मोहिमेच्या गुणवत्तेची खात्री केली.

या प्रसंगी त्यांच्यासोबत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ.मंगेश रेवतकर प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी लसीकरण केंद्रांना भेटी देऊन कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढवले आणि मोहिमेचा एकही लाभार्थी सुटणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

जिल्ह्यातील नागरिक व पालकांनी आपल्या बालकांना पोलिओची लस देऊन या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, आरोग्य विभागाच्या विविध पथकांमार्फत सायंकाळपर्यंत ही मोहीम अविरतपणे सुरू होती.


## विजेच्या धक्क्याने दोन बहिणी शेतातच कोसळल्या


### -पेरणीसाठी वडिलांसोबत गेल्या होत्या शेतात

**नांदगाव पेठ /प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेंदोळा धस्कट येथे आज दुपारच्या सुमारास वीज कोसळून दोन बहिणी जखमी झाल्याची घटना घडली. सुदैवाने वेळीच उपचार मिळाल्याने दोघींची प्रकृती आता धोक्याबाहेर आहे.

खुशी अतुल धस्कट (वय १४) आणि आरोही अतुल धस्कट (वय ९) अशी घटनेतील जखमी बहिणींची नावे आहेत. या घटनेने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, अतुल धस्कट हे सकाळी शेतात पेरणी करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या दोन्ही मुली खुशी आणि आरोही





यांनीही वडिलांसोबत शेतात जाण्याचा हट्ट केला. त्यामुळे दोघी बहिणी वडिलांसोबत शेतात गेल्या.दरम्यान, अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. विजांचा कडकडाट सुरू झाल्याने अतुल धस्कट यांनी दोन्ही मुलींना घेऊन शेतातील आंब्याच्या झाडाखाली आसरा घेतला. मात्र काही वेळातच बाजूच्या शेतात वीज कोसळली आणि त्याच्या धक्क्याने दोन्ही बहिणी बेशुद्ध होऊन खाली कोसळल्या.

घटनेनंतर त्यांना तातडीने अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी उपचार सुरू केले असून सध्या दोघींची प्रकृती स्थिर व धोक्याबाहेर असल्याची माहिती आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# निर्णायक अधिवेशन

गेल्या बारा वर्षांमध्ये केंद्रातील भाजपप्रणीत सरकारने शासन व्यवस्थेच्या रचनेत दीर्घकालीन बदल घडवून 'आणण्याचा प्रयत्न केला. जीएसटी, कलम ३७० रद्द करणे, नागरिकत्व सुधारणा कायदा, नवीन फौजदारी कायदे, डिजिटल प्रशासन, थेट लाभ हस्तांतरण, सहकारी संघराज्याच्या नव्या व्याख्या अशा अनेक निर्णयांनंतर आता सरकारची नजर निवडणूक आणि प्रतिनिधित्वाच्या व्यवस्थेकडे वळली आहे. त्यामुळे पावसाळी अधिवेशन हे त्या प्रक्रियेतील पुढचे पाऊल ठरू शकते. राजकारणात बहुमत महत्त्वाचे असते; पण घटनात्मक बदलांसाठी केवळ बहुमत पुरेसे नसते. संविधानात बदल करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता ही भारतीय लोकशाहीने जाणीवपूर्वक ठेवलेली सुरक्षितता आहे. कारण संविधान हा केवळ सत्ताधाऱ्यांचा दस्तावेज नसून संपूर्ण राष्ट्राचा करार आहे. त्यामुळे कोणत्याही सरकारला आपल्या संख्याबळाचा वापर करून राज्यघटनेत सहज बदल करता येऊ नयेत, यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. याच ठिकाणी सध्याच्या राजकीय परिस्थितीचे महत्त्व वाढते. लोकसभेत सरकार मजबूत आहे. मित्रपक्षांचा पाठिंबा कायम आहे. शिवसेना आणि तृणमूल काँग्रेसमधील फुटीर खासदारांच्या भूमिकेमुळेही सरकारची ताकद वाढलेली दिसते. विरोधकांमधील विसंवाद आणि प्रादेशिक पक्षांच्या बदलत्या भूमिका सरकारसाठी अनुकूल वातावरण निर्माण करत आहेत; पण घटनादुरुस्तीच्या बाबतीत प्रत्येक मत महत्त्वाचे ठरते, म्हणूनच सरकारची राजकीय कौशल्याची खरी परीक्षा आता सुरू होणार आहे. आता महिला आरक्षणाचा प्रश्न पुन्हा केंद्रस्थानी येणार आहे. महिला आरक्षणाला जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी तत्त्वतः समर्थन दिले आहे; मात्र त्याची अंमलबजावणी परिसीमनानंतर होणार असल्याने त्यामागील राजकीय गणित अधिक महत्त्वाचे ठरते. महिला प्रतिनिधित्व वाढवण्याच्या उद्देशाला कोणी विरोध करणार नाही; परंतु परिसीमनाच्या प्रक्रियेत कोणत्या राज्यांना किती जागा मिळणार, हा खरा राजकीय संघर्ष असेल. परिसीमन हा शब्द तांत्रिक वाटत असला, तरी त्याचे परिणाम दूरगामी आहेत. लोकसंख्येतील बदलानुसार मतदारसंघांची पुनर्रचना झाली, तर उत्तर भारतातील अनेक राज्यांना अधिक जागा मिळू शकतात, तर दक्षिणेतील राज्यांचा तुलनात्मक वाटा कमी राहण्याची शक्यता आहे.

लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांना कमी प्रतिनिधित्व मिळणे हा अन्याय असल्याची भावना दक्षिणेकडील राज्यांमध्ये आधीपासूनच आहे. त्यामुळे परिसीमनाचा प्रश्न केवळ निवडणूक आयोगाचा विषय राहिला नसून संघराज्य व्यवस्थेच्या संतुलनाशी जोडला गेला आहे. 'एक देश, एक निवडणूक' हा याच साखळीतील पुढचा विषय आहे. निवडणुका वारंवार होत असल्याने विकासकामांवर परिणाम होतो, प्रशासन निवडणूक प्रक्रियेत अडकते आणि सार्वजनिक खर्च वाढतो, हा सरकारचा युक्तिवाद आहे. त्याउलट विरोधकांच्या मते, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात सर्व निवडणुका एकाच वेळी घेणे व्यवहार्य नाही. राज्यांचे राजकीय प्रश्न आणि राष्ट्रीय मुद्दे वेगळे असतात. त्यामुळे एकाच वेळी मतदान झाल्यास प्रादेशिक प्रश्न दुय्यम ठरू शकतात. विरोधकांसाठी आत्मपरीक्षणाचा काळ अलीकडच्या काळात अनेक महत्त्वाची विधेयके अल्प चर्चेत मंजूर झाल्याची टीका झाली आहे. या पार्श्वभूमीवर या वेळी सरकारने व्यापक चर्चा घडवून आणली, संसदीय समित्यांकडे विधेयके पाठवली आणि विरोधकांच्या सूचनांचा विचार केला, तर त्याचा सकारात्मक संदेश जाईल. विरोधकांसाठीही हा आत्मपरीक्षणाचा काळ आहे. केवळ सरकारला विरोध करण्यापेक्षा पर्यायी धोरण मांडणे आवश्यक आहे. संसदेत जनतेच्या प्रश्नांवर प्रभावी चर्चा घडवून आणणे, विधेयकांमधील त्रुटी दाखवून देणे आणि विधायक सुधारणा सुचवणे, ही विरोधकांची खरी भूमिका आहे. ती त्यांनी प्रभावीपणे पार पाडल्यास संख्याबळ कमी असूनही त्याचा प्रभाव कायम राहू शकतो.

एका अर्थाने हे अधिवेशन भारतातील नव्या राजकीय वास्तवाचे प्रतिबिंब असेल. मजबूत केंद्र सरकार, विखुरलेले विरोधक, घटनात्मक बदलांची तयारी आणि संघराज्य व्यवस्थेवरील नव्या चर्चा या सगळ्या घडामोडी एकाच वेळी घडत आहेत. त्यामुळे हे अधिवेशन केवळ चालू वर्षाचे संसदीय अधिवेशन राहणार नाही, तर पुढील दशकातील भारतीय राजकारणाचा आराखडा तयार करणारा टप्पा ठरू शकते. संसदेचे आगामी पावसाळी अधिवेशन हे केवळ नियमित अधिवेशन राहणार नाही, तर केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि विरोधी पक्षांच्या राजकीय ताकदीची मोठी परीक्षा ठरणार आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनंतर विरोधी आघाडीतील एकजूट आणखी कमकुवत झाली आहे. दुसरीकडे, शिवसेना आणि तृणमूल काँग्रेसमधील काही फुटीर खासदारांचा पाठिंबा मिळाल्याने सरकारचे संख्याबळ अधिक मजबूत झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार महिला आरक्षण, परिसीमन आणि 'एक देश, एक निवडणूक' यांसारख्या दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या विधेयकांच्या दिशेने पावले टाकण्याची शक्यता आहे. सरकारसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे घटनादुरुस्तीची आवश्यकता असलेली विधेयके. साध्या कायद्यांप्रमाणे ही विधेयके केवळ साध्या बहुमताने मंजूर होत नाहीत. त्यासाठी उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश बहुमत, तसेच सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या निम्म्याहून अधिक सदस्यांचा पाठिंबा आवश्यक असतो. त्यामुळे लोकसभेत मजबूत बहुमत असूनही राज्यसभेतील संख्याबळ आणि प्रादेशिक पक्षांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय जनता पक्षाने निवडणुकांमधील विजयासोबतच संसदेतील आपली राजकीय पकड सातत्याने मजबूत केली आहे. मित्रपक्षांशी संबंध दृढ ठेवणे, नव्या सहयोगींना जोडणे आणि विरोधी पक्षांमधील असंतुष्ट नेत्यांना आपल्याकडे वळवण्याची रणनीती यशस्वी ठरली आहे. त्यामुळे 'एनडीए'ची राजकीय ताकद वाढली असून सरकारचा आत्मविश्वासही उंचावला आहे. पावसाळी अधिवेशनात सरकारने संख्याबळाचा संयमाने वापर केला आणि विरोधकांनी विरोधाला विधायक स्वरूप दिले, तर भारतीय लोकशाही अधिक सक्षम होईल. अन्यथा, हे अधिवेशनही केवळ आकड्यांच्या विजयाचे आणि संवादाच्या पराभवाचे प्रतीक ठरेल.

# उद्धव ठाकरेंच्या अस्तित्वाची लढाई...!

**उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री'त स्वत:ला बांधून घेतले आहे, ते घराबाहेर पडत नाहीत किंवा त्यांची भेट मिळणे खूप कठीण असते, असे सर्वच बोलतात, ते कथानक आहे असे समजायचे का? खासदार, आमदार किंवा नगरसेवक, पदाधिकारी यांच्याशी पक्ष प्रमुख म्हणून नियमित संवाद नाही. पक्षात, शाखा-शाखा वर, रस्त्यावर किंवा तळागाळात काय चालले आहे.**



उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना फुटत नाही, पक्ष भक्कम आहे, अभेद्य आहे असे उबाठा सेनेचे प्रवक्ते गेले दोन महिने सांगत होते; पण संजय देशमुख (यवतमाळ-वाशीम), संजय जाधव (परभणी), नागेश पाटील-आष्टीकर (हिंगोली), भाऊसाहेब वाघचौरे (शिर्डी), ओमराजे निंबाळकर (धाराशिव) आणि संजय दिना पाटील (इशान्य मुंबई) हे पक्षाचे सहा खासदार १६ जून रोजी रात्री चार्टर्ड विमानाने दिल्लीला पोहोचले तेव्हा 'मातोश्री'चे डोळे उघडले. यापैकी काही जणांनी 'मातोश्री'वर येऊन व काहींनी मोबाईल फोनवर आपल्या आई-बहिणीची, पत्नी- मुलांची, साईबाबांची आणि आई तु?ळजाभवानीची शपथ घेऊन आपण उद्धव ठाकरे यांची साथ सोडणार नाही, अशा चार दिवस अगोदरच शपथा घेतल्या होत्या. युद्धात, प्रेमात आणि राजकारणात अशा घेतलेल्या शपथांचे काय होते, याचा अनुभव पुन्हा एकदा 'मातोश्री'ला आला. या सर्व सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र देऊन आपण एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील होत असल्याचे कळवले आणि लगेचच उबाठा सेनेच्या नेत्यांचा व प्रवक्त्यांचा थयथयाट सुरू झाला. २०२४ मध्ये पक्षाच्या निवडून आलेल्या नऊपैकी सहा खासदारांनी ठाकरे सेनेला 'जय महाराष्ट्र' केला. मशाल चिन्हावर निवडून आलेल्या सहा खासदारांनी धनुष्यबाण हाती घेतला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आधीच स्पष्ट केले आहे की, आगामी काळात महाराष्ट्रात एकच शिवसेना असेल, ती म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना. सध्या तेच घडत आहे. एकनाथ शिंदे यांनीही 'ऑपरेशन टायगर' संपलेले नाही. उबाठा सेनेतील अनेक जण आमच्या संपर्कात आहेत, असे म्हटले आहे. उबाठा सेनेतील सारे (मोजके अपवाद वगळता) एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करतील, असे शिंदे गटाचे नेते ठामपणे सांगत आहेत.

ठाकरे सेनेतील सहा खासदारांनी शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर ठाकरे सेनेचे आमदार व नगरसेवक आपल्या भवितव्याबाबत चिंतेत आहेत. एकीकडून शिंदे गटाच्या आमदारांनी ठाकरेंच्या आमदार व नगरसेवकांवर मानसिक दबाव वाढविण्यास सुरुवात केली आहे. दुसरीकडे ठाकरे सेनेतील आमदार, नगरसेवक व पदाधिकाऱ्यांना स्वत:च्या भविष्याविषयी समजेनासे झाले आहे. उबाठा सेना नजीकच्या काळात सत्तेवर येण्याची शक्यता नाही आणि विरोधी पक्षात राहून मानसन्मान मिळत नाही व कोणतीच कामे होत नाहीत, अशी भावना बळावत आहे. शिंदे गटाचे आमदार आशिष जैस्वाल यांनी म्हटले आहे की, ठाकरे सेनेतील ९९.९९ टक्के लोक आमच्या पक्षात सामील होतील व तिकडे फक्त 'हम दो, हमारे दो' राहतील.

शिवसेनाप्रमुखांचे जन्मशताब्दी वर्ष चालू आहे. पक्षाच्या वतीने फारसे कुठे कार्यक्रमही होत नाहीत. उबाठा सेनेच्या ६० व्या वर्धापन दिनाच्या तोंडावरच पक्ष पुन्हा एकदा फुटला. लोकसभेतील सहा खासदार दुसऱ्या पक्षात निघून जाणे ही काही क्षुल्लक गोष्ट नव्हे; पण त्याचे महत्त्व एकनाथ शिंदे व भाजपला चांगले ठाऊक आहे. शिवसेनेकडे लोकसभेत आता केवळ अरविंद सावंत, अनिल देसाई व राजाभाऊ वाजे असे तीनच खासदार उरले आहेत. त्यातला एक म्हणे सीमोल्लंघनासाठी योग्य संधीची वाट पाहत आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेचे सात खासदार निवडून आले. आता त्यांच्या पक्षाच्या लोकसभेतील खासदारांची संख्या तेरा झाली आहे.

शिवसेनाप्रमुखांनी घाम गाळून शिवसेना नावाचे साम्राज्य उभारले, ते आता अस्ताला जाणार की काय, अशा घडामोडी घडत आहेत. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी चाळीस आमदारांसह बंडाचा झेंडा फडकावला. त्याचा परिणाम उद्धव यांना मुख्यमंत्रिपद आणि सत्ता गमावावी लागली. ज्यांनी बंड केले, त्यांना ठाकरे सेनेने गद्दार, खंजीर, रेडे म्हणून हिणवले. 'पन्नास खोके, एकदम ओके' अशा घोषणा दिल्या. शिंदे अडीच वर्षे मुख्यमंत्री झाले, साठ आमदार, सात खासदार निवडून आणले. पुन्हा उपमुख्यमंत्री झाले. आता त्यांनीच उबाठाचे जून २०२६ मधे सहा खासदार आपल्यासोबत नेले. त्यांचे भाजपात महत्त्व वाढले. नुकसान कोणाचे झाले? उद्धव ठाकरे, त्यांच्या पक्षाचे व 'मातोश्री'चे. २०२२ चे बंड उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या नाकाखाली झाले. 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा गेले चार महिने चालू होती; पण उद्धव यांनी काहीच बोध घेतला नाही. जाणाऱ्यांना रोखले नाही, त्यांना समजावले नाही. त्यांचे प्रवक्ते त्यांना गद्दार म्हणतात, पन्नास कोटी, ऑपरेशन तुडवा अशी भाषा वापरतात, त्यातून वातावरण सुधारते की बिघडते? भाजपचा शत्रू नंबर एक असलेल्या काँग्रेसबरोबर सलोखा करून मुख्यमंत्रिपदाचा मुकुट चढवला तेव्हाच उद्धव ठाकरे व त्यांचा पक्ष भाजपच्या रडारवर आला, हे त्यांना समजले नाही, असे कसे म्हणता येईल?

उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री'त स्वत:ला बांधून घेतले आहे, ते घराबाहेर पडत नाहीत किंवा त्यांची भेट मिळणे खूप कठीण असते, असे सर्वच बोलतात, ते कथानक आहे असे समजायचे का? खासदार, आमदार किंवा नगरसेवक, पदाधिकारी यांच्याशी पक्षप्रमुख म्हणून नियमित संवाद नाही. पक्षात, शाखा-शाखांवर, रस्त्यावर किंवा तळागाळात काय चालले आहे, याची त्यांना कल्पना येत नाही. मुंबई- ठाणे हा पक्षाचा गड आहे; पण ते स्वत: फिरत नाहीत. ते खूप कामात आहेत, तर त्यांचे चिरंजीव, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनीही पक्ष कार्यालय वाहून घेतले आहे, असे कुठे दिसत नाही. पक्षाचे मुख्यालय असलेल्या शिवसेना भवन किंवा शिवालयात तरी ठाकरे कुठे नेहमी दिसतात? स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत पक्षाने रस घेतला नाही. मुख्यमंत्री असताना व नंतरच्या काळातही पक्ष नेतृत्वाने संघटना बांधणीकडे लक्ष दिले नाही. त्याचा परिणाम निवडणुकीत भोगावा लागतो. विभागप्रमुख आपली जागा सोडत नाहीत. अनेक शाखा ओस पडल्यात. निवडून आलेले खासदार पक्ष सोडून जात असतील, त्याचा काहीच परिणाम होणार नाही, असे वाटते का? केवळ पक्षाच्या मुखपत्रातून रोज भाजप-शिवसेनेवर टीकेची झोड उठवली म्हणजे पक्षाला ताकद मिळेल किंवा पक्ष लोकांपर्यंत पोहोचेल असे गणित असेल, तर निवडणुकीत भरघोस यश का मिळत नाही?

गेल्या पंधरा-वीस वर्षांत पक्षातील अनेक कर्तृत्ववान नेत्यांचे पंख कापले गेले. नारायण राणे, राज ठाकरे, एकनाथ शिंदे, गणेश नाईक, वानखेडे स्टेडियम उखडून पक्षाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणारे शिशिर शिंदे अशा अनेक दिग्गजांची नावे सांगता येतील की, ते पक्षापासून का दूर झाले? शिवसेनाप्रमुखांच्या हयातीत आक्रमक व लढाऊ असलेली शिवसेना मवाळ झाली.

शिवसेनाप्रमुखांच्या काळात पक्षनेतृत्वाचा असलेला वचक, दबदबा, दरारा आता राहिला नाही. रस्त्यावर आंदोलन करण्यासाठी शिवसैनिक बाहेर पडत नाहीत, आंदोलने केली, तर पक्ष पाठीशी राहील, याची सैनिकांना शाश्वती नाही. एकीकडे 'मातोश्री'चे दरवाजे सर्वसामान्य जनतेला बंद असतात आणि दुसरीकडे नंदनवनचे दरवाजे मध्यरात्रीनंतरही सर्वांसाठी खुले असतात. म्हणूनच शिंदे यांच्या शिवसेनेकडे प्रवेशासाठी रांगा लागल्या आहेत.

उबाठा सेनेतील सहा खासदारांनी शिंदे यांच्या शिवसेनेत मुंबईत एका कार्यक्रमात अधिकृत प्रवेश केल्यानंतर दोन-चार दिवस वातावरण तापले होते. उबाठा सेनेतील नेत्यांनी फुटीर खासदारांना रस्त्यावरून फिरू देणार नाही, असी धमकी दिली. तुम्ही 'ऑपरेशन टायगर' केलेत आता बाळासाहेबांचे शिवसैनिक 'ऑपरेशन तुडवा' सुरू करतील, अशीही घोषणा केली. काही फुटीर खासदारांच्या मतदारसंघांत उबाठा सेनेच्या शंभर-दोनशे कार्यकर्त्यांनी रास्ता रोको केले. ज्यांनी पक्षांतर केले त्यांच्या मोटारी अडविण्याचा प्रयत्न केला. गद्दार म्हणून त्यांच्या विरोधात घोषणा दिल्या. इशान्य मुंबईतून लोकसभेवर निवडून आलेले उबाठाचे खासदार संजय दिना पाटील यांच्या भांडूप येथील निवासस्थानासमोर हजारभर उबाठाच्या सैनिकांनी घोषणा दिल्या. स्वत: उद्धव ठाकरे यांनी तिथे येऊन संताप प्रकट केला. संजय दिना पाटील यांचे वडील हे काँग्रेस पक्षात मोठे नेते होते. संजय हे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, ठाकरेंची शिवसेना असा राजकीय प्रवास करीत आता शिंदेंच्या शिवसेनेत सामील झाले आहेत. ते तीन वेळा आमदार व दोन वेळा खासदार झालेत. खासदार संजय राऊतही भांडूप येथेच राहतात. संजय राऊत हे रोज फुटीर खासदारांना धमक्या देत एकनाथ शिंदे व अमित शहांवर टीका करीत असतात. जेव्हा उबाठाच्या नेत्यांनी फुटीर खासदारांना धमक्या दिल्या तेव्हा संजय दिना पाटील खूप संतापले. ते म्हणाले, 'माझ्या नादाला लागाल, तर हॉस्पिटल किंवा स्मशानात जाल. सामान्य कार्यकर्त्यांशी माझे वैमनस्य नाही. कोणी माझ्याकडे किंवा माझ्या कुटुंबीयांकडे वाकड्या नजरेने पाहिले, तर त्यांनी अगोदर स्वत:चा मेडिक्लेम वा लाईफ इन्शुरन्स काढून ठेवावा. मला पोलीस सुरक्षेची गरज नाही. पोलीस नसले, तरी आमच्याकडे सगळ्या गोष्टी असतात. माझे वडील हयात असताना त्यांच्यावर हल्ला करायला आले तेव्हा आम्ही पाच लोक मारले होते'

'आम्ही कोणा भाई लोकांच्या जीवावर नाही, तर आम्ही स्वत:च्या जीवावर लढणारे आहोत, घरात घुसून मारू, तुम्ही कितीही सुरक्षा ठेवा, मी थेट बॉम्ब टाकेनष्ठ' असाही निर्वाणीचा इशारा संजय दिना पाटील यांनी दिला आहे. 'ऑपरेशन टायगर'मध्ये बाधा आणली गेली, तर कोणत्या थराला काय होऊ शकते, याची ही झलक आहे. सहा खासदारांनी पक्ष प्रवेश केल्यावर एकनाथ शिंदे म्हणाले, 'ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है'

उद्धव ठाकरे यांना पक्षप्रमुख म्हणून पक्ष संघटना टिकवणे हे मोठे आव्हान आहे. एकनाथ शिंदे व भाजप यांच्या माऱ्याला तोंड देणे खूप कठीण झाले आहे.

पदावरून पायउतार होण्याची उद्धव यांनी यापूर्वीही भाषा केली होती. वर्धापन दिनाला त्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. पक्षातील वाढता असंतोष व बंडखोरीनंतर एकदा ते म्हणाले, 'मित्र कोण, शत्रू कोण, मला कधी कळलेच नाही. नाही भेटला असा कोणी, ज्याने मला छळले नाही'

**डॉ. सुकृत खांडेकर**

# रोज घाली शिव्या आणि एकादशीला गाई ओव्या..

मराठीत एक अतिशय चपखल आणि मार्मिक म्हण आहे 'रोज घाली शिव्या आणि एकादशीला गाई ओव्या'. याचा अर्थ सुरुवातीला एखाद्याचा प्रचंड द्वेष करणे, टोमणे मारणे आणि नंतर स्वतःच्या फायद्यासाठी किंवा वेळ मारून नेण्यासाठी अचानक प्रेमाचा, काळजीचा किंवा भक्तीचा वर्षाव करणे. सध्या अयोध्या श्री राम मंदिराच्या सुरक्षेबाबत आणि कथित चोरीबाबत देशातील विरोधी पक्षांनी ज्यात प्रामुख्याने समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष आणि काँग्रेस यांचा समावेश आहे. जी आस्थेची भूमिका घेतली आहे, तिला ही म्हण तंतोतंत लागू पडते. जे कालपर्यंत राम मंदिराच्या विरोधात उभे होते, तेच आज मंदिरातील व्यवस्थेवर रोज नवनवीन तत्वज्ञान सांगत आहेत.

आज मंदिराची काळजी वाहणाऱ्या या राजकीय घराण्यांचा आणि पक्षांचा भूतकाळ पाहिला, तर त्यांची आजची आस्था किती पोकळ आहे हे स्पष्ट होते. ज्या समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव आज मंदिराच्या सुरक्षेवरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहेत, त्याच पक्षाचे संस्थापक मुलायमसिंह यादव यांच्या मुख्यमंत्री काळात १९९० मध्ये अयोध्येत कारसेवकांवर अमानुष गोळीबार करण्यात आला होता. यात अनेक निष्पाप रामभक्तांना आपले प्राण गमवावे लागले होते. रामजन्मभूमी आंदोलनाला हिंसेच्या जोरावर चिरडण्याचा प्रयत्न याच पक्षाने केला होता.

दुसरीकडे, 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी सुरुवातीला राम मंदिर उभारणीला उघड विरोध केला होता. 'माझ्या आजीने सांगितले की, मशीद पाडून बांधलेल्या जागेवर देवाचे मंदिर असू शकत नाही,' असे वादग्रस्त वक्तव्य करून त्यांनी मंदिराऐवीजी तिथे रुग्णालय किंवा शाळा बांधावी, असा सल्ला दिला होता.काँग्रेसने तर राम मंदिराच्या उभारणीत कायदेशीर आणि राजकीय पातळीवर सतत अडथळे आणले.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि वकील कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात हा खटला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत प्रलंबित ठेवावा, अशी लेखी विनंती केली होती. प्रभू श्रीरामाच्या



## राममंदिर सोयीचे राजकारण

अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर करण्यापर्यंत काँग्रेसची मजल गेली होती. जितका विरोध गांधी, यादव आणि केजरीवाल यांच्या पक्षांनी राम मंदिराला केला, तितका देशात इतर कोणीही केला नसेल; पण आज हेच नेते अचानक 'रामभक्त' बनून उपदेश देत आहेत.

विरोधी पक्ष या मुद्द्यावरून राजकारण उकळण्याचा प्रयत्न करत असतानाच, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राजधर्माचे पालन करत अत्यंत कठोर पावले उचलली.

त्यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तात्काळ विशेष तपास पथक नेमले आणि तपास अहवालानुसार, दोषी आढळलेल्या संबंधित व्यक्तींना तात्काळ अटक करण्यात आली आहे.

इतकेच नव्हे तर पारदर्शकता आणि नैतिकतेचा दाखला देत राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी ज्यामध्ये चंपत राय आणि मिश्रा यांचा समावेश आहे. आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. भाजप सरकारने या प्रकरणात कोणतीही दिरंगाई न करता दूध का दूध आणि पाणी का पाणी करून दाखवले आहे.

राम मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून ते देशातील करोडो हिंदूंच्या अस्मितेचे, संघर्षाचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे.

प्रभू श्रीरामांचे मंदिर दिमाखात उभे राहिले आणि संपूर्ण देशातून त्याला अभूतपूर्व पाठिंबा मिळाला, तेव्हा विरोधी पक्षांना समजले की आता अयोध्येला विरोध करणे म्हणजे राजकीय आत्महत्या ठरेल.

त्यामुळेच, आज जी काळजी हे पक्ष दाखवत आहेत, ती प्रभू श्रीरामांबद्दलची भक्ती नसून 'पुतनामावशीचे प्रेम' आहे. आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून हिंदू मतांचे होणारे ध्रुवीकरण रोखण्यासाठी आणि स्वतःची डागाळलेली प्रतिमा सुधारण्यासाठी चाललेली ही निव्वळ धडपड आहे.

कालपर्यंत रामाचे अस्तित्व नाकारणारे आणि रामभक्तांवर गोळ्या झाडणारे आज मंदिराचे 'रखवालदार' बनू पाहत आहेत, हा लोकशाहीतील सर्वात मोठा विनोद आहे. परंतु, देशातील सुजाण नागरिक विरोधी पक्षांचे हे दुटप्पी राजकारण आणि त्यांचे बदललेले रंग चांगल्या प्रकारे ओळखून आहेत.

योगी सरकारने घेतलेली कडक कारवाई हे सिद्ध करते की, मंदिराच्या पवित्रतेला धक्का लावणारा कोणीही असो, त्याला माफी नाही; मग विरोधी पक्षांनी कितीही गळा काढला तरी जनतेला

सोमवार, दि. २९ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# पंचायत समिती परिसरातील तरुण युवकाची गळफास लावून आत्महत्या

**मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे वडिलांचे जबाबात स्पष्ट**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २८ : शहरातील पंचायत समिती परिसरात असलेल्या लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन एका ३० वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून महागाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.**



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृत तरुणाचे नाव राजू गुणाजी भिसे (वय ३०, रा. राजूरा) असे आहे. त्याचे वडील गुणाजी नारायण भिसे यांनी महागाव पोलिस ठाण्यात दिलेल्या जबाबानुसार, राजू हा अधूनमधून महागाव येथे बांधकाम मजुरीचे काम करीत असे. शनिवारी (दि. २७) सायंकाळी सुमारे ७ वाजता तो वडिलांना भेटून गेला होता. त्यानंतर तो परत न आल्याने तो राजूरा येथे आईकडे गेला असावा, असा त्यांचा समज होता.

मात्र रविवारी सकाळी साडेसातच्या सुमारास फुकट नगर येथील नागरिकांकडून पंचायत समिती परिसरातील लिंबाच्या झाडाला एका व्यक्तीने गळफास घेतल्याची माहिती मिळाली. घटनास्थळी जाऊन पाहिले असता तो मृतदेह राजू गुणाजी भिसे याचाच असल्याचे स्पष्ट झाले. वडील गुणाजी भिसे यांनी आपल्या जबाबात मुलाच्या मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे नमूद केले आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला असून आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू आहे.

# ताजपूरा परिसरात प्रतिबंधीत गोवंश मांस जप्त

**स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांची कारवाई**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २८ :** गस्तीवर असलेल्या यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला उमरखेड पोलीस स्टेशन हद्दीत ताजपूरा येथे शासनाने प्रतिबंधित केलेले १४ हजार ६३४ रुपये किंमतीचे एकुण ७३ किलो १३५ ग्रॅम गोमांस जप्त करून आरोपी मोहमद सादीक मो हुसेन कुरेशी वय ३० वर्षे रा रहिमनगर उमरखेड यास ताब्यात घेऊन त्याचे विरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपीस ताब्यात घेतले आहे.

दि. २७ जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरखेड उपविभागात अवघड गुन्हे, आरोपी शोध, कामी रवाना झाले. पोलीस स्टेशन उमरखेड हददीत पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदाराकडून माहीती मिळाली की, शहरातील ताजपूरा



येथे मोहम्मद सादीक मोहम्मद हुसेन कुरेशी हा शासनाने प्रतिबंधीत केलेले गोवंश मास विक्री करीत असल्याबाबत माहीती मिळाल्याने त्याप्रमाणे ताजपूरा येथील मुजीफ यांच्या घराजवळ गेले असता इसम नामे मोहम्मद सादीक मोहम्मद हुसेन कुरेशी रा. रहिमनगर उमरखेड ता उमरखेड दोन प्लॅस्टीक पोत्यामध्ये मास बाळगल्या स्थिती मध्ये मिळून आल्याने त्याचे ताब्यातून एकूण ७३ किलो १७० ग्रॅम एकूण किंमत १४,६३४/- रुपये गोमांस जप्त करुन इसम नामे-मोहम्मद सादीक मोहम्मद हुसेन कुरेशी वय ३० वर्ष, रा. रा. रहिमनगर उमरखेड ता उमरखेड जि यवतमाळ यांचे विरुध्द पोलीस स्टेशन उमरखेड येथे महाराष्ट्र प्राणीरक्षण सुधारणा अधिनियम सन १९९५ कायदा कलम ५ (क), ५ (ब), ९, ९(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ अशोक थोरात तसेच पोलीस निरीक्षक सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, यांचे मार्गदर्शनात स.पो.नि. धिरज बांडे, पो उपनि अमोल राठोड, सहा. फौ मुन्ना आडे, सहा फौ संतोष भोरगे, पो हवा तेजाब रणखांब, पो हवा सुभाष जाधव, पो हवा कुणाल मुंडोकार, पो हवा रमेश राठोड, पो शि सुनिल पंडागळे, चा पो उपनि. रविंद्र शिरामे, चा पो शि. राजेश जाधव गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# 'एकही पात्र मतदार वंचित राहू नये'..!

**SIR प्रक्रियेवर संविधान जागर अभियानाची जनजागृती मोहीम**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २८ :** विशेष मतदार पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेत कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव विनाकारण मतदार यादीतून वगळले जाऊ नये, यासाठी संविधान जागर अभियान आणि विविध सामाजिक संघटनांनी जिल्हाभर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

३० जूनपासून महाराष्ट्रासह १६ राज्यांमध्ये सुरू होणाऱ्या SIR प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आवश्यक माहिती देणे, बूथस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करणे आणि मतदानाचा घटनात्मक अधिकार अबाधित राखण्यासाठी समाजाने सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत या मोहिमेची माहिती देण्यात आली. संविधानाने धर्म,



जात, लिंग, संपत्ती किंवा शिक्षणाचा भेद न करता प्रत्येक प्रौढ नागरिकाला समान मतदानाचा अधिकार दिला असून, ही लोकशाहीची सर्वात मोठी ताकद असल्याचे प्रा.घनश्याम दरने यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले. त्यामुळे मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक राहणे ही केवळ निवडणूक आयोगाचीच नव्हे, तर समाजाचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संविधान जागर अभियानाच्या २६ जून रोजी झालेल्या बैठकीत SIR प्रक्रियेबाबत कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण सत्र, नागरिकांसाठी मार्गदर्शन, हेल्पडेस्क उभारणी, ग्रामसभांमधून जनजागृती तसेच ज्येष्ठ, अशिक्षित आणि गरजू मतदारांना प्रत्यक्ष मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक नागरिकाने स्वतः SIR प्रक्रियेची माहिती करून घेऊन आपल्या परिसरातील इतरांनाही जागरूक करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या सर्व प्रक्रियेची माहिती देण्याकरिता पाच जुलै रोजी सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय पिंपळगाव येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून या कार्यशाळेला सर्व समाजातील व तरुण वर्गाने मोठ्या प्रमाणात उपस्थिती देऊ ही संपूर्ण प्रक्रिया करून घ्यावी ज्यामुळे इतर लोकांना सुद्धा या संदर्भात माहिती देता येईल असे आवाहन संविधान जागर समितीच्या वतीने करण्यात आले.या पत्रकार परिषदेला प्रा. घनश्याम दरणे, निश्चय, ॲड. जयसिंग चव्हाण, गायकवाड ,ॲड. सीमा तेलंगे, शोभा पारधी, शशिकांत खडसे, दत्तूभाऊ पारधी, डॉ. दिलीप पारधी आणि उदय सरताबे उपस्थित होते.

# संदीप कोवे भाजपा जिल्हा उपाध्यक्षपदी



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २८ :** भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती (एस टी )मोर्चाच्या यवतमाळ जिल्ह्याच्या उपाध्यक्षपदी घाटंजी तालुक्यातील तरुण तडफदार,आणि अष्टपैलू सामाजिक कार्यकर्ते संदीप कोवे यांची नियुक्ती करण्यात आली

त्या संबंधीचे नियुक्तीपत्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या हस्ते ॲड.प्रफुलजी चव्हाण जिल्हा अध्यक्ष भारतीय जनता पार्टी कैलाजी बोंद्रे जिल्हा महामंत्री भाजपा दिलीप मलांडे जिल्हाध्यक्ष भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा,यांच्या प्रमुख उपस्थितीत पुषगुच्छ देऊन त्यांच्या भावी राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या नियुक्तीमुळे घाटंजी तालुक्यासह जिल्ह्यातील आदिवासी बांधव आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सगळीकडुन संदीप कोवे यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## थोडक्यात



### 'उडान' महिला शेतकरी गटाशी मुख्यमंत्री साधणार थेट संवाद

**बाभूळगाव :** राज्यातील शेती अधिक आधुनिक, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा २०२६'चा अधिकृत डिजिटल शुभारंभ दि. २९ जून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'झूम' व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणार आहे. राज्यातील ३५१ तालुक्यांमधील शेतकरी गट या स्पर्धेत सहभागी होत असून, यवतमाळ जिल्ह्यातील बाभूळगाव तालुक्याने यात उल्लेखनीय सहभाग नोंदविला आहे. उमेद अभियान, कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली बाभूळगाव तालुक्यातील ८० हून अधिक शेतकरी गटांची 'स्मार्ट शेती' ॲपवर यशस्वी नोंदणी करण्यात आली आहे. या प्रक्रियेत उमेद अभियानातील महिला बचत गट व ग्रामसंघांचा मोठा सहभाग राहिला आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण बाभूळगाव पंचायत समिती सभागृहात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला स्पर्धेत सहभागी सर्व शेतकरी गट, महिला बचत गट, उमेद अभियानातील ग्रामसखी, कृषीसखी, मेंटर्स तसेच परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गट विकास अधिकारी उज्वला ढोले, तालुका कृषी अधिकारी आर. ए. डेरे आणि तालुका अभियान व्यवस्थापक अमित जाधव यांनी केले आहे.

### बांधकाम कामगारांचे अर्ज 'किरकोळ कारणांवर' प्रलंबित?

**पारदर्शक चौकशीची नागरिकांची मागणी**

**पुसद:** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण योजनेअंतर्गत पुसद तालुक्यातील बांधकाम कामगारांचे अर्ज किरकोळ कारणे दाखवून प्रलंबित ठेवले जात असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. अर्ज ऑनलाइन प्रणालीत सर्व आवश्यक माहिती भरल्याशिवाय स्वीकारला जात नसतानाही पडताळणी वेळी "कौटुंबिक माहिती अपूर्ण" अशा सर्वसाधारण नोंदी करून अर्ज पुढे न पाठवल्याचा आरोप आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, नेमकी कोणती माहिती अपूर्ण आहे हे स्पष्ट न केल्याने अर्जदारांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागत असून अनेक अर्ज महिनोनमहिने प्रलंबित आहेत. अर्ज नाकारताना स्पष्ट लेखी कारण द्यावे, त्रुटी दुरुस्त करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, प्रलंबित अर्जांची स्वतंत्र चौकशी करून पडताळणी प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. राज्य शासन पात्र बांधकाम कामगारांना योजनांचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्नशील असताना स्थानिक स्तरावरील कथित दिरंगाईमुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून या प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

### विदर्भ साहित्य संघ अध्यक्षपदी डॉ. अभिजित अणे यांची निवड

**वणी :** साहित्यप्रेमींना दर्जेदार साहित्यिक उपक्रमांचे व्यासपीठ उपलब्ध



करून देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या विदर्भ साहित्य संघ,शाखा वणीच्या नुकत्याच पार पडलेल्या आमसभेत २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी डॉ.अभिजित रमेशराव अणे यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. डॉ. अणे यांनी यापूर्वी तब्बल १५ वर्षे शाखेचे सचिव म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्यकाळात जिल्हा साहित्य संमेलन व विदर्भ साहित्य संमेलनाचे भव्य आयोजन यशस्वीरीत्या पार पडले. तसेच गेल्या ५७ महिन्यांपासून अखंड सुरू असलेली 'माझं गाव माझा वक्ता' ही विक्रमी व्याख्यानमाला ही त्यांच्या संकल्पनेतून व प्रभावी संयोजनातून साकार झालेली महत्त्वपूर्ण उपलब्धी मानली जाते.

सध्या लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी येथे इंग्रजी विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या डॉ.अणे यांनी विद्यार्थी विकास विभागामार्फत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे यशस्वी आयोजन केले आहे.

विद्यापीठस्तरीय चमूंचे संयोजक म्हणून उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना दोन वेळा 'कलरकोट' सन्मान प्राप्त झाला आहे.

हिंगणा येथे आयोजित ६७ व्या विदर्भ साहित्य संमेलनात तसेच वर्धा येथे झालेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या परिसंवादात त्यांनी आमंत्रित वक्ता म्हणून सहभाग नोंदविला आहे.

विशेष म्हणजे, त्यांच्या सचिवपदाच्या कार्यकाळात २०१७ मध्ये विदर्भ साहित्य संघाच्या उत्कृष्ट शाखेचा पुरस्कार वणी शाखेला प्राप्त झाला होता.आता अध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखाली वणी शाखेच्या साहित्यिक उपक्रमांना अधिक व्यापक दिशा मिळेल,असा विश्वास साहित्यप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# ४० लाखांच्या नालीकामात निकृष्टतेचा आरोप..!

**चौकशीचा चार महिन्यांपासून ठावठिकाणा नाही!**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २८ :** पुसद शहरातील प्रभाग क्र. १४ मधील लक्ष्मीनारायण नगर येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू असलेल्या सुमारे ४० लाख रुपयांच्या सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकामावर निकृष्ट दर्जा आणि अनियमिततेचे गंभीर आरोप होत असून, याबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीवर चार महिन्यांनंतरही चौकशी न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

माहितीनुसार, वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मंजूर झालेल्या या कामाची वर्क ऑर्डर कुलस्वामिनी मजूर सहकारी सोसायटी, उमरसरा (यवतमाळ) यांच्या नावे देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात हे काम अन्य व्यक्तीमार्फत केले जात असल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी केला आहे. तसेच मंजूर अंदाजपत्रकातील निकष डावलून निकृष्ट दर्जाचे साहित्य





वापरणे, लाईन-दोरी न पाळणे, मोजमापाकडे दुर्लक्ष करणे आणि काम वाकडे-तिकडे करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या संदर्भात परिसरातील रहिवासी व सामाजिक कार्यकर्त्यांनी १० मार्च २०२६ रोजी कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे लेखी तक्रार करून कामाची गुणवत्ता तपासणी, कॉलिटी कंट्रोल विभागामार्फत चौकशी आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित देयके रोखण्याची मागणी केली होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई किंवा चौकशी झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कामाची नियमित पाहणी करणे ही जबाबदारी असलेल्या कनिष्ठ अभियंत्यांनीही प्रत्यक्ष पाहणी केली नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून, सार्वजनिक निधीच्या कामांतील कथित अनियमिततेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई होणार का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# यवतमाळच्या राजकारणात मोठा भूकंप! उद्धव ठाकरे गटाला धक्का..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २८ :** यवतमाळच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवणाऱ्या घडामोडीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील विविध पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचे सामूहिक राजीनामे दिल्याची घोषणा केली आहे. अनेक वर्षे पक्षासाठी प्रामाणिकपणे व निष्ठेने काम केले, मात्र काही अपरिहार्य व वैयक्तिक कारणांमुळे हा निर्णय घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राजीनामा दिलेल्या पदाधिकाऱ्यांनी पुढील राजकीय वाटचाल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनात आणि खासदार संजय देशमुख यांच्या सहकार्याने करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. तसेच लवकरच शिवसेना (शिंदे गट) मध्ये अधिकृत प्रवेश करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.



विशेष म्हणजे, अवघ्या दोन दिवसांपूर्वी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा यवतमाळ दौरा पार पडला होता. निष्ठावंत कार्यकर्त्यांना नवचैतन्य देण्याच्या उद्देशाने झालेल्या या दौऱ्यानंतर लगेचच अनेक पदाधिकाऱ्यांनी पक्षाला रामराम ठोकल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. राजीनामा देणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी, "जनतेच्या विकासासाठी सत्तेसोबत राहून काम करणे आवश्यक वाटत असल्याने हा निर्णय घेतला आहे. यापुढे खासदार संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामांना प्राधान्य देत काम करू,अशी भूमिका मांडली. या सामूहिक राजीनाम्यात उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, तालुका संघटक, महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्या, शेतकरी संघटना, वाहतूक सेना, विभाग प्रमुख, युवासेना जिल्हाप्रमुख तसेच युवासेनेचे विविध पदाधिकारी सहभागी असल्याचा दावा करण्यात आला आहे. या घडामोडीमुळे यवतमाळ जिल्ह्यातील शिवसेनेच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली असून, आगामी स्थानिक राजकारणावर या निर्णयाचे परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नाजिया इलाही खान यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २८ :** प्रेषित हजरत मोहम्मद (स.) तसेच त्यांच्या कुटुंबीयांविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप असलेल्या नाजिया इलाही खान यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पक्ष अल्पसंख्याक मोर्चा, उमरखेडच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भात उमरखेड पोलीस ठाण्यात निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी जमाल सिद्दीकी यांनी नागपूर येथे उपस्थित केलेल्या आक्षेपाच्या पार्श्वभूमीवर देण्यात आले. जिल्हा उपाध्यक्ष रहेमत जागीरदार यांच्या



नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष अतीक मौलाना तसेच भाजप अल्पसंख्याक महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षा अंजुम परवीन यांनी मार्गदर्शन केले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नाजिया इलाही खान यांच्या कथित वक्तव्यांमुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून, प्रेषित हजरत मोहम्मद (स.) यांच्याविषयी अपमानास्पद किंवा आक्षेपार्ह वक्तव्य कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. त्यामुळे संबंधितांविरुद्ध तातडीने गुन्हा नोंदवून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी सय्यद मुसा (जिल्हा सचिव), सादिक ठेकेदार (जिल्हा सदस्य), इस्त्राईल बाबा (जिल्हा उपाध्यक्ष), जावेद खान (जिल्हा सदस्य), अत्ताउल्लाह खान (जिल्हा सदस्य), इम्रान खान (शहराध्यक्ष), नासिर शेख (युवा नेते), हमीद खान, सय्यद वसीम, अथरुद्दीन खतीब, सय्यद राजिक, शेख रहीम यांच्यासह भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद..!

**पहिल्याच दिवशी ९५% बालकांचे लसीकरण**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**ढाणकी, दि. २८ :** केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला ढाणकी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रविवारी (२८ जून) राबविण्यात आलेल्या विशेष अभियानात पाच वर्षांखालील ५,१३९ बालकांपैकी ९५ टक्के बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले.

उर्वरित बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी २९ जून, १ व २ जुलै रोजी घरभेटीद्वारे विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. नगराध्यक्षा अर्चना वासमवार यांच्या हस्ते पहिल्या बालकाला पोलिओ डोस देऊन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. प्राथमिक



आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात ४५ पोलिओ बूथ, ९३ कर्मचारी, १०६ घरभेट पथके, १ नाइट पथक, १ ट्रान्झिट पथक आणि ३ मोबाइल पथके कार्यरत होती. वीट भट्ट्या, बांधकाम स्थळे, स्थलांतरित कुटुंबे व दुर्गम भागातील बालका पर्यंतही पथके पोहोचली. वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती मिलिंद मुनेश्वर यांच्या नेतृत्वाखाली मोहीम प्रभावीपणे पार पडली. "पोलिओ हा कायमस्वरूपी अपंगत्व निर्माण करणारा गंभीर आजार असून प्रत्येक पाच वर्षांखालील बालकाला पोलिओचे दोन थेंब देणे अत्यावश्यक आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी पुढील घरभेटीदरम्यान हा डोस नक्की घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा आरोग्य विभाग, महिला व बालविकास, शिक्षण विभाग, ग्रामपंचायती आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयामुळे ढाणकीतील ही मोहीम यशस्वी ठरल्याचे आरोग्य विभागाने सांगितले.

# दोन दिवसांनंतर वाजणार नव्या शैक्षणिक सत्राची पहिली घंटा !

## शाळांमध्ये गुणवत्ता, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे सीईओ सत्यम गांधी यांचे निर्देश

**अमरावती/का.प्र.**

येत्या दोन दिवसांनंतर नवीन शैक्षणिक सत्राची पहिली घंटा वाजणार आहे. आगामी नवीन शैक्षणिक सत्राच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी 'वॉर रूम'मध्ये एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील शाळांची गुणवत्ता, स्वच्छता, विद्यार्थ्यांची सुरक्षा, निपुण भारत मिशन, प्रवेशोत्सव, नवोदय परीक्षा योजना आणि शाळा व्यवस्थापन या संदर्भात विस्तृत आणि कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

सीईओ सत्यम गांधी यांनी स्पष्ट केले की, प्रत्येक शाळा परिसर, वर्गखोल्या, स्वच्छतागृहे आणि माध्यान्ह भोजनाचे स्वयंपाकघर स्वच्छ व सुरक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. शाळांमधील धोकादायक जागा, तुटलेल्या विजेच्या तारा, उघडे स्विच आणि इतर त्रुटींची तात्काळ दुरुस्ती करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जावे. तसेच, पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत केले

जावे, त्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश वितरित केले जावेत आणि गोड खाऊ दिला जावा. सर्व शिक्षकांनी वेळेवर शाळेत पोहोचणे, ओळखपत्र परिधान करणे, आदर्श प्रार्थना सभा आयोजित करणे आणि संध्याकाळी राष्ट्रगीत घेणे बंधनकारक राहील, असेही त्यांनी सांगितले.



पहिल्या दोन तासांमध्ये विद्यार्थ्यांच्या अक्षर ओळख, वाचन, संख्याज्ञान आणि पायाभूत गणितीय कौशल्यांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सोबतच, जुलै २०२६ मध्ये होणाऱ्या पायाभूत परीक्षेसाठी स्तरनिहाय योजना तयार करण्यास सांगण्यात आले आहे. याशिवाय, शाळांमध्ये भाषा पेटी, इंग्रजी पेटी आणि गणित पेटीचा नियमित वापर करावा, समित्यांच्या नियमित बैठका घ्याव्यात आणि शाळांमध्ये तक्रार पेटी, शासकीय योजनांचे फलक व चाइल्ड हेल्पलाइनची माहिती प्रदर्शित करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. यावर्षी जिल्ह्यातील १०० विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे प्रशिक्षण दिले जाईल. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक चॅट जीपीटी सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोगासाठी वापर करण्यास प्रोत्साहित करावे, असे आवाहन सीईओ यांनी केले आहे.

नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात पाहता, शहरातील तिन्हीं वाहतूक विभागांना स्कूल व्हॅन आणि विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या ऑटो चालकांची तात्काळ बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बैठकीत केवळ अधिकृत वाहन चालकांनाच बोलावले जाईल. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणणे नेणे, वाहतूक नियमांचे पालन करणे, क्षमतेपेक्षा जास्त मुलांना वाहनात न बसवणे आणि सर्व सुरक्षा मानकांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले जातील, शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक पूर्णपणे नियमानुसारच झाली पाहिजे. कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा किंवा नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित चालकांवर कडक कारवाई केली जाईल

**- राकेश ओटा, पोलीस आयुक्त**

प्रत्येक शाळेत दर्जेदार शिक्षणांसोबतच सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण तयार करणे ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे.

**- सत्यम गांधी, सीईओ, अमरावती**

# पेरणीच्या हंगामात खतांचा तुटवडा;काळाबाजारालाही ऊत

**अमरावती/का.प्र.**

मृग नक्षत्र कोरडे गेल्यानंतर आद्री नक्षत्रात पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे अमरावती जिल्ह्यातील बळीराजा सुखावला खरा, मात्र ऐन पेरणीच्या तोंडावर खतांच्या तीव्र टंचाईने शेतकऱ्यांची चिंता कमालीची वाढवली आहे. जिल्ह्यात पेरण्यांची लगबग सुरू झाली असली, तरी बाजारात खतांचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे.



विशेषतः सर्वाधिक मागणी असलेल्या ह्यडीएपीह्ण आणि युरिया खतांचा पुरवठा संथ गतीने होत असल्याने शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे, तर दुसरीकडे याच टंचाईचा फायदा घेत बाजारात खतांचा काळाबाजार सुरू झाल्याचे चित्र आहे. बियाण्यांसोबतच खतांची खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची कृषी केंद्रांवर गर्दी होत आहे. मात्र, शासनाने युरिया आणि डीएपी खतांचे रेशनिंग केल्यामुळे शेतकऱ्यांना गरजेइतकेही खत मिळणे कठीण झाले आहे. मागणी आणि पुरवठा यातील प्रचंड तफावतीमुळे शेतकऱ्यांना जादा दराने खते खरेदी करावी लागत असून, प्रशासकीय नियोजनाचा पुरता बोजवारा उडाल्याचे दिसत आहे. त्यातच आगामी काळात जिल्ह्यात खतांची रेल्वे रॅक लागण्याची शक्यता धूसर असल्याने हा तुटवडा अधिक तीव्र होण्याची भीती वर्तवली जात आहे.

कृषी विकास कार्यालयाने १ एप्रिल ते ३० जून या कालावधीसाठी ६७,६२१ मेट्रिक टन रासायनिक खतांचे आवंटन मंजूर केले होते. यापैकी ३० जूनपर्यंत ८१,१०० मेट्रिक टन खतांचा पुरवठा करण्याचे नियोजन होते . परंतु, प्रत्यक्षात २५ जूनपर्यंत केवळ ६२,८४१ मेट्रिक टन खतांचाच पुरवठा होऊ शकला आहे. आकडेवारीवर नजर टाकल्यास, जिल्ह्यात ह्यडीएपीह्ण खताची स्थिती अत्यंत गंभीर आहे. १२,७०० मेट्रिक टन गरजेच्या तुलनेत केवळ २५०२ मेट्रिक टन खत उपलब्ध झाले आहे, म्हणजेच गरजेच्या २० टक्केही पुरवठा झालेला नाही. युरिया, संयुक्त खते आणि एसएसपी खतांच्या पुरवठ्यातही मोठी घट झाली आहे. याउलट, ज्या खताची मागणी तुलनेने कमी असते, त्या ह्यएमओपीह्ण खताचा मात्र नियोजनापेक्षा (२,७५० मे. टन) अधिक म्हणजेच ४,००२ मेट्रिक टन पुरवठा झाला आहे.

# नवीन संचमान्यतेत जिल्ह्यात ७७८ शिक्षकांच्या जागा घटल्या

## ५८० रिक्त जागांवर भरतीचा मार्ग मोकळा

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील कमी होत चाललेली विद्यार्थी संख्या, शाळांचे समायोजन आणि नव्याने करण्यात आलेल्या संचमान्यतेमुळे जिल्ह्यात तब्बल ७७८ शिक्षक पदे घटली आहेत. मात्र, दुसरीकडे जिल्हा परिषद शिक्षण विभागाने ५८० रिक्त शिक्षक पदांच्या भरतीसाठी पवित्र पोर्टलवर जाहिरात अपलोड केल्याने शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

फेब्रुवारी महिन्यात करण्यात आलेल्या संचमान्यतेनुसार जिल्ह्यात ४,८५८ कार्यरत शिक्षक दाखविण्यात आले होते. मात्र जूनमध्ये झालेल्या सुधारित संचमान्यतेत ही संख्या ४,०८० इतकी करण्यात आली आहे. त्यामुळे संचमान्यतेनुसार ७७८ पदे कमी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया आता वेगाने सुरू झाली असून मराठी माध्यमाच्या ५२० आणि उर्दू माध्यमाच्या ६०, अशा एकूण ५८० शिक्षक पदांसाठी भरती करण्यात येणार आहे. गेल्या काही वर्षांपासून जिल्हा परिषद शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अनेक शाळांमध्ये उपलब्ध शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला होता. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्यापनावरही होत असल्याने रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी सातत्याने होत होती. शिक्षण विभागाने रिक्त पदांचा अहवाल तयार नसल्याने पोर्टल जाहिरात अपलोड करण्यासाठी शासनाकडून याला सलग तिसऱ्यांदा मुदतवाढ मिळाली होती.

# अखेर नगराध्यक्षांच्या पाठपुराव्याला यश

## विठ्ठल मंदिराजवळ नॅशनल हायवेवर गतिरोधक बसवले

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर विठ्ठल मंदिराजवळ वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. नॅशनल हायवे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी अपघातस्थळी गतिरोधक बसवून लोखंडी कठडे हटवले असून, नागरिकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.



२५ जून रोजी विठ्ठल मंदिराजवळ एका भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली होती. या भीषण अपघातात सचिन रमेश सावरकर (वय ३५, रा. अंजनगाव सुर्जी) यांचा जागीच मृत्यू झाला, तर मोहन ताडे हा युवक गंभीर जखमी झाला. सध्या त्याच्यावर अमरावती येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या रस्त्यावर भरधाव वाहने आणि अयोग्य ठिकाणी लावलेले लोखंडी कठडे अपघाताला कारणीभूत ठरत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने होत होत्या. विठ्ठल मंदिराजवळील हा मार्ग वर्दळीचा असल्याने लहान-मोठे अपघात नित्याचेच झाले होते. अपघाताची माहिती मिळताच नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी तात्काळ नॅशनल हायवे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला.

यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना अपघातस्थळाची सविस्तर माहिती देऊन दोन प्रमुख मागण्या केल्या. नगराध्यक्षांच्या मागणीची गंभीर दखल घेत नॅशनल हायवे प्राधिकरणाच्या पथकाने तातडीने कार्यवाही केली. पथकाने प्रथम अपघाताला निमंत्रण देणारे लोखंडी कठडे हटवले. त्यानंतर विठ्ठल मंदिराजवळ रस्त्यावर शास्त्रोक्त पद्धतीने गतिरोधक बसवण्याचे काम पूर्ण केले. अनेक दिवसांपासूनची मागणी पूर्ण झाल्याने स्थानिक नागरिक व वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे. 'विठ्ठल मंदिराजवळ सतत अपघात होत होते. नगराध्यक्षांनी लक्ष घालून प्रश्न सोडवल्याने आता धोका कमी होईल,' अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावरून जाताना वाहनचालकांनी वेगमर्यादेचे पालन करावे व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांकडून

# बीज उगवण क्षमता व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

शेती उत्पादनाची गुणवत्ता आणि पीक उगवण यशस्वी होण्यासाठी चांगल्या प्रतीच्या बियाण्यांची निवड अत्यंत महत्त्वाची असते. याच अनुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील कृषिदूतांनी ग्राम अंजनगाव बारी येथे बीज उगवण क्षमता व बीज प्रक्रिया विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित केला.महाविद्यालयाच्या सातव्या सत्रातील 'ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम'



(RAWE) अंतर्गत कृषिदूत अंश उ. देवघरे, मोहित र.गुल्हाणे, प्रणय पा. पिने, रोहन सं. बळी व सुप्रित सु. शेगोकार यांनी शेतकरी व ग्रामस्थांसाठी बीज उगवण क्षमतेचे महत्त्व स्पष्ट केले.

या प्रसंगी कृषिदूतांनी बियाण्यांची उगवण क्षमता तपासण्याच्या सोप्या पद्धतींबाबत मार्गदर्शन केले. उत्तम उगवण क्षमता असलेल्या बियाण्यांच्या वापरामुळे पिकांची सुरुवातीची वाढ चांगली होते तसेच उत्पादनात वाढ होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

तसेच बीज प्रक्रियेचे महत्त्वही शेतकऱ्यांना समजावून सांगितले. बियाणे पेरणीपूर्वी शिफारशीनुसार बुरशीनाशके, कीटकनाशके व जैविक घटकांच्या साहाय्याने बीज प्रक्रिया केल्यास बियाण्यांचे रोगांपासून संरक्षण होते, उगवण क्षमता सुधारते आणि रोपांची सुरुवातीची वाढ जोमदार होण्यास मदत होते. यावेळी बीज प्रक्रिया करण्याची योग्य पद्धत , अटी व त्याचे फायदे याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमासाठी उपस्थित ग्रामस्थांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे सर, उपप्राचार्य नितेश चौधरी सर, कार्यक्रम अधिकारी श्वेता देशमुख मॅडम व अदिती रजाने मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

## संक्षिप्त

### प्राथमिक आरोग्य केंद्रात पल्स पोलिओ लसीकरण



**शिराळा -** पोलिओ मुक्त भारताचे निर्माण करण्याकरिता पल्स पोलिओ विशेष लसीकरण मोहीम राज्यभरात राबविली जात असून. ० ते ५ वयोगटातील सर्व बालकांना आज ही लस पोलिओ बूथ वर पाजण्यात येत आहे.त्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्र शिराळा येथे सत्यम गांधी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्या हस्ते जिल्हास्तरीय मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती यांच्या हस्ते मुलांना पोलिओ डोज पाजण्यात आले.यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण परिसे, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. पराग राठोड, साथरोग अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, अमरावती डॉ. मनीषा सूर्यवंशी, डॉ सुमित राऊत, साथरोग अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, शिराळा डॉ. हर्षाताई गोहत्रे,डॉ. मंगेश राऊत, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक, गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रवीण परिसे यांनी केले. संचालक डॉ. हर्षा गोहत्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन योगेश गवई, आरोग्य सहाय्यक यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सर्व आरोग्य सहाय्यक, सहयिका, आरोग्य सेवक, सेविका, परिचर, वाहन चालक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांनी अथक प्रयत्न केले.

### पोषण, पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य समितीची बैठक

**नांदगाव खंडेश्वर -** तालुक्यातील पिंपळगाव निपाणी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या माळेगाव येथे पावसाळ्यात उदभवणाऱ्या विविध साथीच्या रोगांच्या प्रतिबंधासाठी ग्राम पोषण, पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य समितीची तातडीची बैठक समितीचे अध्यक्ष संदेश ढोके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया, अतिसार, टायफॉईड यांसारख्या साथीच्या रोगांचा वाढता धोका लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. गावातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी स्वच्छता, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, डासांची उत्पत्ती रोखणे, नाल्या व गटारांची नियमित स्वच्छता, साचलेल्या पाण्याची त्वरित विल्हेवाट, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. यावेळी माता व बाल आरोग्य, कुपोषण प्रतिबंध, नियमित लसीकरण, गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी, बालकांच्या पोषण आहाराचे महत्त्व तसेच नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीस समितीचे अध्यक्ष संदेश ढोके, सचिव छाया लांजेवार, संध्या काळे, ग्रामस्थ राजू काळे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

### तक्षशिला महाविद्यालयात आज 'चित्र प्रदर्शन'

**अमरावती -**भारत-तिब्बत मैत्री संघ, महाराष्ट्र राज्य आणि नोरगेलिंग तिब्बतीयन सेटलमेंट कॅम्प, गोठणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महामहिम दलाई लामा यांच्या ९० व्या वर्षानिमित्त त्यांच्या जीवनपटावर आधारित एक भव्य 'चित्र प्रदर्शन' दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा दौरा २६ जून ते ३ जुलै २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील वर्धा, यवतमाळ, अमरावती, पुणे आणि मुंबई या प्रमुख शहरांमध्ये आयोजित करण्यात आला आहे.या विशेष दौऱ्याची सुरुवात शुक्रवार, २६ जून रोजी नागपूर येथील संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला 'खाता'(पारंपारिक तिबेटी स्कार्फ) अर्पण करून झाली. याप्रसंगी उपस्थित बौद्ध अनुयायी आणि कार्यकर्त्यांनी त्रिशरण व पंचशील वंदना घेतली.भारत-तिब्बत मैत्री संघ, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अमृत बनसोड यांनी या रॅलीला हिरवी झेंडी दाखवून दौऱ्याचा शुभारंभ केला. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी दौऱ्यात सहभागी असणाऱ्या सर्व सदस्यांना शुभेच्छा दिल्या आणि भारत-तिब्बत मैत्रीचे महत्त्व अधोरेखित केले.याप्रसंगी भारत-तिब्बत मैत्री संघाचे सरचिटणीस सचिन रामटेके, नोरगेलिंग तिब्बतीयन सेटलमेंट कॅम्पचे सेटलमेंट ऑफिसर टी. सांगपो, महिला विंग प्रमुख श्रीमती हर्षा पाटील, मेजर गुणवंत सोमकुवर, राजेश हाडके, अशोक धमगाये, माधुरी रामटेके, राजेश पाटील, दवा ताशी, कर्मा नामका, तेनजिन नुरबु आदी प्रामुख्याने उपस्थित होते.


## मेळघाटातील रस्ते मृत्यूचा सापळा

# 'मैलकुली' व्यवस्था संपुष्टात, शासनाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांच्या जीवाशी खेळ

मेळघाटातील राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग आणि ग्रामीण रस्त्यांच्या देखभालीसाठी एकेकाळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रत्येक आठ किलोमीटर अंतरावर 'मैलकुली' नियुक्त असत. या कर्मचाऱ्यांमुळे रस्त्यांची दैनंदिन स्वच्छता, पाण्याचा निचरा, झाडझुडपांची छाटणी, रस्त्यावर आलेली माती हटविणे, बंद गटारे मोकळी करणे आणि लहान-मोठ्या दुरुस्तीची कामे नियमित होत होती. मात्र गेल्या अनेक वर्षांत मोठ्या प्रमाणावर हे कर्मचारी निवृत्त झाले, पण त्यांच्या जागी नवीन भरती करण्यात आली नाही. परिणामी आज मेळघाटातील बहुतांश रस्ते अक्षरशः देखभालीअभावी बेवारस झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

मेळघाट हा डोंगराळ, वळणावळणाचा आणि दाट जंगलाने वेढलेला भाग आहे. येथे पावसाळ्यात काही तासांच्या पावसानेही रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती वाहून येते. अनेक ठिकाणी पाणी साचते, तर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढणारी झाडझुडपे वाहनचालकांची दृश्यता कमी करतात. पूर्वी मैलकुली नियमितपणे ही झुडपे छाटत असल्याने वळणावर समोरून येणारे वाहन सहज दिसत असे. आता अनेक महिन्यांपासून ही कामे होत नसल्याने प्रत्येक वळण अपघाताचे कारण ठरत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

धारणी, चिखलदरा, सेमाडोह, हरिसाल, बैरागड, चूर्णी, राणीगाव आणि इतर दुर्गम मार्गांवर पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर बनते. गटारे बंद झाल्याने पाणी थेट रस्त्यावरून वाहते. त्यासोबत माती, दगड आणि जंगलातील पालापाचोळा रस्त्यावर साचतो. दुचाकीस्वारांचे वाहन घसरते, चारचाकी वाहनांचे संतुलन बिघडते आणि अनेकदा



समोरासमोर धडक होण्याच्या घटना घडतात. स्थानिकांच्या मते, अनेक अपघात टाळता आले असते, जर रस्त्यांची नियमित देखभाल झाली असती.

पूर्वी प्रत्येक मैलकुली आपल्या कार्यक्षेत्रातील रस्त्याची रोज पाहणी करत असे. रस्त्यावर झाडाची फांदी पडली, पाण्याचा निचरा बंद झाला, रस्त्यावर माती आली किंवा झुडपे वाढली, तर त्यावर तात्काळ उपाययोजना केली जात होती. त्यामुळे रस्ते सुरक्षित राहायचे. आज मात्र अशी कोणतीही नियमित व्यवस्था दिसून येत नाही. त्यामुळे छोट्या समस्यांचे मोठ्या धोक्यात रूपांतर होत आहे.

मेळघाटातील अनेक रस्ते वनक्षेत्रातून जात असल्याने येथे वळणांची संख्या अधिक आहे. या वळणांवर वाढलेली झाडझुडपे आणि गवतामुळे समोरून येणारे वाहन शेवटच्या क्षणापर्यंत दिसत नाही. त्यामुळे अचानक समोरासमोर धडक होण्याच्या घटना वाढत आहेत. विशेषतः पावसाळ्यात रस्त्यावर येणारी माती आणि साचलेले पाणी वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण करत आहे. अनेक निष्पाप नागरिकांना यामुळे आपला जीव गमवावा लागल्याची खंत स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

शासनाकडून दरवर्षी रस्ते विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. नवीन रस्ते, पूल आणि दुरुस्तीची कामे केली जातात. मात्र या रस्त्यांची रोजची देखभाल करणारी यंत्रणाच कमकुवत झाल्याने या कामांचा अपेक्षित फायदा नागरिकांना मिळत नसल्याची टीका होत आहे. मजबूत रस्ता बांधणे जितके आवश्यक आहे, तितकेच त्याची नियमित देखभाल करणेही गरजेचे आहे. ही जबाबदारी पूर्वी मैलकुली प्रभावीपणे पार पाडत होते.

तालुक्यातील नागरिकांनी शासनाकडे तातडीने रिक्त मैलकुली पदांची भरती करण्याची मागणी केली आहे. भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रत्येक रस्त्यावर रोजंदारीवर मजूर नियुक्त करून झाडझुडपे कापणे, गटारे साफ करणे, रस्त्यावरची माती हटविणे आणि साचलेल्या पाण्याचा निचरा करण्याची कामे नियमितपणे करण्यात यावीत, अशीही मागणी होत आहे.

पत्रकार
**चंद्रकांत तिवारी**
धारणी

# महाकर्जमुक्तीचा महानिर्णय

**शेतकरीराजा आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.**




शेतकरीबांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना' हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

**कर्जमुक्ती योजना काय आहे**

२०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही. याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना**

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

**प्रोत्साहनपर लाभ**

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड



करणे आवश्यक राहील. तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा**

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु.५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (OTS) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

**योजनेचे निकष**

पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.

३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.

३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.

**जमीन धारणेची अट नाही.**

पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.

२ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.

शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.

राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जांना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत**

विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.

केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु.२५ हजार पेक्षा अधिक आहे. राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.

शेतीव्यातिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती, निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिकमासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).

कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.

या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृ?ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**– विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# वटपौर्णिमेच्या पूजेसाठी महिलांच्या संख्येत लक्षणीय घट

पतीला दीर्घायुष्य लाभावे आणि सात जन्मी हाच पती मिळावा, यासाठी वटपौर्णिमेच्या दिवशी महिला वडाच्या झाडाचे पूजन आजवर करत आल्या आहेत. वडाच्या झाडाला मनःपूर्वक प्रदक्षिणा मारणे, सूताचे सात वेढे त्या झाडाला देणे, पिकलेले आंबे व पानांचा विडा वगैरे साहित्य ठेवून महिला मनातील संकल्प मांडतानाचे चित्र आजवर दिसत होते. परंतु, नारीकल्याण करणाऱ्या काही निवडक संघटनांच्या नुकत्याच जारी झालेल्या अहवालानुसार हे चित्र थोडे धक्कादायक आहे.हल्ली स्त्रिया आधुनिक झाल्या आहेत.त्याचप्रमाणे घरात दिवसभर जीन्स-पँट आणि तोकडे टॉप घालण्याची सवय असल्याने, पूजेसाठी साडी (पातळ) परिधान करणे, नाकात नथ व इतर स्त्रीसुलभ दागिने चढवणे आणि त्या पेहरावात वावरणे यात अनेक अडचणी उद्भवतात, असे अनेकांचे निरीक्षण आहे. त्यामुळे 'चांगला नवरा जन्मोजन्मी मिळावा' यासाठीचा आग्रह अनेक आधुनिक महिलांनी बाजूला ठेवल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.याला दुसरी अडचण अशी आहे की, स्त्रिया आता समजदार आणि व्यवहारी झाल्या आहेत. 'सत्यवान आणि सावित्री' या पौराणिक कथेवरील त्यांचा विश्वास ढळू लागला आहे. काळाच्या ओघात जनजीवन आणि माणसांमध्ये अमूलाग्र बदल घडत आहेत. सत्यवान आणि सावित्री यांचे परस्परांतील स्नेहबंध, जे पुराणात अधोरेखित केले आहेत, आणि सावित्री यमराजाकडे सत्यवानाच्या जीवदानासाठी जी करुणा भाकते, ही कथा आजच्या आधुनिक युगात कुठेच सुसंगत वाटत नाही. या कथेतील खरे-खोटेपणावर भाष्य करण्याचा आमचा मुळीच हेतू नाही.

खरे तर असे आहे की, हल्लीच्या पती-पत्नीच्या नात्यांमध्ये अनेक कारणांमुळे दिवसेंदिवस ताणतणाव आणि बेबनाव वाढत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे 'कसेही करून सात जन्म हाच पती मिळावा' अशी आग्रही भूमिका घेणारी स्त्री आज अभावानेच सापडेल, अशी माझी धारणा आहे. याची दुसरी बाजू अशी की, हीच पत्नी सात जन्म टिकून राहावी, यासाठी पुरुष मंडळी तरी आग्रही राहतील का? याबाबत शंकाच आहे. एकाच जन्मात दोघांनाही एकमेकांचे पराकोटीचे कटू अनुभव येत असल्याचे सामाजिक चित्र आहे. म्हणून 'आता पुढे आणखी या विषाची परीक्षा नको' असे दोघांनाही वाटणे अगदी स्वाभाविक आहे.

क्रिकेटमध्ये पूर्वी टेस्ट मॅच असायची, नंतर वन-डे मॅचचे चलन आले आणि आता 'ट्वेन्टी-ट्वेन्टी' असा आटोपशीर बदल झाला आहे. आता काही दिवसांनी 'दहा-दहा' ओव्हर्सच्या मॅचचे चलन आल्यास नवल वाटू नये. काळाच्या ओघात स्थित्यंतरे होतच असतात आणि बदल हा नेहमीच चांगला असतो; या न्यायाने या सर्व गोष्टींचे स्वागतच करायला हवे. जागतिक स्तरावर दिवसेंदिवस लक्षणीय बदल होत आहेत आणि काही बाबींमध्ये आपण भारतीय फार पुढे गेलो आहोत. 'लिव्ह-इन रिलेशनशिप' आणि 'कॉन्ट्रॅक्ट मॅरेज' या संकल्पना आजवर परदेशात पाहायला मिळत असत, आता आपल्या देशातही या बाबींचे संक्रमण झपाट्याने होत आहे. परिस्थितीनुसार असा बदल होणे गैर नाही. त्यामुळे वटसावित्री पूजनासाठी महिलांच्या संख्येत घट झाल्यास नवल ते काय

तरीही, वरील बाबींमध्ये तथ्य असो वा नसो, या चिकित्सेत लक्ष न घालता श्रद्धा असणाऱ्या देवभोळ्या महिलांची संख्या आजही कमी नाही. अशा वेळेस काही महिला पारंपरिक पद्धतीने अत्यंत श्रद्धेने वटसावित्रीचे पूजन करतात, काही महिला केवळ एक उपचार (प्रथा) म्हणून हा इव्हेंट साजरा करतात, तर काही महिला तटस्थपणे फायदा-तोट्याचा विचार न करता आपले कर्तव्य करत असतात. मात्र, या तिन्ही संवर्गातील महिलांचा केंद्रबिंदू एकच असतो, तो म्हणजे त्यांच्या मनातील कुटुंबाप्रती असलेले ममत्व !कुटुंबाच्या उत्कर्षासाठी महिलांचे जे योगदान असते, त्याला जगात तोड नाही. सर्व काही देवाच्या भरोशावर सोडून त्या मायमाऊल्या उपवास आणि व्रतवैकल्ये करतात. नवरा व संपूर्ण कुटुंबासाठी त्या प्रामाणिकपणे अहोरात्र देवाचे नामस्मरण करतात. गावाजवळील शेतात जाऊन भल्या मोठ्या वटवृक्षाची मनोभावे पूजा करतात. सोबत त्यांच्या आवडीच्या सख्या असतात. त्यांच्यातील हा आनंद आणि समर्पण पाहून मन थक्क होते.

शहरांमध्ये जिथे वडाचे झाड उपलब्ध नाही, तिथे काही महिला कुंडीतील वटवृक्षाच्या 'बोन्साय'चे पूजन करताना दिसतात. काही ठिकाणी नर्सरीमधून वडाचे ताजे रोपटे आणून वटवृक्ष पूजनाची प्रतिकात्मक इच्छा पूर्ण केली जाते. मेट्रो शहरात जिथे बहुमजली इमारती आणि फ्लॅट संस्कृती आहे, तिथे वडाची फांदी गॅलरीत बांधून २५ व्या मजल्यावरही पूजेचा आनंद पदरात पाडून घेतला जातो. काही शहरांत वटसावित्रीच्या दिवशी बाजारात वडाच्या फांद्या विकायला असतात आणि श्रद्धाळू महिला त्या फांद्या विकत घेऊन आपले व्रत पूर्ण करतात. अशा वेळेस महिलांच्या मनात एक विचार नक्कीच येतो की, वडाच्या लहान फांदीला प्रदक्षिणा कशी घालावी तेव्हा काही महिला स्वतःभोवतीच सात वेळा प्रदक्षिणा घालतात, असे माझे निरीक्षण आहे. मात्र, 'बोन्साय' झाडाचे किंवा नुसत्या लहान फांदीचे पूजन केल्यास अपेक्षित फलप्राप्ती होणार नाही, असा किंतु महिलांनी मनात आणू नये. कारण श्रद्धेला मोल नसते.

'मानो तो मैं गंगा माँ हूँ,
न मानो तो बहता पानी...'

पौराणिक काळापासून सुरू असलेल्या या व्रताबाबत मला मात्र थोडा पक्षपातीपणा दिसून येतो. पुरुषांसाठीसुद्धा असेच एखादे व्रत असावे, असे अनेक पुरुषांच्या मनात असू शकते; कारण 'हीच पत्नी आपणास सात जन्म मिळावी' अशी इच्छा असलेल्या पुरुषांची संख्याही कमी नाही. हवे तर या व्रतला आम्र सत्यवान व्रत असे संबोधवे त्यात पुरुषांनी आम्रवृक्षाचे पूजन करावे. त्यानुरूप यथासांग पूजा अर्चा करावी. जेवढे जन्म हीच पत्नी हवी आहे, तेवढ्या फेऱ्या पुरुषाने आंब्याच्या झाडाला माराव्यात. असे झाल्यास समस्त महिलांच्या उत्थानाकरिता हे एक क्रांतिकारी पाऊल उचलल्यासारखे होईल. असे जर शासन स्तरावरही यात काही करता आले,आणि तशी अधिसूचना निघाली तर महिलांच्या आनंदाला पारावार राहणार नाही. मात्र, आपले 'पतिराज' हे व्रत किती निष्ठेने पार पाडतात, यावर प्रत्येक महिलेचा बारीक कटाक्ष राहील. त्यातूनच पतिराजांना आपल्याविषयी खरोखरच किती प्रेम आहे, हे महिलांना जाणून घेण्याची एक उत्तम संधी मिळेल!अशा या नव्या उपलब्धतेमुळे महिलांच्या मानसिकतेतही अमूलाग्र बदल होऊ शकतो. नवऱ्याविषयीचा पूर्वापार चालत आलेला पूर्वग्रह दूर होऊन कृतज्ञतेचे नवे तरंग त्यांच्या मनात उठू लागतील आणि त्या आपली कृतज्ञता खालील शब्दात व्यक्त करायला लागतील.

'सतत आपण त्याच्याशी भांडतो,
गरजेच्या वेळी मात्र तोच पाठीशी उभा असतो.
सगळे जग पाहिल्यावर कळते
त्याच्याशिवाय आपले दुसरे कोणी नसत.'

**डॉ. राजेंद्र भुयार,**
अमरावती.
मो. ९५०३०४६५५५



# वटपौर्णिमा परंपरा, निसर्गसंवर्धन आणि स्त्रीशक्तीचा उत्सव

भारतीय संस्कृतीमध्ये व्रतवैकल्यांना विशेष महत्त्व आहे. या व्रतवैकल्याच्यामागे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि निसर्ग अशी अनेक मूल्ये सामावलेली आहेत. यापैकीच महाराष्ट्रामध्ये ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेला वटपौर्णिमा साजरी केली जाते. या दिवशी विवाहित स्त्रिया वडाच्या वृक्षाची पूजा करून आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि कुटुंबाच्या सुखा-समृद्धीसाठी प्रार्थना करतात.मला नेहमी एक प्रश्न पडत आला आहे, आपल्या संस्कृतीमध्ये व्रत, उपवास स्त्रियांसाठीच का आहेत? याचे उत्तर असे असावे कदाचित, स्त्री ही निसर्गाशी जास्त जोडली गेली आहे. ती सृजनशील, सर्जनशील आणि नवनिर्मितीचा स्त्रोत आहे. ज्या स्त्रीने शेतीचा शोध लावला तिच्यामध्ये संवर्धन करण्याची वृत्ती आणि प्रेरणाही होती. निसर्गाचे वृक्षाचे संवर्धन व्हावे म्हणून त्या पाठीमागे आपल्या धर्मग्रंथांमध्ये, पोथी पुराणांमध्ये व्रतवैकल्य जोडली.

यानिमित्ताने निसर्गाचे रक्षण होईल आणि मानवाला सुख-समाधान मिळेल. तसेच वटपौर्णिमेचे महत्त्व वाढण्यासाठी सत्यवान सावित्रीची कथा पुराणांमध्ये लिहिली गेली असेल. वडाचा वृक्ष ऑक्सिजन भरपूर देतो. सत्यवानाला वडाच्या झाडाखाली झोपविल्यामुळे ऑक्सिजन भरपूर मिळाला असेल आणि त्याचे प्राण वाचले असतील. परंतु आपल्याकडे कुठल्याही गोष्टीचा उत्सव होतो आणि त्या मागचे खरे कारण कोणीही विचारात घेत नाही. नटूनथटून सोळा शृंगार करून स्त्रिया वडाच्या पूजेला जातात. वडाला दोरा बांधून हाच नवरा सात जन्म मिळू दे अशी हास्यास्पद मागणी मागतात. खरे तर एका जन्मातच दोघे एकमेकांना कंटाळलेले असतात त्यामुळे दोघांनाही सात जन्म तोच नवरा किंवा तीच बायको हवी असते का? मला वाटते याचे उत्तर नाही असे असेल. एकतर पुढचा जन्म आहे की नाही हेच मुळात कोडे आहे, बरे समजा पुढचा जन्म असला तर तो मुलीचा असेल की मुलाचा असेल कोण जाणे. मग आणि एवढ्या करोडो लोकसंख्येतून वड बिचारा तुम्हाला तोच जोडीदार कुठून शोधून देणार? आणि राहिला उपवासाचा प्रश्न, तर उपवासामुळे फक्त पोटाचे आरोग्य सुधारू शकते, त्यासाठीच उपवास करावा. बाकी भाकड कथांकडे फारसे लक्ष न देता सध्याच्या सावित्रीने तरी डोळे उघडे ठेवून वटपौर्णिमेच्या दिवशी एक वडाचे झाड लावले, की पुढच्या सात पिढ्यांनाच नाहीतर कित्येक पिढ्यांना सावली व ऑक्सिजन देतील. गेल्या वर्षीची ही गोष्ट. माझी घरकाम करणारी बाई आली आणि आल्याबरोबर तिच्या अंगावरचे माराचे व्रण पाहून मी तिला विचारले, 'काय झाले?' तर म्हणाली, 'ताई माझ्या बेवड्या नवऱ्याने मारले.' का मारले याचे कारण तिने सांगितले दारूला पैसे दिले नाहीत म्हणून मारले. मग मी म्हणाले, 'पोलीस स्टेशनला कंप्लेंट का नाही केली?' तर म्हणाली 'रोजचंच आहे. जाऊ द्या माझे नशीबच फुटके.' काम झाल्यानंतर घरी जाताना म्हणाली, 'ताई मी उद्या येणार नाही.

उद्या मला वडाची पूजा करायला जायचे आहे.'त्यावर मी म्हणाले, वडाला सात जन्म हाच नवरा मागणार आहेस का? हाच दारूडा नवरा तुला पुढच्या जन्मातही हवा आहे का? त्यावर तिला काय उत्तर द्यावे समजले नाही. मग म्हणाली, आई-आजी वडाची पूजा करत होत्या म्हणून मी पण करते. किती दिवस हे असंच चालणार? आशिक्षित स्त्रियांचे ठीक आहे पण सुशिक्षित स्त्रियादेखील वडाच्या फांद्या तोडून आणून त्याची पूजा करतात. अंधपणे पाठीमागून चालत आलंय म्हणून कोणतेही व्रत पुढे चालू ठेवतात; परंतु त्याच्या मागची कारणे समजून घेत नाहीत.वडाच्या वृक्षाचे पौराणिक महत्त्व असे आहे, भारतीय संस्कृतीत वडाच्या वृक्षाला अमरत्वाचे प्रतीक मानले जाते. वटवृक्षांमध्ये ब्रह्मदेवाचा वास असतो. खोडात विष्णूचे अस्तित्व मानले जाते.काही वर्षांनी त्याचे डेरेदार वृक्षामध्ये रूपांतर होईल. त्याच्या सावलीला प्रवासी विसावतील. पक्षी खांद्यावर घरटे बांधतील. वडाचे झाड दिवसभर मोठ्या प्रमाणात प्राणवायू निर्माण करेल आणि वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेईल आणि परिसरातील तापमान कमी करेल.

जमिनीतील पाण्याचे संवर्धन होईल. लोकांनी श्रद्धेने वृक्षारोपण करून त्याचे श्रद्धेने पालन करावे म्हणून याला धार्मिक कहाणी जोडली असावी आणि स्त्रियाच प्रत्येक गोष्टीचे पालन अतिशय श्रद्धेने आणि आपुलकीने करतात. कुटुंबाच्या सुखासाठी समर्पण करतात म्हणून हे व्रत स्त्रियांनी करावे असे त्यामागे कारण आहे.आजच्या काळात वाढते शहरीकरण, जंगलतोड आणि हवामानात होत असलेला बदल. जमिनीची झपाट्याने होत असलेली धूप, वाढते तापमान यामुळे मनुष्य त्रस्त होत चालला आहे. सर्व सुख-सोयी बाजूला असूनही तो सुखाची अनुभूती करत नाही. सिमेंटच्या जंगलात राहताना तो निसर्गापासून दूर जात आहे.आपली पारंपरिक संस्कृती जपतात.जाता जाता एवढेच सांगेल, की वटपौर्णिमेच्या व्रतामागे श्रद्धा, निसर्गप्रेम आणि कुटुंबसंस्कृती यांचा सुंदर संगम आहे. सावित्रीच्या निष्ठेचा आदर्श, वडाच्या वृक्षाचे पर्यावरणीय महत्त्व आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश या निमित्ताने मी आपल्यापर्यंत पोहोचले आहे. आपण वृक्षांचे रक्षण केले, तर वृक्ष आपले आणि संपूर्ण पृथ्वीचे रक्षण करतील.

**- स्मृतीगंध-लता गुठे**

■ सोमवार, २९ जून २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखय

अकोला
जिल्हा विशेष

# नरेगात बनावट मजुरांच्या नोंदींची चौकशी रखडली ?

## सुकळीतील प्रकरण ; उपजिल्हाधिका-यांच्या आदेशानंतरही कारवाईला विलंब, ग्रामस्थांचा संताप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत सुकळी गावातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) विविध कामांमध्ये बनावट मजुरांच्या नोंदी करून शासनाची फसवणूक झाल्याच्या तक्रारीची चौकशी अद्याप सुरू न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. उपजिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतरही दोन आठवडे उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

सुकळी येथे मनरेगा अंतर्गत नाला खोलीकरण, वृक्षलागवड आदी कामांमध्ये प्रत्यक्ष काम न करणाऱ्या व्यक्तींची मजूर म्हणून नोंद दाखवून शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप संकेत वांडे यांच्यासह ग्रामस्थांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी २ जून रोजी जिल्हाधिकारी, तहसीलदार तसेच गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. तक्रारीची दखल घेत रोजगार हमी योजनेच्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी १५ जून रोजी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र पाठवून चौकशी करण्याचे निर्देश दिले. मात्र आदेशानंतरही चौकशी प्रत्यक्षात सुरू न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे.



तक्रारीनुसार, रोजगार सेवक, संबंधित ठेकेदार आणि काही अधिकारी यांच्या संगनमतातून मनरेगाच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. चौकशीचे स्पष्ट आदेश असतानाही संबंधित यंत्रणा दिरंगाई करत असल्याने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करावी तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

'सुकळी येथील मनरेगाच्या विविध कामांमध्ये बनावट मजुरांच्या नोंदी करून शासनाची फसवणूक झाल्याची तक्रार २ जून रोजी केली होती. उपजिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतरही दोन आठवडे उलटले तरी चौकशी सुरू झालेली नाही. प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची शंका आहे.'

**संकेत वांडे,** तक्रारदार

### रोजगार हमी योजनेचा फज्जा?

पातूर पंचायत समितीअंतर्गत अनेक गावांमध्ये रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. सुकळी येथील कथित अनियमिततेच्या तक्रारीवर चौकशीचे आदेश असूनही ती रखडल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणात चौकशीचा अहवाल कधी येणार आणि दोषींवर कारवाई होणार का, याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# पहिल्याच पावसात सोलर खांब जमीनदोस्त

## आलेगाव परिसरातील निकृष्टकामाचा आरोप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यात शनिवारी (२७ जून) सायंकाळी झालेल्या मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे डोणगाव-आलेगाव मार्गालगत उभारण्यात आलेले शासकीय सौरऊर्जेचे खांब कोसळल्याची घटना घडली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, शेतातील पिकांसह शंभरहून अधिक झाडांचे नुकसान झाल्याने संबंधित शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनास्थळी पाहणी केली असता अनेक खांबांचे पाय उखडल्याचे दिसून आले. त्यामुळे सोलर प्रकल्पाच्या कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी संबंधित ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर निकृष्ट दर्जाचे काम करून शासकीय निधीचा अपव्यय केल्याचा आरोप केला आहे. काही ठिकाणी सोलर खांब झाडांना बांधण्यात आल्याचाही दावा ग्रामस्थांनी केला असून, संपूर्ण कामाची तांत्रिक चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



### पहिल्याच पावसात गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

पहिल्याच जोरदार पावसात सोलर खांब कोसळल्याने कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खांबांच्या पायाभरणीत त्रुटी असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, संपूर्ण प्रकल्पाची सखोल चौकशी करून निकृष्ट काम करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, मुसळधार पावसानंतर आलेगावसह परिसरातील वीजपुरवठाही खंडित झाला. त्यामुळे नागरिकांना अंधारात रात्र काढावी लागली. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने महावितरणच्या देखभाल आणि दुरुस्ती व्यवस्थेवरही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. ग्रामस्थांनी सोलर प्रकल्पाच्या कामाची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून दोषी आढळणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is (K8193686) From
**MOHAMED HANIFUDDIN ALLAUDDIN**
-TO-
**MOHAMMAD HANIF UDDIN QURESHI ALLAUDDIN QURESHI**
DOB IS - 06/04/1955My Residential Address is -- Pinjari Galli Near shah Babu loj Mohammad Ali Chouk Akola Maharashtra 444001.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is (K8193686) From
**SHAHNA PARVIN MOHAMED HANIFUDDIN**
-TO-
**SHAHANA PARVEEN MOHAMMAD HANIFUDDIN**
My Residential Address is -- Pinjari Galli Near shah Babu loj Mohammad Ali Chouk Akola Maharashtra 444001.

**Change In Name**

I Have Change My Name From (Old Name)
**ASHISH ASHOKRAO RATHI**
-- TO -- (New Name)
**ASHISH ASHOKJI RATHI**
My Residential Address is - Near Neharu Park Ward No 5 Dhamangaon Railway Amravati Maharashtra 444709.

# जिल्हा माहेश्वरी महिला संघटनचा योग कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

नारी शक्ती स्वस्थ समाज या सूत्राखाली मार्गक्रमण करणाऱ्या अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडले. महेश नवमी पर्वावर आयोजित या कार्यक्रमात अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटनेच्या अध्यक्षा शारदा लखोटिया, सचिव आरती पनपालिया, स्वर्णिम अध्यात्म पर्व व संस्कृती समितीच्या संयोजिका रचना लड्ढा व सहसंयोजिका रेखा मोहत उपस्थित होत्या. योग प्रशिक्षिका माया भूमीभार यांनी सर्वप्रथम 'ॐ' मंत्राचा जप करून योगाची सुरुवात केली. त्यांचे स्वागत संयोजिका रचना लड्ढा आणि रेखा मोहता यांनी केले.

# लोकशाही जिवंत ठेवणारे शाहू महाराज : अमोल मिटकरी



**अकोला :** छत्रपती शाहू स्मारकामुळे तुमच्या मुलांचे भविष्य उज्वल होणार आहे. शाहू स्मारकातर्फे समस्त महापुरुषांच्या जयंती साजरी करून समानतेचा विचार पेरण्याचे काम होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. करविर संस्थानच्या राज्याने मा. लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम केल्याचे प्रतिपादन मा. आमदार अमोल मिटकरी बोलतांना म्हणाले. सदर कार्यक्रम छत्रपती शाहू महाराज फाउंडेशन, खडकी, अकोला तर्फे घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय जवान विकास दामोदर होते तर प्रमुख मार्गदर्शन व शाहू फाऊंडेशनचे निर्माता मा.आ. अमोल मिटकरी, प्रमुख पाहुणे म्हणून, प्रवीण लोखंडे साहेब (साखर उपसंचालक सह. आयुक्त, नागपूर) नगरसेवक शंकरराव लंगोटे, राहूल इंगळे सर, पत्रकार तथा गाथा रमाईकार पंजाबराव वर, राहूल इंगोले, आर्टिस्ट चौथे सर, खिरोडकर सर उपस्थित होते. साखर उपसंचालक सह. आयुक्त, प्रवीण लोखंडे साहेब बोलतांना म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी सर्व समाजाच्या मुलांनी शिकले पाहिजे म्हणून शाळा व वस्तीगृहाची निर्मिती केली त्यांचा विचार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये अंगीकृत करून सर्व समाजाच्या मुला-मुलींच्या मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. यावेळी राहूल इंगळे साहेबांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी राणी गावंडे, किरणताई व वानखडेताई यांनी जयंती निमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाला सतीश चौके, माणिकराव वाहूरवाघ सर, यशवंतराव देशमुख, दामोदर साहेब, प्रवीण गोपनारायण, बाबाराव साखरे, श्रावण फाले, संतोष शिंदे, अनिल मेघने, आलाराम जाधव आदींनी केले.

# महानगरात मोफत जयपूर फूट, कुत्रिम पाय शिबिराचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

अपघात, गँगरीन अथवा अन्य कारणास्तव आपला पाय गमावणाऱ्या दिव्यांग रुग्णासाठी मोफत जयपूर फूट (कुत्रिम पाय) वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानीय दुर्गा चौक येथील मुरारका हॉस्पिटल मध्ये हे जयपुर फूट वितरण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यात मुरारका हॉस्पिटल येथेच हे कुत्रीम पाय तज्ञ कारागीराकडून निर्माण करून ते दिव्यांग व्यक्तींना लावण्यात येणार आहेत. गुडघ्यापासून खाली व वर पाय गमावणाऱ्या गरजू महिला व पुरुष दिव्यांग व्यक्तीसाठी हे मोफत शिबिर होत असून यात उच्च दर्जाचे जयपूर फूट डॉ कैलाश मुरारका, डॉ अचिन मुरारका या तज्ज्ञांच्या



मार्गदर्शनात बसविण्यात येणार आहेत. महानगरात मुरारका हॉस्पिटलच्या वतीने अनेक वेळा हा मोफत जयपूर फूट वितरण उपक्रम राबविण्यात आला असून त्याला विदर्भातील विविध जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

**जाहीर सूचना**

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे सौ. रेखाबाई भगवान चोपडे यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे - रसुलपुर, मालमत्ता क्रं. ३६५ याचे एकूण क्षेत्रफळ १००० चौ. फुट. ता. नांदुरा आणि जिल्हा. बुलढाणा.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे सौ. रेखाबाई भगवान चोपडे यांना वारसाने - वडिलोपार्जित मिळालेली आहे. तसेच वरील नमूद मालमत्तेविषयी शासकीय निमशासकीय इतर भानगड, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बँक गहाण - बोजा नोंद कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता Piramal Finance ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार गहाण करण्यात येईल करिता हि जाहीर सूचना देत आहे.

ठिकाण- तालुका नांदुरा जिल्हा बुलढाणा.
दि. २६/०६/२०२६

आपला
**ॲड. रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती, मो. नं. ९८२३६९८७४५

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८६६/२०२६ प्रोसेस नं.७६१८/२०२६
चौ.ता. २९/०७/२०२६ दिनांक : १६/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती कमलाबाई महादेव नंदाने २. संतोष महादेव नंदाने क. १ व २ रा. वैराट राजापुर, ता. जि. अकोला. ३. सौ. रेखा महादेव मोहाळे रा. पिंप्री गवळी, ता. मोताळा, जि. बुलढाणा. ४. वैशाली नितेश नंदाने रा. वैराट राजापूर, ता. जि. अकोला, ५. श्रावणी नितेश नंदाने ६. आन्वी नितेश नंदाने ७. सान्वी नितेश नंदाने अर्जदार क. ४ ते ७ रा. वैराट राजापूर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : महादेव देवराव नंदाने
**पत्ता :-** रा. वैराट राजापुर, ता. जि. अकोला.

या अर्धीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत महादेव देवराव नंदाने यांचे दि. ३०/०९/२०२५ रोजी वैराट राजापुर, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी भझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# सुधीर भगत लोकजनशक्ती पार्टीचे विभागीय अध्यक्ष

■ प्रतिनिधी | अकोला ■

माजी केंद्रीय मंत्री व दलित-बहुजनांचे राष्ट्रीय नेते स्व रामविलास पासवान प्रणित व केंद्रीय मंत्री चिराग पासवान राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या लोकजनशक्ती पार्टीच्या विभागीय अध्यक्षपदी स्थानीय सिंधी कॅम्प परिसरातील रहिवासी सुधीर भगत यांची नियुक्ती करण्यात आली.स्थानीय शासकीय विश्रामगृहात नुकत्याच संपन्न झालेल्या पार्टीच्या बैठकीत पार्टीचे प्रदेश अध्यक्ष प्रमोद कुदळे यांनी भगत यांना नियुक्ती पत्र बहाल करून त्यांच्यावर अमरावती विभाग अध्यक्ष पदाचा भार सोपविण्यात आला.यावेळी पार्टीचे उपाध्यक्ष




पंकज माहूरे,प्रदेश सचिव तुषार मोर उपस्थित होते.आपणावर सोपविलेली जबाबदारी आपण निष्ठेने पार पाडून पक्ष संघटन मोठ्या जोमाने वाढविण्यासाठी संपर्क अभियान सुरू करणार असल्याचे सांगितले.यावेळी प्रदेश अध्यक्ष प्रमोद कुदळे यांनी मार्गदर्शन करीत कार्यकर्त्यांनी स्व पासवान यांचे फुले शाहू आंबेडकर विचार घराघरात पोहचवून संघटन वाढविण्याचे आवाहन केले. यावेळी लोकजनशक्ती पार्टी चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्योजक श्रीकिसन अग्रवाल यांना चेंबररत्न पुरस्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरातील सामजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यापारीक व धार्मिक सेवेत सेवारत असणारे 'गंगासहाय' समूहाचे प्रमुख व विदर्भ चेंबरचे माजी अध्यक्ष श्रीकिसन अग्रवाल यांची चेंबरच्या मानाच्या चेंबररत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांना हा पुरस्कार आज रविवार दि २८ जून रोजी पोलीस लॉन मध्ये आयोजित चेंबरच्या ९९ व्या वार्षिक आमसभेत मान्यवरांच्या हस्ते बहाल करण्यात येणार आहे.सेवाभावी श्रीकिसन अग्रवाल हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व असून महानगरात सफल उद्योजक म्हणून ते ख्यातनाम आहेत.श्रीकिसन



अग्रवाल हे महाराजा अग्रसेन भवन ट्रस्ट, सालासर बालाजी मंदिर, रामदेवबाबा -श्यामबाबा मंदिर, सनातन धर्मसभा पुस्तकालय, अकोला आयुर्वेदिक औषधालय, शक्तिधाम आदी संस्थांचे विश्वस्त असून ते अग्रवाल नवयुवक मंडळाचे संस्थापक, ग्रैंन मर्चेंट एसो.,रोटरी क्लब अकोला, विदर्भ चेबर, सनातन धर्मसभा पुस्तकालयाचे माजी अध्यक्ष आहेत. विदर्भ चैंबरचे अध्यक्ष असतांना त्यांनी सन १९९० मध्ये कृषि विद्यापीठ परिसरात राष्ट्रीय दाल मिल सम्मेलन आयोजित करून विदर्भातील डाळींना राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त करून दिले होते. ते सनातन धर्मसभा पुस्तकालयचे अध्यक्ष असतांना केवळ १२ तासात पुस्तकालयचे तब्बल १९२२ सदस्य जोडून 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्ड' मध्ये नवा विश्व विक्रम निर्माण केला.त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना चेंबर रत्न पुरस्कार बहाल करण्यात येत आहे.त्यांना मिळालेल्या या गौरवशाली पुरस्कार बद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# औद्योगिक समस्यांच्या निराकारणासाठी पाठपुरावा करणार - खा. खंडेलवाल

■ प्रतिनिधी | अकोला ■

पश्चिम विदर्भात प्रामुख्याने अकोला जिल्ह्यात औद्योगिक व व्यापारी क्षेत्र राष्ट्रीय स्तरावर गतिमान व्हावे यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे मत नवी दिल्ली येथील खासदार व राष्ट्रातील सर्वोच्च व्यापारी संघटना असणाऱ्या कॅटचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रवीण खंडेलवाल यांनी व्यक्त केले शतक पूर्ण करीत असणाऱ्या विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीची ९२ वी वार्षिक आमसभा रविवारी जून पोलीस लॉन येथे संपन्न झाली. यात खा मार्गदर्शन करीत होते.चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत आयोजित या वार्षिक आमसभेत प्रमुख पाहुणे कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतीया,खा अनुप धोत्रे उपस्थित होते.यावेळी मंचावर चेंबरचे मानद सचिव निरव वोरा, निवर्तमान अध्यक्ष नितीन खंडेलवाल,वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया, कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल,कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री आदी उपस्थित होते. दोन सत्रात संपन्न झालेल्या या आमसभेच्या प्रथम सत्रात मागील आमसभेचा कार्य वृत्तांत किरीट मंत्री यांनी वाचून दाखविला.



## - विदर्भ चेंबरची ९२ वी वार्षिक आमसभा उत्साहात सम्पन्न
## - अध्यक्ष पदी निरव वोरा तर सचिव पदी निलेश अग्रवाल

तसेच स्थिती विवरण प्रस्तुत करण्यात येऊन २०२६ -२७ चा अर्थसंकल्प कोषाध्यक्ष किशोर बाछुका यांनी सादर केला. या सत्रात वर्ष २०२६ -२७ साठी अंकेक्षक म्हणून सीए प्रशांत लोहिया यांची नियुक्ती करण्यात आली. यानंतर निवडणूक अधिकारी रमाकांत खंडेलवाल यांच्याद्वारे वर्ष २०२६- २८ साठी नवीन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. नव्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी निरव वोरा, वरिष्ठ उपाध्यक्षपदी सिद्धार्थ रुहाटीया, कनिष्ठ उपाध्यक्ष किशोर बाछुका, सचिव निलेश अग्रवाल, कोषाध्यक्ष म्हणून श्रीकांत गोयनका, सहसचिव संतोष छाजेड यांची सर्वानुमते निर्विरोध निवड करण्यात आली.या नंतर द्वितीय सत्र प्रारंभ झाले. या सत्राचा प्रारंभ स्व ब्रजलाल बियाणी यांच्या प्रतिमा पूजन व दीप प्रजवलनाने मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.कार्यक्रमात विविध संस्था संघटनने खा खंडेलवाल व भरतीया यांचे स्वागत केले. यावेळी समर्पित उद्योजक व व्यापाऱ्यांचा अवार्ड कार्यक्रम विविध श्रेणीत संपन्न झाला. सर्वप्रथम जेष्ठ उद्योजक चेंबरचे पूर्वाध्यक्ष श्रीकिसन अग्रवाल यांना चेंबर रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर व्हीसीसीआय अवॉर्ड बेस्ट कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी मध्ये प्रा मुकुंद पाध्ये यांना स्व गुलाबचंद गुप्ता यांच्या स्मृतीत शाल,मोमेंटो देऊन सन्मानित करण्यात आले. बेस्ट फॅमिली प्रॅक्टिस बिजनेस श्रेणीत लेबेन लेबोरेटरीचे संचालक भरत नितिलाल शाह यांना स्व कालुराम रुहाटीया यांच्या स्मृतीत सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट महिला उदयमी श्रेणीत बाणा टेक्सटाईलच्या संचालिका सौ अलका अजय सेंगर यांना स्व विमलादेवी गोयनका यांच्या स्मृतीत सन्मानित करण्यात आले.युवा उद्यमी पुरस्कार या श्रेणीत दास मोबाईलचे युवा संचालक रितेश मिर्जापुरे यांना स्व सुभाष नाथालाल चंदाराणा यांच्या स्मृतीत सन्मानित करण्यात आले. तसेच सर्वोत्कृष्ट कार्यकारिणी सदस्य पुरस्कार गुलशन कृपलानी यांना गंगासाहाय परिवारातर्फे व उत्कृष्ट उपसमिती सदस्य पुरस्कार प्रणव कोठारी यांना सोहनलाल गणेशलाल बिलाला यांच्यातर्फे प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात नूतन अंकेक्षक सीए प्रशांत लोहिया, निवडणूक अधिकारी रमाकांत खंडेलवाल, सी ए प्रवीण बाहेती, निरंजन अग्रवाल, सहयोगकर्ता एमसीएक्सचे नितीन अहिरवार, महाराष्ट्र चेंबर मध्ये निवड झाल्याबद्दल चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया, चेंबरचे कर्मचारी गिरीराज लखोटिया, तुषार नारे, मंगेश रघुवंशी आदींचा यावेळी सत्कार करण्यात आला. कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बीसी भरतीया यांनी यावेळी चेंबरच्या शतकोत्तर उपक्रमांच्या वाटचालीच्या उपक्रमाची मुक्त कंठाने प्रशंसा करीत व्यापारी उद्योजकांनी स्वदेशी उत्पादन नारा घराघरात पोहोचवून स्वदेशी नारा बुलंद करावा. उत्पादन व साहित्याचा आग्रह धरावा.परदेशी उत्पादनांचा मोह टाळून विकसित भारत, आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २०२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शिपगावातील शेतमजुराच्या मृत्यूचे रहस्य कायम

## पीएम अहवालानंतरच होणार उलगडा

### रक्तबंबाळ अवस्थेत सापडला होता मृतदेह, वनविभागही तपासात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिपगाव परिसरात नाल्यालगत रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आलेल्या शेतमजूर संजय मालधुरे (वय ४५) यांच्या मृत्यूचे गूढ अद्याप कायम असून, शवविच्छेदन अहवालानंतरच या प्रकरणाचा उलगडा होणार आहे. खून, अपघात किंवा वन्यप्राण्याचा हल्ला अशा विविध शक्यतांच्या अनुषंगाने पोलीस आणि वनविभागाकडून तपास सुरू आहे.

शनिवारी सकाळी शिपगाव परिसरातील नाल्याजवळ संजय मालधुरे यांचा मृतदेह आढळून आला होता. मृतदेहावर गंभीर जखमांचे निशाण असल्याने परिसरात खुनाची चर्चा रंगली.



घटनेची माहिती मिळताच लोणी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर फॉरेन्सिक पथक, डॉग स्कॉड आणि ग्रामीण गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे गोळा केले. घटनेची माहिती गावात पसरताच नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घटनास्थळी गर्दी केली. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत पंचनामा पूर्ण केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. दरम्यान, रविवारी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन स्वतंत्र पंचनामा केला.

मृतदेहावरील जखमा वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे झाल्या असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने या दिशेनेही तपास सुरू करण्यात आला आहे. आता सर्वांचे लक्ष शवविच्छेदन अहवालाकडे लागले आहे. हा अहवाल सोमवारी किंवा मंगळवारी प्राप्त होण्याची शक्यता असून, त्यातून मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. तोपर्यंत संजय मालधुरे यांच्या मृत्यूभोवतीचे रहस्य कायम राहणार आहे.

# हेमंत निखाडे यांना शासनाचा वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार

### १ जुलै रोजी राज्यपाल व मुख्यमंत्र्याच्या हस्ते मुंबईत सन्मान

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या सर्वोच्च वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्काराने तिवसा तालुक्यातील गुरुकुंज मोझरी येथील युवा पत्रकार हेमंत निखाडे यांचा १ जुलै रोजी सन्मान होणार आहे. पुरस्कार वितरण समारंभात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे त्यांना सपत्नीक सन्मानित करण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या विविध पुरस्काराची घोषणा नुकतीच करण्यात आली. त्यात हेमंत निखाडे यांनी कृषी क्षेत्रात पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या विविध उल्लेखनीय कार्याची दखल शासनाने घेऊन त्यांची २०२३ च्या वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कारासाठी निवड केली.१ जुलै रोजी मुंबईत हेमंत निखाडे यांचा सपत्नीक साडी-चोळी,मानचिन्ह,



प्रशस्तीपत्र व रोख १ लाख २० हजार रुपये पुरस्कार धनादेश देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कृषी क्षेत्रातील सर्वोच्च असलेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.


सदर पुरस्कार वितरण समारंभ राज्यपाल जिष्णू देव वर्मा,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार,महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,कृषिमंत्री दत्तात्रय भरणे,रोजगार हमी,फलोत्पादन मंत्री भरतसेठ गोगावले,कृषी राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल,मृद व जलसंधारण मंत्री इंद्रनील नाईक, राज्याचे कृषी सचिव परिमल सिंह,कृषी आयुक्त सुरज मांढरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

# अंजनगाव सुर्जी येथे पोलिओ लसीकरण मोहिमेचा उत्साहात शुभारंभ

### आ.गजानन लवटे यांच्या हस्ते चिमुकलीला डोस देऊन मोहिमेस सुरुवात

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** ग्रामीण रुग्णालय अंजनगाव सुर्जी येथे आज राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ मोठ्या उत्साहात व लोकसहभागातून करण्यात आला. दर्यापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार गजानन लवटे यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहिमेची सुरुवात झाली. आमदार लवटे यांच्या हस्ते एका लहान चिमुकलीला पोलिओचे दोन थेंब पाजून लसीकरण मोहिमेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. यावेळी बालकांच्या चेहऱ्यावरील हास्य व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षणीय होता.याप्रसंगी उपस्थित पालकांशी संवाद साधताना आमदार गजानन लवटे म्हणाले, 'पोलिओमुक्त आणि निरोगी भारत घडवण्यासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओच्या डोसपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. प्रत्येक पालकाने स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन आपल्या बाळाला जवळच्या लसीकरण केंद्रावर पोलिओचे दोन थेंब पाजावेत.' त्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कार्याचेही कौतुक केले.या मोहिमेदरम्यान ग्रामीण





रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका व आशा कार्यकर्त्या घरोघरी जाऊन लसीकरण करणार आहेत. तसेच बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजारपेठ अशा सार्वजनिक ठिकाणीही बूथ लावण्यात आले आहेत.कार्यक्रमास ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, डॉक्टर व आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, तसेच मोठ्या संख्येने नागरिक व पालक उपस्थित होते.पोलिओ हा एक गंभीर आजार असून त्यामुळे कायमचे अपंगत्व येऊ शकते. मात्र नियमित लसीकरणाने हा आजार पूर्णपणे रोखता येतो. भारत पोलिओमुक्त झाला असला तरी शेजारील देशांमधील प्रादुर्भाव लक्षात घेता सातत्याने लसीकरण आवश्यक आहे.

# प्रवीण वासनिक यांच्या ग्रंथालयास शशांक देशपांडे यांची भेट

**अमरावती :** अनेक पुस्तके वाचा, वाचनाने जीवन समृद्ध होते, वाचाल तर वाचाल, वाचनाने जीवनाला दशा मिळते ही वाक्य केवळ भाषणापूर्ती किंवा पुस्तकात न ठेवता आपल्या निवासस्थानी मोठ्या संख्येत एखाद्या वाचनालया प्रमाणे कपाटात पुस्तके सांभाळून ठेवत येणाऱ्या जाणाऱ्यांना वाचण्यासाठी उपलब्ध करून देणाऱ्या प्रवीण वासनिक या सामाजिक कार्यकर्त्याच्या निवासस्थानी असलेल्या ग्रंथालयास जायंट्स सचिव शशांक देशपांडे यांनी नुकतीच भेट दिली.



बोधीवृक्ष वाटप वृक्ष संगोपन वृक्ष संवर्धन, गाजर गवत निर्मूलन, सावित्रीबाई फुले यांची पहिली शाळा स्मारक व्हावी यासाठी शासन दरबारी आग्रह धरणारे प्रवीण वासनिक यांच्या ग्रंथालय चळवळीस हातभार लावणाऱ्या या कार्याचे शशांक देशपांडेसह डॉ. राजू डांगे डॉ. गोविंद कासट विवेक सहस्त्रबुद्धे यांनी कौतुक केले. याप्रसंगी प्रवीण वासनिक यांनी सर्वांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावरील पुस्तके भेद देत स्वागत केले.

# श्री राजर्षी शाहु महाराज सार्वजनिक वाचनालयात 'सामाजिक न्याय दिन'

**तिवसा/प्रतिनिधीः-** येथील श्री स्वामी विवेकानंद बहू सामाजिक संस्था अंतर्गत श्री राजर्षी शाहु महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसा येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती 'सामाजिक न्याय दिन' म्हणून अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अनिल थुल, विरोधी पक्ष नेते, न. पं. तिवसा यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलन करून झाली.याप्रसंगी मुख्य वक्त्यांनी शाहू महाराजांच्या बहुमोल कार्यावर प्रकाश टाकला. 'शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात बहुजन समाजाला ५० टक्के आरक्षण देऊन सामाजिक न्यायाची पायाभरणी केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून त्यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली,' असे मत अनिल थुल यांनी व्यक्त केले तसेच



यांनी शाहू महाराजांचे विचार आजच्या काळातही कसे मार्गदर्शक आहेत, हे पटवून दिले.या कार्यक्रमाला प्रफुल बनसोड,राजाभाऊ देशमुख, शहा,सुरज भगत, रोशन डगवार, कृणाल गौरखेडे,प्रिया ध.डहाके, प्रणाली कामळापुरे, प्रिया अ. डहाके यांच्यासह परिसरातील नागरिक, महिला आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशन डगवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रणाली कमळापुरे यांनी मानले.

# माहेश्वरी समाजाच्यावतीने काढण्यात आली भव्य शोभायात्रा

### महेश नवमी उत्सव श्रद्धा आणि उत्साहात साजरा

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** माहेश्वरी समाजाच्या वतीने महेश नवमी आणि वंश उत्पत्ती दिन अत्यंत श्रद्धा, उत्साह आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने माहेश्वरी संघटना, माहेश्वरी नवयुवक मंडळ आणि माहेश्वरी महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी राम मंदिरात भगवान महेश आणि माता पार्वती यांच्या पूजा-अर्चनेने व महाआरतीने झाली. यानंतर भगवान महेश यांच्या मूर्तीला सुशोभित रथात विराजमान करून शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत समाजातील महिला, पुरुष, तरुण आणि लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पुरुष पारंपरिक पोशाखात तर महिला पिवळ्या रंगाच्या साड्या नेसून भगवान महेश यांच्या जयघोषात सहभागी झाल्या होत्या.

शहरातील प्रमुख मार्गांवरून ही शोभायात्रा काढण्यात आली, जिथे ठिकठिकाणी भाविकांनी तिचे



स्वागत केले. भक्तीगीते, जयघोष आणि धार्मिक वातावरणामुळे संपूर्ण शहर माहेश्वरी समाजाची आस्था आणि एकतेचे साक्षीदार बनले.

**प्रेरणादायी मार्गदर्शन-**

कार्यक्रमादरम्यान आयोजित विशेष सभेत समाजातील ज्येष्ठ नागरिक आणि अतिथी संगीता राठी, सीताराम राठी (उपमुख्याध्यापक, बियानी कॉलेज, अमरावती) व डॉ. सुभाष पनपालिया (नगरसेवक, चांदूर रेल्वे) यांनी युवा वर्ग आणि बालकांना शिक्षण, संस्कार, सामाजिक जबाबदारी तसेच राष्ट्र उभारणीतील सहभागाबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. वक्त्यांनी समाजाच्या नवीन पिढीला आपली संस्कृती, परंपरा आणि मूल्ये अंगीकारून समाजाच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले.

**'समाज गौरव' पुरस्कारांनी केले सन्मानित-**

या सोहळ्यात शिक्षण, क्रीडा, व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजबांधवांचा सत्कार करण्यात आला. समाजाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या प्रतिभावान तरुणांना आणि विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

**सेवाकार्यातून सामाजिक संदेश-**

महेश नवमीच्या निमित्ताने समाजाच्या वतीने विविध सेवाभावी उपक्रमही राबविण्यात आले. गरजू लोकांना सरबत आणि इतर साहित्याचे वाटप करून समाजाने सेवा आणि मानवतेचा संदेश दिला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष श्यामसुंदर पनपालिया, उपाध्यक्ष दिलीप उर्फ बंडूभाऊ मुंधडा, सचिव रोशन चांडक यांच्यासह माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सरिता मुंधडा, उपाध्यक्ष संगीता पनपालिया, सचिव पूनम पनपालिया, समाजाचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळ, नवयुवक मंडळ आणि मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

माहेश्वरी समाजाच्या या भव्य आयोजनाने धार्मिक आस्था, सामाजिक एकता आणि सेवाभावाचे उत्कृष्ट उदाहरण सादर करत महेश नवमीचा सण अविस्मरणीय बनवला.

# तपोवनचा ७८ वा वर्धापन दिन १ जुलै रोजी

## विविध कार्यक्रमांचे आयोजन

### -पद्मश्री डॉ. रवी कोल्हे, पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे, संत सचिन देव महाराजांची उपस्थिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन चा ७८ वा वर्धापन दिन १ जुलै रोजी साजरा होत आहे. या प्रसंगी विविध कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासींसाठी कार्य करणारे ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. रवी कोल्हे पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे व संत सचिन देव महाराज उपस्थित राहणार आहेत.

विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन च्या उपेक्षित नाकारलेल्यांना अनाथ आणि कुष्ठ बांधवांच्या सेवा कार्याला ७८ वर्ष पूर्ण होत आहे. दाजीसाहेबांचे





कार्य संस्था आजही तितक्याच समर्थित भावनेने पुढे नेत आहे. त्यानिमित्ताने संस्थेतर्फे संचालित महामना मालवीय विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार वृक्षारोपणासह दाजीसाहेब पटवर्धन मातोश्री पार्वतीबाई पटवर्धन आत्याबाई जोशी आणि अनुताई भागवत यांच्या अस्थी कलश मातोश्री पार्वतीबाई पटवर्धन उद्यानात स्थलांतरण कार्यक्रम पद्मश्री डॉ. रवी कोल्हे पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे आणि संत सचिन देव महाराज यांच्या हस्ते संपन्न होत आहे. कार्यक्रमाला यावेळेस संस्थेच्या नियमक समितीचे उपाध्यक्ष डॉ. प्रतिक राठी सदस्य जुबीन दोटीवाल, विवेक मराठे ,अश्विन आळशी, भिमराव ठवरे ,विद्याताई देसाई उपस्थित राहतील.

पद्मश्री डॉ. रवी कोल्हे यांनी एमबीबीएस ची पदवी घेतल्यानंतर तपोवन मध्ये डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या सोबत तपोवन दवाखान्यात सेवा दिली. तीच प्रेरणा घेऊन मेळघाटातील आदिवासींसाठी त्यांनी कार्य सुरू केले. तो स्नेहबंध कायम ठेवून त्यांच्या हस्ते अस्थी कलशाला स्थलांतर करण्याचे संस्थेने निश्चित केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष तपोवन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई हे राहतील. त्यांच्या मार्गदर्शनास सर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी साडेदहा वाजता मातोश्री पार्वतीबाई उद्यानात होणाऱ्या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजित समितीतर्फे सचिव सहदेव गोळे ,उपसचिव देशपांडे ,उपअधीक्षक योगेश करडे ,अंतर्गत व्यवस्थापक निवृत्ती वेलकर, भास्कर शेटये ,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष डॉ. संजय रेड्डी यांनी केले आहे.

# नीट व टीईटी या दोन्ही परीक्षांचे पेपर फुटणे, हे शासनाचे अपयश- किशोर बोरकर

**अमरावती/प्रतिनिधीः-** टीईटी परीक्षेकरीता संपूर्ण महाराष्ट्रात २ लाख २६ हजार २५३ परीक्षार्थींनी नोंदणी केली होती.'नीट' या वैद्यकीय प्रवेशासाठी प्रश्न पत्रिका फुटल्याने फेरपरीक्षा घेण्याची नामुष्की ओढावल्या नंतर आता शिक्षक पात्रता परीक्षेचा ( टिईटी) पेपर ठाणे येथील भिवंडी येथे फुटल्याचा प्रकार उघडकीस आला असुन टिईटीचा पेपर दिड कोटी रूपयाला विकला जाणार होता.अशी माहिती भिवंडी पोलीसांनी दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या टिईटी संदर्भात नुकत्याच आलेल्या निकालानुसार शिक्षकांना सेवेत दाखल होण्यासाठी व जे शिक्षक सेवेत असताना टिईटी नाहीत,अशा सर्व शिक्षकांना टिईटी बंधनकारक केल्यामुळे शिक्षक पदावर नियुक्ती मिळण्याच्या प्रतिक्षेत असणाऱ्या व जे शिक्षक पदावर सेवेत आहेत,अशांनी अत्यंत परीश्रम करून परीक्षेची तयारी केली होती. अचानक पणे पेपर फुटल्यामुळे परीक्षा रद्द करण्यात आली आहे.हि बाब एक प्रकारे अत्यंत घृणास्पद असुन दुर्दैवी व संतापजनक आहे. लागोपाठ नीट व टीईटी चे पेपर फुटणे,हे शासनाचे अपयश असुन यासाठी संबंधित मंत्र्यांचे राजीनामे घेतले पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केली आहे. ते पुढे म्हणाले की, यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्यांना सेवेतून काढून टाकले पाहिजे.



सर्वोच्च न्यायालयाने एका निकालानुसार शिक्षक पदासाठी टिईटी अनिवार्य केल्यामुळे टिईटी परीक्षार्थींच्या पेपर एक करीता ४ लाख २८ हजार १२२, तर पेपर दोन करीता ६ लाख १२५ परीक्षार्थींनी नोंदणी केली होती, एवढ्या मोठ्या प्रमाणात परीक्षार्थींची नोंदणी झाली असतांना शासनाला याचे काहीच गांभीर्याने नसल्याचे उघड झाले आहे.भिवंडी पोलीसांनी गोपनीय माहितीच्या आधारे छापा टाकला,या छाप्यात प्राप्त झालेली टिईटीची प्रश्न पत्रिकेची संबंधितांकडून पडताळणी केली असता, प्रश्न पत्रिकेतील प्रश्न समान असल्याचे आढळून आले आहे.पेपरफुटीच्या लागोपाठ घटनेमुळे विद्यार्थ्यांचा व राज्यातील जनतेचा शासन व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असुन हा केवळ शासन व्यवस्थेचा निष्काळजीपणा नसुन परीक्षार्थींच्या परीश्रमाचा, विश्वासाचा, आणि भविष्याचा विश्वासघात आहे.अशा घटना कोणत्याही प्रकारे खपवुन घेतल्या जावू शकत नाही ,या प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करून पेपरफुटीस जबाबदार असलेल्या सर्व दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केली आहे.


## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्कः** ९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्श्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २९१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# स्मार्ट मिटर विरोधात माकपचे आज आंदोलन

**अमरावती-** मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्षाच्या वतीने महावितरण कंपनीने स्मार्ट मीटर सक्तीने बसविण्याची प्रक्रिया सुरू केल्याच्या विरोधात आंदोलनाची घोषणा केली आहे. सोमवारी (ता. २९) सदर आंदोलन विद्युत भवन येथे होणार आहे.

यासंदर्भात, माकपने प्रसिद्धी पत्रक जारी केले आहे. राज्यभरात महावितरणकडून १३ जून पासून वीज ग्राहकांना मोबाईलवर एसएमएस किंवा व्हॉट्सॲप द्वारे संदेश पाठवून जुने मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्यात येईल असा थेट अल्टिमेटम दिला जात आहे. सदर प्रक्रिया पूर्णतः एकतर्फी, नियमबाह्य व दिशाभूल करणारी, लोकशाही आणि वीज ग्राहक हक्कांचे उल्लंघन करणारी असल्यचे मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्षाने म्हटले आहे. स्मार्ट प्रीपेड मीटरला संपूर्ण विदर्भ, महाराष्ट्र राज्यात इतकेच नव्हे तर देशात विरोध असून मनमानी बळजबरीने लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे प्रकार वेळीच थांबवावे, यासाठी पक्षाच्या सोमवारी विद्युत भवन, गर्ल्स हाईस्कूल जवल अमरावती येथे दु २ ये ४ पर्यंत निर्देशन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील ७७ टक्के टक्के वीज विदर्भात तयार होते, त्याला लागणारी जमीन व संसाधने विदर्भातील जनता वापरते तसेच वीज निर्मिती करताना होणारा प्रदूषण सुद्धा विदर्भाच्या जनतेला सहन करावा लागतो. तरीसुद्धा रु. २६,००० कोटीचे दरवर्षी होणारे वीज बिल विदर्भातील जनतेला भरावे लागते आणि चार ते सहा पटीने खरेदी करावी लागते, तर ६७३ टक्के वीज पश्चिम महाराष्ट्रात वळवली जाते. आता तर चक्क स्मार्ट मीटर लावून महाराष्ट्र राज्यातील विद्युत कंपनीला खाजगीकरण करून फक्त पंतप्रधानाचे मित्र अडानी यांच्या विद्युत कंपनीला देन्यांचा केंद्र राज्य सरकारचा डाव आहे. यातुन



जनतेवर अतिरिक्त बोजा लादण्याचा बेत आहे, हे स्पष्ट दिसत आहे. म्हणून मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्षाने सुरुवाती पासून या विरोधात आंदोलन सुरू ठेवले आहे. मागिल वर्षी २०२५ ला अधीक्षक अभियंता अमरावती विभाग विद्युत भवन, अमरावती येथे विविध पक्ष व संघटनाच्या वतीने संयुक्त मोर्चा काढ़ला होता. या सर्व जनतेच्या विरोधाचे, आंदोलनाचे परिणाम पाहता मागील वर्षी ऊर्जा विभागाने भर विधानसभा सभेत कबुली दिली होती की स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती केली जाणार नाही. स्मार्ट प्रीपेड मीटर लावणे वीज ग्राहकांच्या इच्छेवर अवलंबून आहे. केंद्र सरकारचा १७ ऑगस्ट २०२१ रोजीचा अधिसूचना ही केवळ एक मार्गदर्शक आराखडा आहे. ती वीज ग्राहकांवर जबरदस्तीने ङ्गस्मार्ट प्रीपेड मीटरङ्ग लावण्याचा अधिकार प्रदान करत नाही. मुंबई उच्च न्यायालयाचा आदेशानुसार ग्राहकांच्या लेखी संमती शिवाय स्मार्ट मीटर बसवता येणार नाही. अन्यथा ती कारवाई बेकायदेशीर समजली जाणार आहे. स्मार्ट प्रीपेड मीटर बसविल्यानंतर वीज बिलांमध्ये अनपेक्षित आणि स भरमसाठ वाढ होत असल्याचा अनुभव इतर राज्यांमध्ये आला आहे. तसेच, प्रीपेड पद्धतीमुळे रिचार्ज संपताच गरीबांची वीज तात्काळ खंडित होण्याचा धोका आहे.वीज ही सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनाशी निगडित अत्यावश्यक सेवा आहे. त्यामुळे ग्राहकांना संपूर्ण माहिती, पर्याय व स्पष्ट संमती न देता मीटर बदलण्याची प्रक्रिया राबविणे योग्य नाही. कोणत्याही नव्या व्यवस्थेची अंमलबजावणी पारदर्शकता, जनजागृती व ग्राहकांच्या निवडीच्या अधिकाराचा आदर राखून करण्यात यावी अशी मागणी माकपने केली आहे. भविष्यात स्मार्ट मीटर प्रणालीचे प्रीपेड स्वरूपात दुर्बल कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. अशा व्यवस्थेमध्ये वीज वापरापूर्वी रिचार्ज करणे आवश्यक ठरल्यास अनेक गरीब व निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांना अडचणी निर्माण होऊ शकतात. रिचार्जसाठी तत्काळ पैसे उपलब्ध नसल्यास वीज सेवेत व्यत्त्यय येण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. वरील सर्व मागन्या चे पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात येणार आहे. आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन माकपने केले आहे.

# पेपर कप आणि वृत्तपत्रावर खाद्यपदार्थांचा वाढता वापर

## आरोग्याशी खेळ कधी थांबणार?

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

ग्रामीण भागातील हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या आणि नाश्त्याच्या दुकानांमध्ये आजही गरम चहा प्लास्टिक कोटिंग असलेल्या पेपर कपांमध्ये, तर भजी, समोसे, वडे यांसारखे खाद्यपदार्थ थेट वृत्तपत्राच्या



कागदावर देण्याचा प्रकार सर्रास सुरू आहे. आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या या पद्धतीकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

तज्ज्ञांच्या मते, पेपर कप हे पूर्णपणे कागदाचे नसून त्यांच्या आतील बाजूस प्लास्टिकचे कोटिंग असते. गरम चहा किंवा कॉफी ओतल्यानंतर हे कोटिंग वितळून सूक्ष्म प्लास्टिक (मायक्रोप्लास्टिक) पेयामध्ये मिसळण्याची शक्यता असते. तसेच वृत्तपत्राच्या शाईतील रासायनिक घटक गरम व तेलकट पदार्थांमध्ये मिसळून शरीरात जाण्याचा धोका नाकारता येत नाही.

राज्यभर एकेरी वापराच्या प्लास्टिकवर निर्बंध असतानाही अनेक ग्रामीण भागात नियमांचे उघडपणे उल्लंघन होत आहे. संबंधित विभागाकडून नियमित तपासणी आणि प्रभावी कारवाईचा अभाव असल्याने हा प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे.आरोग्य तज्ज्ञांच्या मते, चहा देण्यासाठी काचेचे ग्लास, स्टीलची भांडी किंवा मातीचे कुल्हड वापरणे अधिक सुरक्षित ठरते.

तसेच नाश्ता देण्यासाठी फूड-ग्रेड कागद, पत्रावळी किंवा स्वच्छ स्टीलच्या ताटांचा वापर करणे आवश्यक आहे.नागरिकांनीही आरोग्याला प्राधान्य देत अशा धोकादायक पद्धतींना नकार देण्याची गरज असून, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ग्रामीण भागात विशेष मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल्स व विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## संक्षिप्त

### हळद पिकासह शेतातील माती गेली वाहून

**पथ्रोट-**असह्य उकाड्याने अंगाची लाही-लाही झालेल्या पथ्रोटकरांना मंगळवारी पासून बरसलेल्या पावसाने मोठा दिलासा मिळाला आहे. परंतु शुक्रवारी दुपारच्या जोरदार पाऊस बरसल्याने पाचआबा शिवारातील सुमारे दोन एकरातील शेताची माती हळद पिकासह वाहून गेली. शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. दोन, तीन दिवसांपासून पावसामुळे वाल्मिकपुर शेतशिवारातील काही भागांत शेतजमीन खरडून गेल्याने शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.मुसळधार पावसामुळे शेतात पाणी घुसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेताचे बांध फुटून पीक व ठिबकच्या साहित्यासह माती ओढ्यामध्ये वाहून गेली. त्यामुळे शेतीचे नुकसान झाले आहे. पथ्रोट येथील मनिष शालिग्राम हावरे याचे शेतशिवारातील दोन एक्कर शेतातील हळद पीक तसेच ठिबक मातीसह वाहून गेल्याने त्यांचे सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.या घटनेत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचले तसेच बांध देखील फुटले आहेत. दरम्यान परिसरातही काही शेतकऱ्यांच्या जमिनीतील माती खरडून गेल्याची माहिती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी होत आहे.



### विद्यापीठात छत्रपती राजर्षि शाहू महाराज जयंती

**अमरावती-**छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### साफल्य विद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती

**लेहेगाव-**साफल्य विद्यालय, सावरखेड पिंगळाई येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती ही सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. लोकनेते शाहू महाराज हे समाजसुधारक, लोककल्याणकारी व सामाजिक न्याय देणारे होते. वंचित घटकांसाठी ५०% आरक्षण, यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न विशेष वाखाणण्याजोगे होते. यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक नरेंद्र भि. सुळे, श्रीराम गुंजीटे, विनय डहाके, प्रयोगशाळा परिचर राजेश मालपे,शिपाई बि.ओ ठाकूर. तसेच विद्यार्थी सावरी महेंद्र वानखडे, श्रुती उमेश टेकाडे,अमितेश नरेंद्र आठवले, प्रियांशू महेंद्र आठवले, रितेश प्रकाश भुंबर, अभय धर्माळे, नैतिक दिपक वानखडे, क्षितीज प्रभाकर वानखडे इत्यादी कार्यक्रमाला उपस्थित होते.

# अतिसाराला अटकाव; बालकांना ओआरएस, झिंकच्या गोळ्या

## अभियानात पाच वर्षांखालील सर्वच बालकांना करण्यात येईल वितरण

**अमरावती/का.प्र.**

पावसाळ्यात दूषित पाणी,अस्वच्छता व अन्नामुळे मुलांमध्ये अतिसाराचे प्रमाण वाढते. यामुळे होणारे बालमृत्यू शून्यावर आणण्याच्या उद्देशाने आरोग्य विभागाने ३१ जुलैपर्यंत 'अतिसार थांबवा' अभियान सुरू केले. त्याअंतर्गत पाच वर्षांखालील बालकांना ओआरएस आणि झिंकच्या गोळ्यांचे वाटप होईल. पालकांमध्ये जनजागृती होणार आहे. आरोग्य विभागाकडून १६ जून ते ३१ जुलै या कालावधीमध्ये 'अतिसार थांबवा' अभियान राबविण्यात येत आहे. अतिसारमुळे होणारे बालमृत्यू शून्यावर आणणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पूरग्रस्त व पाणी साचणारे परिसर, तसेच मेळघातील दुर्गम भागातील गावांवर विशेष लक्ष राहणार आहे. तसेच, ग्रामीण व दुर्गम गावे, झोपडपट्ट्या व दाट लोकवस्ती, दूषित पाणीपुरवठ्याची शक्यता असलेले भागावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. अतिसाराचे वाढते प्रमाण पावसाळ्यात दूषित पाणी पिणे, उघड्यावर ठेवलेले अन्न खाणे, हात न धुता जेवण करणे, अस्वच्छ परिसर, माशा व जंतूंचा वाढलेला प्रादुर्भाव यामुळे अतिसारचे प्रमाण वाढते. लकन्ना ओर्स, झिंक जिल्ह्यातील पाच वर्षांखालील लाखो बालकांना ओआरएस पाकिटांची उपलब्धता, आवश्यकतेनुसार झिंकच्या गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

# जागतिक दर्जाच्या शिक्षणाचा प्रेरणादायी अनुभव

## जालिंदरनगर-वाबळेवाडी शाळांचा शिक्षकांनी केला अभ्यास दौरा'

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था, तळवेल अंतर्गत कार्यरत पाचही शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी राज्यातील आदर्श आणि जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संकल्पनांसाठी प्रसिद्ध असलेल्या जालिंदरनगर व वाबळेवाडी शाळांचा प्रेरणादायी अभ्यास दौरा केला. या दौऱ्याचा उद्देश आधुनिक, विद्यार्थी-केंद्रित शिक्षणपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन आपल्या शाळांमध्येही त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे हा होता.



दौऱ्यादरम्यान शिक्षकांनी शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची, विद्यार्थ्यांच्या कृतीशील शिक्षणाची, आनंददायी वर्गव्यवस्थापनाची, परिसर विकासाची, शाळा व्यवस्थापनाची तसेच शिक्षक-विद्यार्थी सहभागातून उभारलेल्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरणाची सखोल पाहणी केली.

यावेळी जागतिक दर्जाच्या शाळा उभारणीचे शिल्पकार व राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित शिक्षक दत्तात्रय वारे गुरुजी यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना, शाळेचा दर्जा केवळ इमारतीवर अवलंबून नसून शिक्षकांची सकारात्मक मानसिकता, विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांमधूनच उत्कृष्ट शाळा निर्माण होते,' असे प्रतिपादन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे उपस्थित शिक्षकांमध्ये आपल्या शाळांमध्येही परिवर्तन घडविण्याची नवी ऊर्जा निर्माण झाली.

यावेळी राजाभाऊ देशमुख व जयश्री देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. दौऱ्याचे संयोजन डॉ. तुषार देशमुख व विशाल देशमुख यांनी केले.

या अभ्यास दौऱ्यात मुख्याध्यापक विनोद तिरमारे, राजेंद्र कुमरे, विद्या मेश्राम, राजेश वानखेडे, सोपान पळसपगार, निशिकांत पाटील तसेच संस्थेतील सर्व शिक्षक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.या प्रेरणादायी अभ्यास दौऱ्यामुळे शिक्षकांना आधुनिक शिक्षणाच्या नव्या दिशा मिळाल्या असून, ग्रामीण भागातही जागतिक दर्जाच्या शाळा उभारण्याच्या दिशेने संस्थेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# काँग्रेस तालुकाध्यक्षपदी प्रमोद पाटील दाळू यांची फेरनिवड

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध देशमुख यांनी अंजनगाव सुर्जी काँग्रेस कमिटीच्या तालुकाध्यक्षपदी प्रमोद पाटील दाळू यांची पुन्हा निवड केली आहे. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी व कार्यकर्त्यांच्या अथक मेहनतीची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर पुन्हा विश्वास टाकला आहे.प्रमोद पाटील दाळू गेल्या दहा वर्षांपासून तालुकाध्यक्ष पदाची धुरा सांभाळत आहेत. दाळू यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यापासून अंजनगाव सुर्जी तालुक्यात काँग्रेस पक्षाची पकड लक्षणीयरीत्या मजबूत झाली आहे. गावपातळीपासून तालुकास्तरापर्यंत संघटन बांधणीवर त्यांनी भर दिला. तालुक्यातील शेतकरी, विद्यार्थी, महिला व सर्वसामान्य नागरिकांचे अनेक प्रश्न त्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलनाच्या माध्यमातून सोडविले. पाणीपुरवठा, रस्ते, वीज, शेतमालाला भाव, आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला. त्यांच्या आक्रमक नेतृत्वामुळे प्रशासनालाही अनेक वेळा तातडीने निर्णय घ्यावे लागले. जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध देशमुख यांनी सांगितले की, 'प्रमोद दाळू यांच्या नेतृत्वात तालुक्यात पक्षाचे काम चांगले झाले आहे. आगामी



स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्षवाढीसाठी त्यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानेच ही फेरनिवड करण्यात आली. प्रमोद दाळू यांच्या फेरनिवडीची बातमी येताच संपूर्ण तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले. कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, पेढे वाटून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. अनेक गावांतील कार्यकर्त्यांनी दाळू यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष प्रमोद पाटील दाळू म्हणाले, 'पक्षश्रेष्ठींनी माझ्यावर जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे व प्रत्येक गावात काँग्रेस पक्ष पोहोचवणे हे माझे ध्येय राहील. सर्व जुन्या-नव्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन मी काम करणार आहे. या फेरनिवडीमुळे अंजनगाव सुर्जी तालुक्यात काँग्रेसला नवी ऊर्जा मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



**अमरावती-परतवाडा रोडवरील आष्टी ते पूर्णा नगर दरम्यान उच्च विद्युत दाब वाहीणीची झालेली वाताहत.**

**छाया : प्रा. डॉ. शीतल तायडे**

# ग्रंथालयांच्या न्याय्य मागण्यांसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

**अमरावती-** राज्यात शासन मान्य ११९५५ सार्वजनिक ग्रंथालय आहेत. गेल्या पंधरा वर्षापासून यांचे प्रलंबित प्रश्न सुटलेले नाहीत म्हणून राज्य शासनाने सार्वजनिक ग्रंथालयांसाठी जाहीर केलेल्या ४० टक्के अनुदानवाढ, ग्रंथालयांचे वर्गबदल आणि २००० नवीन सार्वजनिक वाचनालयांना मान्यता या वेळोवेळी अधिवेशनात केलेल्या घोषणांची तातडीने अंमलबजावणी व्हावी, तसेच ग्रंथालय क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागावेत, या मागण्यांसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने सोमवार,२९ जून, २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुभाष सोळंके आणि सचिव गुलाबराव मगर यांनी सांगितले की, शासनाने अनेक बैठकींमध्ये ४० टक्के अनुदानवाढ, ग्रंथालयांचे वर्गबदल आणि २००० नवीन सार्वजनिक वाचनालयांना मान्यता देण्याची घोषणा केली होती. मात्र, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याने शासनाला दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी लोकशाही मार्गाने हे धरणे आंदोलन करण्यात येत आहे. धरणे आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुभाष सोळंके, सचिव गुलाबराव मगर, साईनाथ जाधव, राजेंद्र वाणी, तुषार सराफ, विष्णू बोडके, अनिल पाटील (चिकटगावकर), डी. बी. देशपांडे, डॉ. दत्तात्रय साळुंखे, सुषमा जोशी, अरविंद लंकेपाटील, भास्कर लहाने, गुलाम मोहम्मद, बी. डी. साळुंके, अशोक उजळमकर, बाबासाहेब वाहूळ, डी डी जाधव, देशमाने, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, के डी गाडेकर, क्षीरसागर, मारुती फुलारी, पंडित नवले, भाऊसाहेब पठाडे, प्रणिता कुलकर्णी, विटोरे, बद्रीनाथ कदम, विठ्ठल गोरे ,अंकुश पाटील, कैलास गायकवाड विठ्ठल कदम तसेच संघाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले आहे.

# एसआयआर.च्या तिसऱ्या टप्प्याचे साहित्य वाटप

## ३० जून पासून बीएलओ घरोघरी जाऊन करणार पडताळणी

**चांदूरबाजार/वार्ताहर**

३० जून पासून एस.आय.आर.चा ( मतदार यादीचा विशेष पुनर्निरिक्षण कार्यक्रम), अत्यंत महत्वाचा तिसरा टप्पा सुरू होत आहे.त्या अनुषंगाने मतदारांच्या पुनर्निरिक्षण साठी आवश्यक साहित्याचे वाटप बीएलओ.यांना, स्थानिक तहसील कार्यालयाचे निवडणूक विभागा कडून करण्यात आले आहे.या साहित्याचे वाटप शुक्रवार व शनिवार या दोन दिवसांत, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार मनिष यंबरवार व निवडणूक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केले.




एस.आय.आर.च्या तिसऱ्या टप्प्यात बी.एल.ओ., घरोघरी जाऊन मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत.तसेच मतदारांकडून एक विषेश माहिती अर्ज ही भरून घेण्यात येणार आहे. या वेळी मतदारांना बी.एल.ओ.यांना, पुराव्या दाखल दोन फोटों सह काही कागद पत्रांची पुर्तता ही करावी लागणार आहे.या तपासणीसाठी बी.एल.ओ. मतदारांच्या घरापर्यंत जाऊन,तपासणी आठवड्यात भेट देतील.

या वेळेत मतदारांनी आवश्यक माहीती व पुराव्यासाठीचे कागदपत्रे, बी.एल.ओ.यांना देणे आवश्यक आहे. जर मतदार बी.एल.ओ.च्या गृह भेटीत, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करू शकले नाही.तर त्यांचा पुराव्याचा रकाणा निरंक राहील. त्यामुळे मतदाराचे नाव मतदार यादीतून, वगळल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.तेव्हा मतदारांना घरी आलेल्या बी.एल.ओ.यांना माहिती अर्जासह,दोन फोटो व आवश्यक कागदपत्रे देणे अत्यावश्यक आहे.

### मतदारांनी सहकार्य करावे

मतदार यादीच्या विशेष पुनर्निरिक्षणाच्या, महत्वाच्या तिसऱ्या टप्प्याचे काम ३० जून पासून सुरू होत आहे. त्या अनुषंगाने भरावयाच्या अर्जासोबत मतदारांना स्वतः चे दोन रंगीत फोटो,आधार कार्ड च्या दोन झेरॉक्स प्रत, मतदार ओळख पत्राच्या दोन झेरॉक्स , स्वतःचा मोबाईल फोन नंबर, तसेच असल्यास इ मेल आयडी देणे आवश्यक आहे. तरी निहित वेळेत एस. आय. आर.चे काम पूर्ण होण्यासाठी, मतदारांनी वेळेत फोटो व इतर कागदपत्रे देऊन बी.एल.ओ.ला सहकार्य करावे.

**योगेश गाडे, तहसीलदार**

# ४८ कोटींच्या दंडानंतरही धडा नाही

## गाजीपूरात पुन्हा 'चिमोटे' पॅटर्नची पुनरावृत्ती होण्याची भीती

### -चिमोटे प्रकरणानंतर शेजारच्या गट क्रमांक ३७ वर नवा स्टोन क्रशर

### महसूल, खनिकर्म आणि प्रदूषण यंत्रणेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ वर गौण खनिजाचे अतिरिक्त उत्खनन केल्याप्रकरणी तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आलेला असतानाच, त्याच परिसरात शेजारील गट क्रमांक ३७ वर दंडग्रस्त चांडक यांच्या मालकीचा नव्याने स्टोन क्रशर उभारण्यात आल्याने पुन्हा एकदा 'चिमोटे प्रकरणाची पुनरावृत्ती' होणार का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे महसूल, खनिकर्म, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि वन विभागाच्या कार्यपद्धतीवरही संशयाची सुई रोखली जात असून, प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप न केल्यास भविष्यात आणखी एका मोठ्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

सन २०१० मध्ये संतोष चांडक यांनी आदिवासी शेतकरी विलास कालू चिमोटे यांच्या गट क्रमांक २७ व ३८ मधील जमिनीचा नोंदणीकृत भाडेपट्टा करार करून तेथे स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट उभारल्याची नोंद आहे. या उद्योगांबाबत तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांनी विधिमंडळातील लक्षवेधीच्या उत्तरात शासनाची आवश्यक परवानगी नसल्याचा अहवाल दिल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, त्या अहवालानंतरही संबंधित उद्योग आजतागायत सुरू असल्याचे चित्र दिसत असल्याने, प्रशासनाने नेमकी कोणती कारवाई केली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.




याच जमिनीवर अतिरिक्त गौण खनिज उत्खनन झाल्याचा निष्कर्ष ईटीएस मोजणीतून समोर आल्यानंतर सुरुवातीला सुमारे ६४ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. त्याविरोधात न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाल्यानंतर नव्याने मोजणी करण्यात आली आणि दंडाची रक्कम ४८ कोटी रुपयांवर निश्चित करण्यात आली. या दंडालाही उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. न्यायालयाने संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागण्याचे निर्देश दिले होते. मात्र, विहित मुदतीत दाद मागण्यात आली नाही. त्यानंतर विलंबमाफीचा अर्ज स्वीकारण्यात आल्याने दंड वसुलीची प्रक्रिया मंदावल्याची चर्चा रंगली होती.

दरम्यान, याच परिसरातील गट क्रमांक ३७, मालक अंबादास नागोराव पवार यांच्या जमिनीवर शासनाच्या परवानगी विनाच बाँडवर भाडेपट्टा / करारनामा करीत आणखी एक स्टोन क्रशर उभारण्यात आला आहे. या क्रशरला सुरुवातीला प्रदूषण नियंत्रण मंडळाची आवश्यक ना हरकत नसल्याचा आढळून आले होते. त्याबाबत 'जनमाध्यम' ने वृत्त प्रकाशित करताच प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी खडबडून जागे झाले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पाहणी करून परवानगी दिली. ती परवानगीही संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. मात्र, पाहणी अहवालातच संबंधित क्रशरचे वनक्षेत्रापासूनचे अंतर ५० मीटरच्या आत असल्याची नोंद असल्याचे समोर आले आहे.

याच ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाचा अंबादास पवार यांचे नावे गौण खनिज उत्खनन परवानाही मंजूर करण्यात आला असून, उत्खनन सुरू असल्याचे सांगितले जाते. खनिकर्म विभागाच्या पाहणीत उत्खननाची खोली परवानगीच्या मर्यादेत असल्याचे नमूद करण्यात आले असले, तरी सीमांकन नसणे, तारेचे कुंपण नसणे आणि आवश्यक वृक्षारोपण न करणे अशा त्रुटीही अहवालात नोंदविण्यात आल्याचे सांगितले जाते.

विशेष म्हणजे, यापूर्वी गट क्रमांक २७ व ३८ मधील खदानीचे वनापासूनचे अंतर शून्य मीटर असल्याचा अहवाल समोर आल्याची चर्चा होती. त्यामुळे आता शेजारीच असलेल्या गट क्रमांक ३७ वरील खाणीचेही वनापासूनचे प्रत्यक्ष अंतर अधिकृतपणे मोजण्याची मागणी जोर धरू लागली आहे. भविष्यात पुन्हा मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त उत्खनन अथवा नियमभंग उघड झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

यासोबतच, उत्खननासाठी आवश्यक यंत्रसामग्री, ब्लास्टिंगची परवानगी, अर्हताप्राप्त ब्लास्टर व प्रबंधकांची नियुक्ती, तसेच DGMS च्या नियमांचे पालन करण्यात आले आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. जर नियमांचे पालन झाले नसेल, तर संबंधित विभागांनी कोणती कारवाई केली, अथवा कारवाई टाळली असेल तर त्यामागील कारण काय, याचे उत्तर प्रशासनाने देण्याची मागणी होत आहे. सदर प्रकरणी प्रशासनाची अधिकृत बाजू जाणून घेण्यासाठी संबंधित अधिकारी वर्गाशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

### ■ समपहरणाच्या नोटिशीची मुदत आज संपणार

४८ कोटींच्या दंडाच्या वसुलीसाठी अकोट तहसीलदारांनी संतोष चांडक व त्यांच्या कुटुंबीयांच्या काही मालमत्तांवर दंडाचा बोजा नोंदवून १५ जून रोजी समपहरणाची नोटीस बजावली होती. त्यासाठी देण्यात आलेली १५ दिवसांची मुदत आज (सोमवारी) संपत असल्याने, आता महसूल प्रशासन प्रत्यक्ष समपहरणाची कारवाई करते की पुन्हा प्रक्रिया कागदोपत्रीच राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ■ अंबादास पवार यांच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी होणार का?

गट क्रमांक ३७ मधील खदानीतून निघणाऱ्या गौण खनिजाची विक्री कोणाला होत आहे, त्याचे पैसे नेमके कोणाच्या खात्यात जमा होत आहेत, उत्खननासाठी वापरली जाणारी यंत्रसामग्री व ब्लास्टिंगची बिले कोणाच्या नावावर आहेत, याची आर्थिक चौकशी (मनी ट्रेल) करण्याची मागणी पुढे येत आहे. अशा तपासातून प्रत्यक्ष लाभार्थी कोण आहे, हे स्पष्ट होऊ शकते, अशी चर्चा आहे.

### ■ समपहरण झाल्यास स्टोन क्रशर आणि हॉट मिक्स प्लांटही जप्त होणार?

गट क्रमांक २७ व ३८ वरील समपहरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात गेल्यास, त्या जमिनीवर उभारलेले स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट यांच्याबाबतही कायदेशीर कारवाई होणार का? त्यांची जप्ती करून दंडाची रक्कम वसूल केली जाणार का? या प्रश्नांची उत्तरे महसूल प्रशासनाने स्पष्ट करावीत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# विजेच्या धक्क्याने दोन बहिणी शेतातच कोसळल्या

## पेरणीसाठी वडिलांसोबत गेल्या होत्या शेतात

**नांदगाव पेठ /प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेंदोळा धस्कट येथे आज दुपारच्या सुमारास वीज कोसळून दोन बहिणी जखमी झाल्याची घटना घडली. सुदैवाने वेळीच उपचार मिळाल्याने दोघींची प्रकृती आता धोक्याबाहेर आहे.





खुशी अतुल धस्कट (वय १४) आणि आरोही अतुल धस्कट (वय ९) अशी घटनेतील जखमी बहिणींची नावे आहेत. या घटनेने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, अतुल धस्कट हे सकाळी शेतात पेरणी करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या दोन्ही मुली खुशी आणि आरोही यांनीही वडिलांसोबत शेतात जाण्याचा हट्ट केला. त्यामुळे दोघी बहिणी वडिलांसोबत शेतात गेल्या.दरम्यान, अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. विजांचा कडकडाट सुरू झाल्याने अतुल धस्कट यांनी दोन्ही मुलींना घेऊन शेतातील आंब्याच्या झाडाखाली आसरा घेतला. मात्र काही वेळातच बाजूच्या शेतात वीज कोसळली आणि त्याच्या धक्क्याने दोन्ही बहिणी बेशुद्ध होऊन खाली कोसळल्या.

घटनेनंतर त्यांना तातडीने अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी उपचार सुरू केले असून सध्या दोघींची प्रकृती स्थिर व धोक्याबाहेर असल्याची माहिती आहे.

# आदर्श शाळांच्या निधीचा पूर्ण उपयोग करा

## -राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील आदर्श शाळांसाठी शासनस्तरावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. इमारत बांधकाम कमी किंमतीत झाले असले तरी शाळांमधील इतर सुविधांसाठी हा निधी उपयोगात आणता येणार आहे. यासाठी तातडीने शासनाकडे प्रस्ताव पाठवून मान्यता घ्यावी आणि उर्वरित निधी शाळेतील सुविधांसाठी उपयोगात आणावा, अशा सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज (दि.२८) दिल्या.



डॉ. भोयर यांनी आज अमरावतीत माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी विभागातील पीएमश्री, सीएमश्री आणि आदर्श शाळांचा आढावा घेतला. बैठकीला उपसंचालक नीलिमा टाके, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, सहाय्यक शिक्षण संचालक अमोल पवार आदी उपस्थित होते.

डॉ. भोयर यांनी विभागातील काही मोजक्याच आदर्श शाळांचे बांधकाम होऊ शकले नाही. त्यामुळे ज्या शाळांचे काम प्रगतीपथावर आहे, अशा शाळांचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात यावे. शाळा बांधकामांमध्ये कमी किंमतीच्या निविदा प्राप्त झाल्यामुळे बांधकामावरील खर्चात बचत झाली आहे. हा निधी शाळेच्या विकासासाठी उपयोगात आणणे शक्य आहे. उर्वरित निधीबाबत प्रस्ताव तयार करून इतर उपयुक्त सुविधा निर्माण कराव्यात. या ठिकाणी ☞(पान २ वर)

# त्या अपघातग्रस्त महिलेचा अखेर मृत्यू

### तीन दिवसापूर्वी झाला होता तळेगाव फाट्यानजीक अपघात

**तिवसा/प्रतिनिधीः-** तळेगाव ठाकूर फाट्यानजीक दि.२५ जून रोजी ५ वाजता दरम्यान लहान टेम्पोने महामार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या रंजना राजेंद्र ठाकरे या महिलेला जबर धडक दिल्याची घटना घडली होती. यात रंजना ठाकरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना उपचारासाठी अमरावती येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज रविवारीं १२ वाजता त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

एमएच ४०वाय ९९१९ क्रमांकाचा चारचाकी डेम्पो ने त्यांना जबरदस्त धडक दिली होती.यामध्ये रंजना ठाकरे यांना गंभीर दुखापत झाली होती. त्यांना प्रथम तिवसा उपजिल्हा रुग्णालतात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होतें, मात्र डोक्यातील रक्तस्त्राव जास्त असल्याने त्यांना तातडीने अमरावती हलविण्यात आले.तीन दिवसाच्या उपचारानंतर अखेर आज त्यांची मृत्यूशी झुंज संपली.त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

# अंजनगावातील सोमवार बाजारात भेसळयुक्त जीवनावश्यक वस्तूंची सर्रास विक्री

## अन्न भेसळ औषधी प्रशासनाचे दुर्लक्ष - ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ

### तपासणी पथक फिरकत नसल्याने नागरिकांत संताप

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जीतील आठवडी बाजाराचा मुख्य दिवस असलेल्या सोमवारी शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेत भेसळयुक्त जीवनावश्यक वस्तूंची खुलेआम विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

खाद्यतेल, हळद-मिरची पावडर, , दूध, खाद्य पेढा मोठ्या प्रमाणात भेसळ होत असूनही अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अधिकारी फिरकत नसल्याने ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सोमवारचा आठवडी बाजार हा शहरातील आणि ग्रामीण भागातील जनतेचा बाजाराचा मुख्य दिवस असतो. बाजाराच्या दिवशी खुलेआम भेसळ युक्त खाद्य तेलाची विक्री होत असते. कमी भावात तेल मिळते म्हणून ग्रामीण भागातील गोरगरीब लोक विकत घेतात. शहरातील काही व्यापारी सुद्धा अशा भेसळयुक्त खाद्यतेलाची दुकानातून सर्रासपणे विक्री करीत होते. काही व्यापाऱ्यांनी आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या नावाचा दरारा ऐकताच भेसळयुक्त तेलाची खुली विक्री बंद केली आहे. हॉटेलमधील मिळणारा पेढा याचीसुद्धा तपासणी करणे अतिशय गरजेचे आहे. तर हळदीमध्ये ज्वारी किंवा तांदुळाच्या पिठाची भेसळ केल्या जात असून आठवडी बाजारात सर्रासपणे विकल्या जाते. पाकीट मधील दूध याला वेगळा वास येतो याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी नागरिक करीत असून सोमवार बाजारात सुद्धा गुटखा पुड्या चोरून विकल्या जातात. अन्न भेसळ विभागाच्या अधिकाऱ्यांनी ☞(पान २ वर)

# तिवसा तालुक्यात ५७५८ बालकांना पोलिओ डोज

## पोलिओ लसीकरण मोहीम उत्साहात



**तिवसा/प्रतिनिधीः-** ० ते ५ वयोगटातील बालकांकरिता राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम आज संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात आली. तिवसा शहर व तालुक्यात सुमारे ५७५८बालकांना पोलिओ डोज देण्यात आला असून १०५ टक्के लसीकरण मोहीम तिवसा तालुका आरोग्य विभागाच्या वतीने यशस्वी करण्यात आली. या लसीकरण मोहीमेत पालकांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला.

तिवसा शहर व तालुक्यात येणाऱ्या तीन प्राथमिक आरोग्य केंद्र मार्फत एकूण ९३ बूथ ठेवण्यात आले होते. यामध्ये तळेगाव ठाकूर २२४६, कुऱ्हा १५५७, मार्डी १६२५ एकूण ५४२८ पोलिओचे उदिष्ट होते. त्याहून अधीक ५७५८ बालकांना ☞(पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आमदार प्रवीण तायडे

### पेरणीपूर्व समस्यांची प्रत्यक्ष पाहणी

**आसेगाव पूर्णा/प्रतिनिधीः-** धानोरा पूर्णा येथे दिनांक २८ जून रविवारी आयोजित 'मन की बात' कार्यक्रमानंतर आमदार प्रवीण तायडे यांनी धानोरा पूर्णा, कोतगावंडी, दहिगाव व शहापूर परिसरातील शेतशिवारात जाऊन शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष भेट देत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नरेश बर्वे व मुकुंद टेकाडे यांच्या शेतात शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी पानंद रस्ते, शिवरस्ते, बोगस बियाणे तसेच पुरेसा पाऊस झाल्याशिवाय पेरणी



करू नये, असा सल्ला दिला.

यावेळी शेतकऱ्यांनी वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवासह विविध समस्या मांडल्या. त्यावर आमदार तायडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निर्देश देत प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. 'शेतकऱ्यांना कोणतीही अडचण ☞(पान २ वर)

# बसस्थानकातील अट्टल दुचाकी चोर जेरबंद

### दोन मोटार सायकलींसह ४० हजारांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बसस्थानक परिसरातून दुचाकी चोरी करून पसार झालेल्या चोरट्याला सिटी कोतवाली पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत जेरबंद करत दोन चोरीच्या मोटारसायकलींसह सुमारे ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्रकाश जगन्नाथ तिडके (वय ४७, रा. गणपती नगर, अमरावती) यांनी २५ जून रोजी सकाळी परतवाडा येथे जाण्यासाठी आपली स्प्लेंडर प्लस (एमएच २७ ☞(पान २ वर)

# मेहेरबाबा कॅन्टीन परिसरात जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

### -पाच जण ताब्यात, तिघांचा शोध सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील मेहेरबाबा कॅन्टीन परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर राजापेठ पोलिसांनी धाड टाकून पाच जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कमेसह एकूण ५,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीन फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

राजापेठ पोलिसांना २७ जून रोजी जुना सातुर्णा एमआयडीसी परिसरातील मेहेरबाबा कॅन्टीनजवळ जुगाराचा खेळ सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ छापा टाकला. कारवाईदरम्यान पाच जण जुगार खेळताना आढळून आले. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी ऋषिकेश शिवदास शिंदे (वय २७, रा. सरोज कॉलनी), शेख नाजीम शेख नबी (वय २७, रा. रतनगंज), मोहम्मद साबीर मोहम्मद छोटू (वय २७, रा. हनुमान नगर), वल्लभ भगवानदास जाधव (वय २५, रा. झेडा चौक) आणि सत्यम ☞(पान २ वर)

श्री सिद्धेश्वर प्रसन्न



शुभ विवाह

चि. आनंद विनोदसा मोतीसा पांढरे

चि.सौ.कां. आकांक्षा विजयराव दत्तात्रय व्हेकर



शुभ विवाह व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!
तुम्हा दोघांना विवाहाच्या पवित्र बंधनानिमित्त आणि नवीन आयुष्याच्या सुरुवातीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा!
'दोन मने, दोन जीव, एका पवित्र बंधनात बांधले गेले,सुख-समृद्धीचे
नवीन पर्व तुमच्या आयुष्यात सुरू झाले.
'ईश्वर चरणी प्रार्थना आहे की, तुमचे पुढील दांपत्य जीवन सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि आनंदाने न्हाऊन निघो!

शुभेच्छुक - श्री सिद्धेश्वर नवदुर्गा उत्सव मंडळ व सिद्धेश्वर कावड मंडळ चे सर्व सदस्य व मित्र मंडळ सतिश पांढरे, सागर पांढरे, पवन पांढरे,हेमंत पांढरे, अतुल सरोदे, चेतन चंदनपत्री आणि सर्व मित्र परिवार अंजनगाव सुर्जी